नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष १७ * अंक १ * * वाशीम * | मंगळवार, दिनांक १ जुलै २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## हिमाचलमध्ये अतिवृष्टी, १२९ मार्ग बंद

■ वृत्तसंस्था, शिमला, दि. ३० :
हिमाचल प्रदेशात रविवारपासून मुसळधार पाऊस पडत आहे. भूस्खलनामुळे राज्यातील १२९ रस्त्यांवरील वाहनांची वाहतूक थांबली आहे. आतापर्यंत राज्यात ३९ जणांचा मृत्यू झाला आहे. गेल्या २४ तासांत ३ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे.

सोमवारी सकाळी हिमाचलच्या मंडी-कुल्लू राष्ट्रीय महामार्गावरील थलौतच्या भुभू जोत बोगद्याजवळ भूस्खलन झाले. यामुळे रस्ते वाहतुकीवर परिणाम झाला आहे. अनेक वाहने बोगद्यातही अडकली आहेत. सतर्कतेमुळे आज हिमाचलच्या ४ जिल्ह्यांमध्ये शाळा बंद आहेत. बिहारमध्ये वीज कोसळून ५ जणांचा मृत्यू झाला.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## भाग्य हे आमुचे बोलतो मराठी

काल मराठीचा पाया मजबूत करण्यासाठी आम्ही आवाहन केले होते. सध्या तरी मराठी आणि महाराष्ट्र गौरवासाठी अनेक कवींनी वर्णलेल्या, 'सुंदर देशा पवित्र देशा' किंवा बहु असोत सुंदर संपन्न की महा, प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा किंवा दगडांच्या देशा वगैरे सारखे वर्णन वाचून आपल्याला आपल्याच मराठी भाषेचा अभिमान तार स्वराने दिसत असला. तरी अभिजात झालेली किंवा तसा दर्जा मिळालेली आपली मराठी भाषा दिवसेंदिवस आपला झेंडा इंच इंच फडकवित ठेवणार आहे का, हाच खरा प्रश्न आहे. संपूर्ण भारतात मोगलांच्या विरुद्ध किंवा इतर परकीयाच्या विरोधात लढणारे फक्त मराठीच होते आणि ते महाराष्ट्रातील होते. हे सत्य कधीच नाकारता येणार नाही. देशाच्या अनेक भागात आजही मराठ्यांच्या विजयोत्सवाच्या खुणा दिसून येतात. ग्वाल्हेरचे सिंदिया हे महाराष्ट्राचे शिंदे आहेत. बडोद्याचे गायकवाड गुजराती नसून मराठीच आहेत. इंदूरच्या अहिल्याबाई होळकर यांच्या कर्तृत्वाला संपूर्ण देश नमन करतो. देशातील इतर अनेक प्रांतात आपल्या मराठीची आणि मराठ्यांची तलवार तळपत होती. ही सर्व मराठी असलेल्या आणि महाराष्ट्रातील लढाऊ असणाऱ्या मराठ्यांची एका प्रकारची अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या भारताची निशाणी होती. मराठी सत्तेचे पाऊल दरम्यानच्या काळात कधीतरी थोडेसे वाकडे पडले. त्यानंतर इंग्रजांनी पुण्यावर आपला युनियन जॅक फडकवला आणि मग देशावर इंग्रजी अंमल सुरू झाला. १८१८ सालापूर्वी दुसऱ्या बाजीरावांनी हाराकिरी केली नसती. त्याउलट आपल्या पूर्वजांच्या पावलावर पाऊल टाकून मराठी बाणा दाखवून दिला असता. तलवार गाजवली असती. तर इंग्रजांचे राज्य अजिबात आल्याचे दिसले नसते. सध्याच्या युगात जर तरला काही अर्थ नाही. त्यामुळे ते जाऊ द्या. इंग्रज आले आणि इंग्रज गेले. इंग्रज गेल्यावर दिल्लीत जी सत्ता स्थापन झाली. त्यात मराठी जनांचा अजिबात बोलबाला नव्हता. हे मान्य केलेच पाहिजे. किंबहुना महाराष्ट्राकडे सातत्याने सावत्रपणाने पाहणे सुरू होते. त्यातच भाषिक राज्य स्थापन व्हावीत. असे ठरल्यावर आंध्र प्रदेशच्या निर्मितीसाठी पोट्टी श्रीरामलू यांनी आपले प्राण अर्पित केले. त्यामुळेच मग तत्कालीन मद्रास पासून आंध्र प्रदेश वेगळा झाला. त्यानंतर सुद्धा तत्कालीन सरकारने महाराष्ट्र आणि गुजरात यांना मुंबई राज्यात समाविष्ट केले होते. 1956 सालात मध्य प्रदेशची राजधानी असलेले नागपूर संपूर्ण विदर्भासह मुंबई आणि महाराष्ट्रामध्ये सामील झाले. नागपूरची राजधानी गेली. स्वातंत्र्योत्तर काळात राजधानी गेल्याचे हे एकमेव उदाहरण आहे. अनेक नवनवीन राजधान्या नागपूरला वाकुल्या दाखवीत आहेत. १९६० साली अखेर महाराष्ट्रातील सर्व पक्ष नेत्यांनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे. यासाठी आंदोलन उभे केले. कॉम्रेड भाई डांगे, आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे, एसेम जोशी आणि इतर अनेक मराठी नेत्यांनी संयुक्त महाराष्ट्रासाठी जोरदार रणशिंग फुंकले होते. अखेर मराठी जनांच्या एकजुटीला वंदन करून महाराष्ट्र आणि गुजरात ही दोन राज्ये एक मे १९६० रोजी स्थापन झाली. पण त्यानंतरही महाराष्ट्र सारख्या श्रीमंत राज्यात मराठीला हवे ते महत्त्व मिळाले नाही. त्यावेळी संयुक्त महाराष्ट्राच्या लढाईत काँग्रेस विरुद्ध सर्वपक्षीय तरीही पक्षनिरपेक्ष मराठी प्रेमी पक्षांची आघाडी स्थापन झाली होती. तसाच सध्याच्या परिस्थितीमध्ये मराठी जनांच्या मनाचा आवाज गेल्या काही दिवसापासून हिंदी भाषा विरोधात दुमदुमू लागला होता. मध्यंतरी अगदी प्राथमिक शाळेतील बालकांनी हिंदी गीत गावे म्हणून फतवा निघाला होता. काल मराठी मनांचा आणि जनांचा आवाज ऐकून आपल्या समंजस मुख्यमंत्र्यांनी हिंदी सक्तीचे दोन्ही जीआर रद्द केले. त्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे त्रिवार अभिनंदन करून त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. मराठी जनांमध्ये हिंदी भाषेबद्दल आकस नाही. पण हिंदी मावशीच्या प्रेमापोटी मराठी आईला घराबाहेर काढण्याचे पाऊल कोणत्याही मराठी प्रेमीला धोकादायक वाटले. मुख्यमंत्र्यांनी नेमक्या याच जनतेच्या भावना ओळखलेल्या आहेत. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी त्या जीआर चे म्हणजेच अध्यादेशाचे फाडून फाडून बरेच तुकडे केले. त्यामुळे मराठी मन आणि मराठी जन सुखावलेले आहेत. या निर्णयाबद्दल आपले मुख्यमंत्री अभिनंदनास पात्र आहेत. त्यांना धन्यवाद. जय मराठी! जय महाराष्ट्र!!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# सरकार झुकणार नाही!

### ठाकरे बंधूंनी एकत्र क्रिकेट खेळावे, स्वीमिंग करावी, आम्हाला अडचण नाही : फडणवीसांचा टोला

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :
हिंदी सक्तीचा निर्णय मागे घेतल्यानंतर विरोधकांनी महायुती सरकारची चौफेर कोंडी करण्याचा प्रयत्न केला आहे. पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपले सरकार कुणाच्याही दबावापुढे झुकणार नसल्याचे ठणकावून सांगितले आहे.



सरकारने हिंदीच्या मुद्यावर एक समिती स्थापन केली आहे. ही समितीच आता योग्य तो निर्णय घेईल. सरकार केवळ कोणत्याही पक्षाचे हित पाहणार नाही, केवळ महाराष्ट्राच्या विद्यार्थ्यांचे लक्ष पाहील. आम्ही कुणाच्याही दबावापुढे झुकणार नाही, असे ते म्हणालेत. ठाकरे बंधूंनी एकत्र येऊन क्रिकेट खेळावे, स्वीमिंग करावी आम्हाला काही अडचण नाही, असा टोलाही त्यांनी यावेळी ठाकरे बंधूंना हाणला.

भाजप नेते रवींद्र चव्हाण यांनी सोमवारी भाजप प्रदेशाध्यक्ष पदासाठी अर्ज भरला. त्यांची या पदासाठी निवड जवळपास निश्चित आहे. त्याची औपचारिक घोषणा उद्या होण्याची शक्यता आहे. यावेळी पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदीच्या कथित सक्तीच्या मुद्यावर सरकार कुणापुढेही न झुकता विद्यार्थी हिताचा निर्णय घेईल असे स्पष्ट केले.

ठाकरेंच्या उपनेत्याने हिंदीची सक्ती असे लिहिले

फडणवीस म्हणाले, मी काय दोन भावांनी एकत्रित न येण्याचा जीआर काढला आहे काय? मी असा कोणताही जीआर काढला नाही. उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात जो अहवाल आला होता, त्या अहवालात त्यांचा उजवा हात मानला जाणाऱ्या उपनेत्याने पहिली ते बारावी हिंदी सक्तीची करा असे लिहिले होते. हा अहवाल उद्धव ठाकरे यांनी मंत्रिमंडळ बैठकीत स्वीकारला. त्यानंतर नेहमीच्या सवयीप्रमाणे घुमजाव केले. त्यानंतरही आम्ही कोणताही इगो न मानता निर्णय केला आहे.

मी पुन्हा एकदा सांगतो. आम्ही निर्णय केला, आता समिती स्थापन केली आहे. ही समितीच आता योग्य ते ठरवेल. आम्ही कोणत्याही पक्षाचे हित पाहणार नाही. आम्ही महाराष्ट्राच्या विद्यार्थ्यांचे पाहू, सरकार विद्यार्थ्यांच्या हिताचाच निर्णय घेईल. आम्ही कुणाच्याही दबावापुढे झुकणार नाही.

फडणवीस यांनी यावेळी ठाकरे बंधूंच्या विजयी मोर्चावरही भाष्य केले. ते म्हणाले, ठाकरे बंधू एकत्र येत असतील तर मला त्याचा अतिशय आनंद आहे. त्यांनी जरूर एकत्र यावे. फक्त राज ठाकरे यांनी पहिली ते बारावीपर्यंत हिंदी सक्तीची सक्ती करण्याचा निर्णय तुमच्या काळात का घेण्यात आला? हा प्रश्न मला विचारण्यापेक्षा उद्धव ठाकरे यांना विचारला पाहिजे. बाकी त्यांनी एकत्र येऊन क्रिकेट खेळावे, हॉकी खेळावी, असा टोला त्यांनी हाणला.

## रासायनिक कारखान्यात स्फोट
## १२ जणांचा मृत्यू



■ वृत्तसंस्था, हैदराबाद, दि. ३० :
तेलंगणातील संगारेड्डी जिल्ह्यातील एका रासायनिक कारखान्यात सोमवारी झालेल्या रिॲक्टर स्फोटात किमान १२ जणांचा मृत्यू झाला आणि ३६ जण जखमी झाले.
पशामिलाराम औद्योगिक क्षेत्रातील सिगाची केमिकल्समध्ये ड्युटी वेळेच्या दरम्यान ही घटना घडली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, स्फोट झाला तेव्हा इमारतीत एकूण ६१ लोक होते आणि अजूनही अनेक लोक आत अडकले आहेत.
सुटका करण्यात आलेल्यांपैकी काही जण गंभीर जखमी आहेत. आत किती लोक अडकले आहेत याची खात्री झालेली नाही, असे एका पोलिस सूत्राने सांगितले.

## काँग्रेसी नेत्यांची दिल्लीत बैठक

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :
महापालिका निवडणुका जवळ येत असताना, महाराष्ट्र काँग्रेसमध्ये मोठे फेरबदल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर आज, ३० जून रोजी राजधानी दिल्लीत काँग्रेस पक्षाची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली.
या बैठकीसाठी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, नेते विजय वड्डेटीवार, माजी मुंबई अध्यक्ष भाई जगताप, सध्याच्या मुंबई अध्यक्ष वर्षा गायकवाड, नेत्या यशोमती ठाकूर आणि वरिष्ठ नेते माणिकराव ठाकरे हे दिल्लीमध्ये दाखल झाले होते.
या बैठकीत आगामी महापालिका निवडणुका, पक्ष संघटनात्मक मजबूती आणि राज्यातील सद्य घडामोडी या संदर्भात महत्वपूर्ण चर्चा झाल्याची माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे. महाराष्ट्र काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या नेतृत्वात ही बैठक राजधानी दिल्ली येथील काँग्रेस मुख्यालयात पार पडली. तत्पूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेत हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजप सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.

## विरोधकांना एक्स्पोज करताना स्वत: एक्स्पोज होऊ नका

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :
मराठी भाषेबाबत आम्ही कधीही तडजोड करणार नाही, मराठी माणसाच्या हक्कांवर गदा आली तर ती सहन केली जाणार नाही, असे विधान राज्याचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी केले आहे.

एकनाथ शिंदेंच्या मंत्र्यांना कानपिचक्या



मुंबईत पार पडलेल्या शिवसेनेच्या कार्यकारिणीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी त्यांनी पक्षातील मंत्र्यांना आणि आमदारांना देखील कानपिचक्या दिल्या. विरोधकांना एक्स्पोज करताना स्वतः एक्स्पोज होऊ नका, असे एकनाथ शिंदे मंत्र्यांना म्हणाले.
शिवसेनेच्या कार्यकारिणीची बैठक आज मुंबईत पार पडली. या बैठकीत एकनाथ शिंदे यांची शिवसेनेच्या मुख्य नेतेपदी निवड करण्यात आली. तसेच शिवसेना नेहमीच मराठी माणसाच्या हक्कासाठी आग्रही असल्याचा ठरावही या बैठकीत संमत करण्यात आला.
आपण मराठी भाषेबाबत कधीही तडजोड सहन करणार नाही, मराठीची गळचेपी सहन करणार नाही, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. मराठी माणसाच्या उद्धारासाठी जे काही करायचे ते आपण करणार, दिलेला शब्द आपण पाळतो त्यामुळे मराठी माणूस आपल्यासोबत आहे असेही शिंदे म्हणाले.

## मराठी जनतेच्या रेट्यामुळेच निर्णय मागे

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :
हिंदी भाषेसंदर्भातील दोन्ही शासन निर्णय महायुतीसरकारने रद्द केले आहेत.



यावरून विरोधकांनी प्रतिक्रिया देणे सुरू केले असून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी ही सक्ती फक्त आणि फक्त मराठी जनतेच्या रेट्यामुळे मागे घेतली गेली, असे म्हटले आहे. राज ठाकरे म्हणाले, इयत्ता पहिलीपासून तीन भाषा शिकवण्याच्या नावाखाली हिंदी भाषा लादण्याचा निर्णय एकदाचा मागे घेतला. सरकारने या संबंधातील २ जीआर रद्द केले.
याला उशिरा आलेलं शहाणपण म्हणता येणार नाही, कारण ही सक्ती फक्त आणि फक्त मराठी जनतेच्या रेट्यामुळे मागे घेतली गेली.

## पावसाळी अधिवेशनाला सुरूवात

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :
राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सोमवारी सुरूवात झाली. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी ५७ हजार ५०९ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या.
आज सत्ताधारी आणि विरोधकांनीही आंदोलन केले. विधान परिषदेत आज ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांच्यासह इतर दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहून सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करण्यात आले.


## भाजपच्या प्रदेशाध्यक्ष निवड प्रक्रियेला वेग

### महाराष्ट्रात रवींद्र चव्हाण, हिमाचलमध्ये डॉ. राजीव बिंदल यांची वर्णी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :
भारतीय जनता पक्षाने आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक पातळीवर जोरदार हालचाली सुरू केल्या असून देशभरात प्रदेशाध्यक्ष निवडीसाठी प्रक्रिया गतिमान झाली आहे. महाराष्ट्रासह सहा राज्यांमध्ये भाजप प्रदेशाध्यक्षांच्या निवडणुका झाल्या.
महाराष्ट्र भाजपमध्येही आज नवे पर्व सुरू झाले. विद्यमान कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी औपचारिकपणे प्रदेशाध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू उपस्थित होते. चव्हाण हे आता पूर्णवेळ प्रदेशाध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारतील.
हिमाचल प्रदेशात डॉ. राजीव बिंदल यांनी पुन्हा एकदा प्रदेशाध्यक्षपदाची सूत्रे हातात घेतली आहेत. विरोधी पक्षनेते जयराम ठाकूर, खासदार अनुराग ठाकूर आणि गोविंद ठाकूर यांनी प्रस्ताव दिले होते. उत्तराखंडमध्ये विद्यमान अध्यक्ष महेंद्र भट्ट यांची पुन्हा एकदा निवड झाली असून मिझोराममध्ये माजी मंत्री आणि आमदार के. बेचुआ यांच्याकडे पक्षाच्या सूत्रांची धुरा सोपवण्यात आली आहे.

## एसटी तिकीट बुक करणाऱ्यांसाठी आनंदावार्ता
## तिकीट दरात १५ टक्के सूट

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :
लांब आणि मध्यम अंतराच्या एसटी प्रवासासाठी आता प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. एसटी महामंडळाने १५० किलोमीटरपेक्षा अधिक अंतराच्या प्रवासासाठी आगाऊ आरक्षण करणाऱ्या प्रवाशांना तिकीट दरात १५ टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. ही योजना १ जुलैपासून सर्वसामान्यांसाठी लागू होणार असून, दिवाळी व उन्हाळी सुट्टीच्या गर्दीच्या काळात मात्र ती लागू राहणार नाही. ही सवलत फक्त पूर्ण तिकीट धारक प्रवाशांनाच मिळणार असून सवलत धारक योजनेच्या प्रवाशांना ती लागू होणार नाही.



परिवहन मंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली. एसटी महामंडळाच्या या निर्णयाचा प्रत्यक्ष लाभ भाविक व चाकरमान्यांना मिळणार आहे. येत्या आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरकडे जाणाऱ्या नियमित बस गाड्यांचे आगाऊ आरक्षण करणाऱ्या भाविकांना तिकीट दरात १५ टक्के सवलत मिळेल. मात्र, सणासुदीच्या काळात चालवण्यात येणाऱ्या अतिरिक्त (जादा) गाड्यांना ही सवलत लागू असणार नाही. गणपती उत्सवाच्या काळात कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांनाही ही सवलत लागू होणार आहे, त्यासाठी आगाऊ आरक्षण अनिवार्य आहे.



# ५ तारखेला जल्लोषाचा मोर्चा

## भाजप म्हणजे अफवांची फॅक्टरी : उद्धव ठाकरे



**मुंबई :** हिंदी सक्तीच्या निर्णयावरून सरकारला नमविल्यानंतर आता ५ जुलैला जल्लोषाचा मोर्चा काढणार असल्याची घोषणा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली. मातोश्री येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी सरकारवर आणि भाजपवर जोरदार टीका केली. मराठी माणूस एकवटल्यावर काय होते, ते सरकारने पाहिलं. संयुक्त महाराष्ट्र चळवळीची आठवण झाली. मात्र, मराठी माणूस एकत्र येऊ नये म्हणूनच हा निर्णय अचानक घेतला गेला. पण आता ५ तारखेला जल्लोषाचा मोर्चा किंवा सभा होईल. आंदोलनात सहभागी सर्वांशी चर्चा करून अंतिम निर्णय घेऊ, असे ठाकरे म्हणाले. भाजपवर हल्लाबोल करताना उद्धव ठाकरे म्हणाले, हरिश्चंद्राची फॅक्टरी हा चित्रपट आला होता, तशीच भाजप अफवांची फॅक्टरी आहे. या फॅक्टरीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचेच चित्र लावा. हिंदी सक्तीच्या निर्णयामागे आपला सहभाग असल्याच्या भाजपच्या आरोपांना प्रत्युत्तर देताना ठाकरे म्हणाले, माशेलकर समितीचा अहवाल मी कधीच उघडून पाहिला नाही. तो उच्च शिक्षणाशी संबंधित होता. मी फक्त स्वीकारला, अंमलबजावणी करण्यासाठी अभ्यासगट नेमला, पण त्यानंतर सरकारच पडलं. आणि समजा मी जीआर काढलाही असेल, तरी तीन वर्षे हे झोपले होते का? नवीन समिती आली तरी आम्ही हिंदी सक्ती कधीच होऊ देणार नाही, असा निर्धार व्यक्त करत उद्धव ठाकरेंनी मराठी भाषेच्या प्रश्नावर पुन्हा आंदोलनाची चेतावणी दिली.

# जयघोषात निघाली श्री श्री जगन्नाथ रथयात्रा

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ३० :

हरे राम हरे कृष्णा, जय जगन्नाथ, जय बलराम, जय सुभद्राचा अखंड जयघोष, पावसाच्या सरी अन भाविकांमध्ये संचारलेला उत्साह, अशा भक्तिपूर्ण वातावरणात पुण्यात श्री जगन्नाथ रथयात्रा सोहळा रविवारी (दि. 29) जल्लोषात साजरा झाला. ओडिशा मधील जगन्नाथपुरीमधील रथयात्रेच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) पुणेतर्फे आयोजित रथयात्रेत हजारो भाविक पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले अन् पुष्पवृष्टी करीत पुणेकरांनी या यात्रेचे ठिकठिकाणी मोठ्या उत्साहात स्वागत केले.



इस्कॉनतर्फे टिळक रस्त्यावरील स. प. महाविद्यालयातून जगन्नाथ रथयात्रा सोहळ्याला सुरुवात झाली. इस्कॉन कात्रज-कोंढवा रस्ता, पुणे मंदिरातील भगवान जगन्नाथ, बलराम आणि सुभद्रा यांच्या मूर्तींचे दर्शन भाविकांना घेता आले. इस्कॉन संस्थेचे लोकनाथ स्वामी, इस्कॉन मंदिराचे अध्यक्ष राधेश्याम प्रभू, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मत्स्य आणि बंदर विकासमंत्री नितेश राणे, आमदार हेमंत रासने, भीमराव तापकीर, योगेश टिळेकर, सुनील कांबळे आदी उपस्थित होते.

भगवान जगन्नाथ, बलदेव आणि सुभद्रा यांची आरती करून रथयात्रेला सुरुवात झाली. या वेळी इस्कॉन मंदिराचे उपाध्यक्ष संजय भोसले, मंदिराचे प्रवक्ते जनार्दन चितोडे, रथयात्रेचे समन्वयक अनंतगोप प्रभू, जनसंपर्कप्रमुख प्रसाद कारखानीस हेही कार्यक्रमात सहभागी झाले होते. केरळमधील थैयम लोककला आणि संस्कृतीवर आधारित महाविष्णू, नृसिंह सरस्वती आदी देवतांच्या रूपातील कलाकारांचे नृत्यरथ हे यात्रेतील आकर्षण होते. रथयात्रेच्या मार्गावर रांगोळ्यांच्या गालिच्यावर रथ हजारो भाविकांतर्फे ओढला जात होता. रथयात्रा मार्गावर भगवद्गीता आणि भागवतावर आधारित पुस्तकांचे आणि प्रसादाचे वितरण चालू होते. सायंकाळी आरती, दर्शन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. रथयात्रेतील रथाची उंची 20 फूट इतकी होती.

फुलांसह रंगबिरंगी कापडांनी रथावर सजावट करण्यात आली. समारोपानंतर भगवंतांना 56 भोगांचा नैवेद्य अर्पण करून आरती होईल. 20 हजार भाविकांना प्रसाद वाटप महाविद्यालयाच्या प्रांगणात रथयात्रेच्या सुरुवातीला आणि समारोपानंतर झाले, तर रथयात्रा मार्गावर एक लाख प्रसादाची पाकिटे वाटण्यात आली. आपण हिंदू म्हणून सगळ्याच देवीदेवतांचे सर्व उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे करणे, हे परमकर्तव्य आहे. एकीकडे वारी सुरू आहे. तसेच इथे रथयात्रा आयोजित केलेली आहे. आज याप्रमाणे सगळ्यांनी एकत्र येणे ही काळाची गरज आहे. आपल्यामध्ये मोठी ताकद आहे. भगवद्गीतेचे महत्त्व पोहचविण्याचे काम इस्कॉन करीत आहे. हिंदू धर्म आपल्या प्रत्येकाला विचाराने मोठे करतो. ही धर्माची विशालता आहे. हिंदू समाजापर्यंत अधिकाधिक प्रमाणात गीता पोहचावी, असे मत नितेश राणे यांनी व्यक्त केले.

# विजेच्या धक्क्याने दोन वारकऱ्यांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
सातारा, दि. ३० :

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यादरम्यान मोठी दुर्घटना घडली असून, दोन वारकऱ्यांचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाला आहे. रविवारी (२९ जून) रात्री ही घटना सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यातील बरड येथे घडली. या घटनेमुळे पालखी सोहळ्यात सहभागी असलेल्या सर्वच वारकऱ्यांमध्ये शोककळा पसरली आहे.

वारकऱ्यांची नावे तुषार रामेश्वर बावनकुळे (वय २२, रा. खलासना, जिल्हा नागपूर) आणि मधुकरराव तुकाराम शेंडे (वय ५५, रा. मेडिकल चौक, नागपूर) अशी आहेत. याप्रकरणी फलटण ग्रामीण पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून, फलटणचे पोलीस उपअधीक्षक राहुल धस यांनी या घटनेची माहिती दिली.पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, बरड येथे पालखी सोहळ्याचा रविवारी मुक्काम होता. रात्रीच्या सुमारास तुषार बावनकुळे हे कपडे वाळत घालण्यासाठी विजेच्या खांबाला दोरी बांधत होते. यावेळी त्यांना जोराचा विद्युत धक्का बसला. त्यांना वाचवण्याच्या प्रयत्नात मधुकरराव शेंडेही पुढे सरसावले आणि त्यांनाही धक्का बसला. दोघेही घटनास्थळीच बेशुद्ध पडले.

नातेपुते येथील ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, डॉक्टर नम्रता व्होरा यांनी उपचारापूर्वीच दोघेही मृत झाल्याचे घोषित केले.ही घटना वासुदेव महाराज टापरे यांच्या दिंडीत सहभागी असलेल्या वारकऱ्यांवर घडली असून, हे दोघेही नागपूर जिल्ह्यातील विहिर तालुक्यातील रहिवासी होते. मधुकरराव शेंडे हे अविवाहित होते आणि वारकरी संप्रदायात अतिशय सक्रिय होते. ते बावणे कुणबी समाज केंद्रीय संस्थेचे सदस्य होते आणि विविध सामाजिक संघटनांशी त्यांचे निकटचे संबंध होते.

# मराठी जनतेच्या रेट्यापुढे सरकार शरण : राज ठाकरे



**मुंबई :** हिंदी भाषा लादण्याचा निर्णय अखेर मराठी जनतेच्या प्रचंड विरोधामुळे रद्द करण्यात आला असून, हा विजय महाराष्ट्रातील तमाम जनतेचाच आहे, असे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी ठणकावले आहे. सरकारने दोन्ही जीआर मागे घेतल्यानंतर राज ठाकरे यांनी एक्सवर पोस्ट करत आपली भूमिका स्पष्ट केली. राज ठाकरे म्हणाले, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने एप्रिलपासूनच या मुद्द्यावर आवाज उठवला. त्यानंतर सर्वच पक्ष रस्त्यावर उतरले. आम्ही जाहीर केलेला मोर्चा झाला असता, तर संयुक्त महाराष्ट्र चळवळीची आठवण झाली असती. कदाचित याच एकजुटीच्या भीतीने सरकारला निर्णय मागे घ्यावा लागला. सरकारने हिंदी सक्ती रद्द केली असली तरी नवीन समिती नेमल्यावर राज ठाकरे यांनी तिखट इशारा दिला. समितीचा अहवाल काहीही असो, पुन्हा हिंदी लादण्याचा प्रयत्न झाला, तर या समितीला महाराष्ट्रात काम करू दिलं जाणार नाही. हा निर्णय कायमचा रद्द झालाय, हे सरकारने लक्षात ठेवावं, असे त्यांनी बजावले. हिंदी लादण्यामागे सरकारवर कुणाचा दबाव होता, हे अजूनही गूढ असल्याचे सांगत राज ठाकरे म्हणाले, महाराष्ट्रात विद्यार्थ्यांना हिंदी शिकवण्याचा जो अट्टाहास होता, तो अखेर मराठी जनतेनेच हाणून पाडला. यासाठी सर्व जनतेचं अभिनंदन.

# पुढील दोन दिवस पावसाचे

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :

गेल्या दोन दिवसांपासून राज्यात पावसाला पूरक वातावरण निर्माण झाले असून, अनेक भागांमध्ये जोरदार पाऊस होत आहे. तळ कोकण आणि किनारपट्टी भागांसाठी हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट जारी केला आहे, तर मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भासाठी यलो अलर्ट देण्यात आला आहे.

अरबी समुद्रात चक्राकार वाऱ्यांची स्थिती सक्रिय झाल्यामुळे येत्या पाच दिवसांत किनारपट्टी भागात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पुढील दोन दिवस पावसाचा जोर वाढणार असून, त्यानंतर हळूहळू तो कमी होईल, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. राज्याच्या बहुतांश भागांत दमदार पावसाने हजेरी लावली आहे. त्यामुळे अनेक मोठे प्रकल्प, तलाव आणि नद्यांमधील जलसाठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. उपलब्ध माहितीनुसार, राज्यात आतापर्यंत सरासरी 93 टक्के पावसाची नोंद झाली आहे.

प्रादेशिक हवामान केंद्राच्या माहितीनुसार, पुढील तीन ते चार तासांत नांदेड जिल्ह्याच्या काही भागांत तुरळक पावसाची शक्यता आहे, तर छत्रपती संभाजीनगर, जालना, धाराशिव, हिंगोली आणि परभणी जिल्ह्यांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. याच पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड आणि हिंगोली या जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड तसेच नाशिक, पुणे सातारा घाट परिसरात पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. पालघर, ठाणे, मुंबई व कोल्हापूर घाट परिसरात पावसाचा यलो अलर्ट आहे.

# उद्धव ठाकरे यांचे मराठी प्रेम बेगडी : नारायण राणे

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने हिंदी सक्ती करण्याचे शासन निर्णय मागे घेतले. पण त्यानंतरही राजकीय वतुर्ळात त्याचे पडसाद उमटत आहेत. भाजप खासदार तथा माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी या प्रकरणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. उद्धव ठाकरे यांचे मराठी प्रेम बेगडी आहे. त्यांना मराठीचा एवढाच पुळका होता, तर त्यांनी स्वतःची मुले इंग्रजी माध्यमात का शिकवली? असा सवाल त्यांनी या प्रकरणी ठाकरेंवर शरसंधान साधताना उपस्थित केला आहे.



नारायण राणे आपल्या एका पोस्टद्वारे उद्धव ठाकरे यांच्यावर हिंदी भाषेच्या वादावरून विविध प्रश्नांची सरबत्ती केली. ते म्हणाले, उद्धव ठाकरे यांचे मराठीचे प्रनेम बेगडी, राजकीय व स्वाथापोटी आहे. मुख्यमंत्री असताना हे प्रेम कुठे गेले होते? मराठी माणसाच्या नोकरी, धंदा व पोटाच्या प्रश्नासाठी काय केले?

मराठीच्या नावावर त्यांनी केवळ आपले कल्याण करून घेतले. मराठी माणसाच्या व मराठी भाषिकांच्या कल्याणाचे काय? महाराष्ट्राची राजधानी मुंबईमध्ये मराठी माणसाची टक्केवारी 18 टक्क्यांपर्यंत खाली आली याला जबाबदार कोण?

मराठीबद्दल इतकेच प्रेम होते, तर स्वतःच्या मुलांना इंग्रजी माध्यमात का शिकवले? सरकारने दोन जीआर रद्द केले म्हणून विजयी मेळावा काढणे म्हणजे नाचता येईना अंगण वाकडे असेच म्हणावे लागेल, असे नारायण राणे यांनी म्हटले आहे.

# वारीला निघालेल्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ३० :

विठ्ठलाच्या वारीला निघालेल्या एका अल्पवयीन मुलीवर काही नराधमांनी लैंगिक अत्याचार केल्याची संतापजनक घटना पुण्याच्या दौंड येथे घडली आहे. या घटनेमुळे वारकऱ्यांत एकच खळबळ माजली आहे.

आषाढी वारीसाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील वारकरी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झालेत. यात लहान - थोरांपासून वृद्धांपर्यंत सर्वांचाच समावेश आहे. सर्वांना विठ्ठल - रुक्मिणीच्या दर्शनाची ओढ लागली आहे. त्यातच दौंड येथे एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्यामुळे मोठा संताप व्यक्त केला जात आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, दौंड तालुक्यातील स्वामी चिंचोली येथे ही संतापजनक घटना घडली आहे. मजल दरमजल करत पंढरपूरच्या दिशेने जाणारे वारकरी चहापाण्यासाठी येथे थांबले होते.

## संपला म्हणालात, पण आता युतीसाठीच विनवण्या

# शिंदेंचा उद्धव ठाकरेंना टोला



**मुंबई :** राज ठाकरेंच्या मनसेला संपलेला पक्ष म्हणून हिणवणारे उद्धव ठाकरे आता त्यांच्यासोबत युतीसाठीच विनवण्या करत आहेत, अशा खरमरीत शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर थेट तोफ डागली. नाशिकमधील ठाकरे गटाचे माजी महानगरप्रमुख विलास शिंदे, सात नगरसेवक, सरपंच, उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांनी शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर शिंदे नाशिकमध्ये बोलत होते. आज काही जण कम ऑन किल मी म्हणतात, पण त्यांची अवस्था शोलेमधील असरानीसारखी झाली आहे. दररोजची गळती थांबत नाही, म्हणूनच आता ज्यांना संपलेला पक्ष म्हणायचे, त्यांच्यासोबत युतीसाठी विनवण्या कराव्या लागत आहेत, असा घणाघात शिंदेंनी केला. शिंदेंनी ठाकरेंना इशारा देताना म्हटले, आज विलास शिंदेंचा प्रवेश होताच, सकाळी ठाकरेंच्या लोकांनी विचारलं कोण विलास शिंदे? पण अयोध्येला जाताना, निवडणुकीला कामाला मात्र हेच शिंदे लागायचे. अशीच अहंमन्यता राहिली, तर लवकरच लोक तुम्हाला तुम्ही कोण? विचारतील. विलास शिंदे यांच्यासोबत नाशिकमधील माजी नगरसेवक संतोष गायकवाड, नयना गांगुर्डे, विष्णूपंत बेंडकुळे, प्रवीण पाळदे, पल्लवी पाटील, निलेश ठाकरे, उषाताई शेळके यांचा तसेच उपमहानगरप्रमुख निवृत्ती इंगोले, जिल्हा परिषद सदस्य सोमनाथ फडोळ, राष्ट्रवादीचे मोहनीश दोंदे, युवासेनेचे सुनील मते, सभापती खंडू भोये, सरपंच रमेश भोये यांचा शिवसेनेत प्रवेश झाला.

# पीओपीच्या मोठ्या मूर्ती विसर्जन धोरणासाठी सरकारला मुदतवाढ

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :

प्लास्टर ऑफ पॅरिसपासून (पीओपी) तयार केलेल्या मोठ्या आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मूर्ती विसर्जनाच्या मुद्द्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणखी तीन आठवड्यांची मुदत देण्याची मागणी राज्य सरकारने सोमवारी उच्च न्यायालयात केली. तथापि, गणेशोत्सव ऑगस्टअखेरीस असल्याने सरकारच्या या धोरणाची आम्हालाही पडताळणी करावी लागेल, असे स्पष्ट करून मोठ्या आणि सार्वजनिक मूर्तींच्या विसर्जनाबाबतचे धोरण २३ जुलैपर्यंत सादर करण्याचे आदेश न्यायालयाने सरकाला दिले.

लहान मूर्ती कृत्रिम तलाव किंवा तळ्यांमध्ये विसर्जित केल्या जाऊ शकतात. मात्र मोठ्या मूर्तींच्या विसर्जनाबाबत तोडगा काढण्यासाठी वेळ देण्याची विनंती राज्य सरकारच्या वतीने महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी मागील सुनावणीच्या वेळी न्यायालयातडे केली होती. तसेच, सरकार दीर्घकालीन उपाय शोधत असून सार्वजनिक मंडळांनी एकाच मूर्तीचा कायमस्वरूपी वापर केला, तर विसर्जनाचा मुद्दा उपस्थित होणार नाही, असेही महाधिवक्त्यांनी स्पष्ट केले होते. त्यावर, समुद्रासारख्या नैसर्गिक जलसाठ्यांमध्ये मोठ्या मूर्तींचे विसर्जन न



करण्याबाबत सरकार स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे आखणार आहे का, अशी विचारणा न्यायालयाने केली होती. मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठापुढे सोमवारी या प्रकरणी सुनावणी झाली.

तथापि, गणेशोतत्सव ऑगस्टअखेरीस असल्याचे आणि त्याधी सरकारच्या धोरणाची पडताळणी करून योग्य तो निर्णयय द्यायचा असल्याचे स्पष्ट करून न्यायालयाने धोरण लवकर सादर करण्याचे आदेश सरकारला दिले.

# नीट एमडीएस परीक्षेसाठी नोंदणी सुरू

**मुंबई :** यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी राज्य कोट्यातील जागांसाठी पदव्युत्तर दंत अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. दंत अभ्यासक्रमात पदव्युत्तर शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना ३ जुलैपर्यंत नोंदणी करता येणार आहे. नीट एमडीएस- २०२५ परीक्षेला बसलेल्या आणि महाराष्ट्रातील सरकारी, महामंडळ आणि अल्पसंख्याक महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर दंत अभ्यासक्रमांच्या उपलब्ध जागांसाठी अर्ज करू करता येणार आहे.

# सरकारने ठाकरे बंधू एकत्र येण्याचा धसका घेतला : संजय राऊत

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :



हिंदी भाषेसंदर्भातील शासनाचे दोन्ही आदेश रद्द करण्याचा निर्णय रविवारी महायुती सरकारने घेतला. त्यानंतर विरोधकांनी एकच जल्लोष केला. आता सरकारने घेतलेल्या या माघारीवर शिवसेना खासदार संजय राऊत यांनी टीका केली आहे. ठाकरे बंधू एकत्र येणार याचा धसका या सरकारने घेतला असल्याची टीका राऊत यांनी केली आहे.

संजय राऊत म्हणाले, गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला, वेगवेगळे तोडगे आणण्याचे प्रयत्न केले. पण शेवटी जनता काल रस्त्यावर उतरली. महाराष्ट्रात त्या सरकारी अध्यदेशाची होळी झाली. काल स्वतः उद्धव ठाकरे आणि इतर सर्व घटक कॉंग्रेस असेल किंवा अन्य पक्ष असेल रस्त्यावर उतरले आणि होळी केली. त्यानंतर सन्माननीय राज ठाकरे आणि माननीय उद्धव ठाकरे यांच्या एकत्रित मोर्चाचे सरकारने धसकाच घेतला होता. कारण महाराष्ट्राच्या कानकोपऱ्यातून लाखो मराठी लोक या मोर्चासाठी येणार होते. या सगळ्याचा परिणाम झाला आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अध्यादेश मागे घ्यावा लागला.

आता काहीतरी समिती स्थापन केली आहे. कशाला केली आहे? आम्ही त्रिभाषा सूत्री स्वीकारणारच नाही. महाराष्ट्र स्वीकारणार नाही. याबाबत उद्धव ठाकरे यांनी देखील सांगितले आहे आणि राज ठाकरेंनीही सांगितले आहे. त्यामुळे उगीच आता समिती नेमण्याचा फालतू खेळ भाजपने करू नये. आता प्रश्न असा आहे की 5 तारखेला उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांचे एकत्रित येणे हे महाराष्ट्रासाठी फार मोठे आकर्षण होते किंवा ताकद दाखवण्याचा मार्ग होता आणि त्यामुळेच अध्यादेश रद्द केला. आता जी फोर्स तयार होणार होती 5 तारखेच्या मोर्चासाठी आता त्याचे काय करायचे तर मोर्चाचे रूपांतर विजयी सभेत करायचे आहे. माझे काल राज ठाकरे यांच्याशी बोलणे झाले. आमची चर्चा झाली आहे. आता ते त्यांचे मत देतील. उद्धव ठाकरे साहेबांनी सांगितले होते की विजय मेळावा होईल. जे जे घटक मोर्चात सामील होणार होते या दोन प्रमुख नेत्यांशिवाय त्या सगळ्यांसह विजय मेळावा असेल. कारण ही एकजूट मराठी माणसाची आणि महाराष्ट्राची होती.

पुढे बोलताना संजय राऊत म्हणाले, राज ठाकरे यांनी जी साद घातली होती एकत्र येण्यासाठी, त्यावर उद्धव ठाकरे यांनी पुढील दहा मिनिटांतच त्याला प्रतिसाद दिला होता. त्यामुळेच आम्ही हिंदीच्या मुद्द्यावर एकत्र आलो. सकारात्मक नसतो तर एकत्र आलो असतो का? असा सवालही संजय राऊत यांनी केला आहे. मराठीच्या प्रत्येक लढ्यात आम्ही एकत्र असूत. आमची भूमिका स्पष्ट आहे.

# मायाश्री इंडस्ट्रीज गृपच्या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी

## देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडेंची प्रधान सचिवांकडे मागणी

■ महासागर प्रतिनिधी,
देसाईगंज, दि. ३० :

गडचिरोली जिल्ह्यातील देसाईगंज येथील मायाश्री राईस इंडस्ट्रीज,मायाश्री फुड इंडस्ट्रीज तसेच मायाश्री अॅग्रो इंडस्ट्रीज या एकाच परिवारातील वेगवेगळ्या नावावर असलेल्या राईसमिल संचालकांनी पुरवठा विभागाचे अधिकारी, आदिवासी विकास महामंडळाचे अधिकारी तसेच स्थानिक गुणनियंत्रण अधिकारी यांना हाताशी धरून प्रचंड गैरव्यवहार करून शासानाची कोट्यावधी रुपयाने फसवणूक केली आहे. त्यामुळे मायाश्री इंडस्ट्रीज गृपच्या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी अन्न,नागरी व पुरवठा विभाग मंत्रालय मुंबईचे प्रधान सचिव यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली आहे.

दिलेल्या तक्रारीत कऱ्हाडे यांनी नमूद केले आहे की गडचिरोली येथील शासकीय गोदामात २४ फेब्रुवारी २०२२ मध्ये मायाश्री राईस इंडस्ट्रीज व मायाश्री फुड इंडस्ट्रीज यांचा मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ गडचिरोली येथील नागरीकांनी पकडला होता. तत्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी तत्कालीन पुरवठा निरीक्षक युवराज बोरकर यांना दोषी ठरवून त्यांचेकडून ६८ हजार ४६० रुपये दंडाची रक्कम वसूल केली आहे.

हंगाम २०२२ मध्ये फुड कार्पोरेशन ऑफ इंडियाच्या पथकाने मायाश्री राईस इंडस्ट्रीज, मायाश्री फुड इंडस्ट्रीज व मायाश्री अॅग्रो इंडस्ट्रीजच्या राईसमिल मधुन तपासणीकरीता तांदळाचे नमुने घेतले असता या तीन मिलचा एकूण ९१.३,मेट्रिक टन तांदूळ मानवी खाण्यास अयोग्य आढळून आल्याने केंद्र शासनाच्या सुचनेनुसार अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांचे आदेश क्र.खरेदी-२६२२/प्र.क्र ९९/नापु २९ दि.२० जुलै २०२२ च्या पत्राद्वारे उपरोक्त सर्व राईसमिलवर जीवनावश्यक वस्तु कायदा १९८०/१९५५ कलम ३(८) व त्यामधील सुधारणा २०२० तसेच अन्य कायद्यान्वये असलेल्या तरतुदीनुसार कारवाई करून त्यांचेवर केंद्र शासनाच्या १६, जुलै २०२१ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सुचनांनुसार कारवाई करावी व कारवाई करून त्याबाबतचा सविस्तर कृती अहवाल स्वयंस्पष्ट अहवालासह शासनास ७ दिवसात सादर करण्याचे आदेश अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे सहसचिव सुधीर तुंगार यांनी दिले होते. तसेच अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे कक्ष अधिकारी यांचे पत्र क्र. खरेदी-२६२२/प्र.क्र.९९/नापु २९ दि.१० ऑगस्ट २०२३ च्या पत्रानुसार सदर तीनही मिलवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते.परंतु तत्कालीन जिल्हाधिकारी संजय मिना व तत्कालीन प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी दर्शन निकाळजे यांनी राईसमिलर्स सोबत संगनमत करून त्यांचेवर कोणतीही कारवाई केलेली नाही. तत्कालीन लोकसभा सदस्य रामदास तडस यांनी दि.३० जुलै २०२२ रोजीच्या पत्राद्वारे आरमोरीच्या शासकीय गोदामातून वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट येथे मानवी खाण्यास अयोग्य तांदळाचा पुरवठा होत असल्याबाबत जिल्हाधिकारी वर्धा, जिल्हाधिकारी गडचिरोली तसेच अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे सहसचिव सुधीर तुंगार यांना दि. ५ ऑगस्ट २०२२ रोजीच्या पत्रान्वये आरमोरीच्या शासकीय गोदामातून हिंगणघाट येथे निकृष्ठ दर्जाच्या तांदळाचा देसाईगंज येथील मायाश्री राईस इंडस्ट्रीज व मायाश्री फुड इंडस्ट्रीज यांनी शासकीय गोदाम आरमोरी येथे जमा केलेल्या तांदळाचा पुरवठा करण्यात येत असल्याने चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते.

# कॉंग्रेसची ३४ जणांची महापालिका समिती जाहीर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :

मुंबई महापालिका निवडणुकांसाठी कॉंग्रेसने मोठी घोषणा करत 34 सदस्यांची निवडणूक व्यवस्थापन आणि समन्वय समिती जाहीर केली आहे. मात्र माजी अध्यक्ष भाई जगताप, नसीम खान आणि खासदार चंद्रकांत हंडोरे यांना समितीबाहेर ठेवण्यात आल्याने पक्षात नाराजीची लाट उसळली असून, ही नाराजी थेट दिल्ली दरबारी पोहोचली आहे.

या समितीच्या अध्यक्षपदी शहराध्यक्ष वर्षा गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. समितीत माजी मंत्री अस्लम शेख, आमदार अमीन पटेल, ज्योती गायकवाड, अमरजीत मनहास, मधू चव्हाण, अशोक जाधव, सचिन सावंत, गणेश यादव यांचा समावेश आहे. तसेच, उपेंद्र दोशी, शीतल म्हात्रे, अजंठा यादव, सुरेश कोपरकर यांसह अनेक माजी नगरसेवकांचाही समावेश आहे.

भाई जगताप आणि नसीम खान यांना डावलण्यामागची कारणमीमांसा सुरू असून, यामुळे पक्षातील गटबाजी पुन्हा उफाळण्याची चिन्हे आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत या निर्णयाचा फटका कॉंग्रेसला बसण्याची भीती व्यक्त होत आहे, विशेषतः मुंबई महापालिका जिंकण्यासाठी कॉंग्रेसच्या एकजुटीवरच मोठा भर असताना अशा प्रकारची नाराज की ही पक्षाला येणाऱ्या काळात अडचणीत घालू शकते असे राजकीय जाणकारांचे मत आहे.

# राजकारणाच्या फासात अडकली आमची हिंदी



**कटाक्ष**
डॉ. प्रवीण डबली
वरिष्ठ पत्रकार
९४२२१२५६५६

कधी हिंदी हैं हम, वतन है हिन्दोस्तां हमारा गाणारे हेच लोक आता टोपी तिरकी घालून हिंदीविरोधी मोर्चा काढतायत. चेन्नईपासून महाराष्ट्रापर्यंत हिंदी हटावचे फलक अशा पद्धतीने फडकवले जातात, जणू हिंदीत प्रेमपत्र लिहिणं म्हणजे फार मोठं अपराध झालंय. हा विरोध बघून वाटतं हिंदी कुठलं कर्जवसुलीचं नोटीस घेऊन आली आहे– भाईसाहब, आता तरी बोला! पण खरं कारण हे नाही. हे सगळं जुनंच राजकारण आहे, ज्याला कुठलाही विषय मिळाला की मीठ-मिरची घालायचीच! चेन्नईत हिंदीचा विरोध असा झाला, जणू हिंदीमुळे तामिळनाडूची आत्मा संकटात पडेल. कुणीतरी त्यांना विचारा–

"मिले सुर मेरा तुम्हारा, तो सुर बने हमारा," हे गाणं कुठल्या भाषेत गायलंत हो? आणि इथं महाराष्ट्रात तर अजून गोंधळ. मुंबईत हिंदी चित्रपटाच्या कमाईवर अब्जावधी रुपये कमवायचे आणि त्या पैशांनी आपली सत्ता बळकट करायची. पण प्रचारसभेत लगेच मराठी अस्मिताचा झेंडा उंच करायचा आणि हिंदीला अपराधी ठरवायचं. हेच नेते निवडणुकीत हिंदीभाषिक लोकांना मत मागतात. तेव्हा त्यांची मराठी अस्मिता कुठं जाते हो? गुटखा चघळायला? राजकारणाचा हा खेळ असा आहे की हिंदी ही सर्वात सोप्पी शिकार बनलीये–

* इंग्रजी बोला– ग्लोबल सिटिझन म्हणा. * हिंदी बोला– लगेच दबाव टाकणारी भाषा म्हणून टिका करा.
वा रे राजकारण! तुझा तमाशा पण भारीच!

ज्या हिंदीने देशाला राष्ट्रगीत दिलं, तीच हिंदी आज फुटबॉलसारखी लाथाडली जातेय.

पण हेही तितकंच खरं– आपल्याला प्रत्येक राज्याच्या मातृभाषेचा अभिमान आहे. तमिळ, तेलुगू, कन्नड, मल्याळम, मराठी, गुजराती, बंगाली, असमिया– सगळ्याच भाषांचं आम्ही स्वागत करतो. प्रत्येक बोलीत मायचं ममत्व दडलेलं असतं. प्रत्येक भाषा आपल्या संस्कृतीचा रंग आहे. "सारे जहाँ से अच्छा हिन्दोस्तां हमारा," या मातीतल्या मातीचा सुवास प्रत्येक भाषेत मिसळलाय. कोणतीही भाषा लहान नाही, कोणतीही मोठी नाही. सगळ्यांनी मिळून आपला भारत देश सुंदर केला आहे. पण दुर्दैवाने, राजकारणाला या इंद्रधनुष्याच्या रंगावर गदा आणायला मजा वाटते.ज्या दिवशी हिंदीवरून मते खेचण्याचा खेळ संपेल, त्या दिवशी मिले सुर मेरा तुम्हारा या ओळींचं खरं महत्व समजेल. आज हिंदीवर जे राजकीय तांडव चाललंय, कधी चेन्नईत तिचा कफन घातला जातो, कधी महाराष्ट्रात तिला तुच्छ ठरवलं जातं.

पण हिंदी हसून म्हणेल– "मी इथेच आहे, तुमच्या खुर्च्यांपेक्षा मोठी आणि मजबूत!" आणि प्रत्येकाच्या मनातून एक सूर उमटेल– *"विविधतेत एकता हीच खरी शान आहे,
भाषांच्या रंगांनी उजळलं हिंदुस्थान आहे!"

## खरेदी विक्री संघाच्या पोटनिवडणुकीत अनवर पटेल यांची अविरोध निवड

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मानोरा** - मानोरा तालुका खरेदी विक्री संघाच्या पोटनिवडणुकीत अन्वर पटेल यांची अविरोध निवड करण्यात आली. खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष मतीन पटेल यांची काही महिन्यापूर्वी निधन झाल्यामुळे त्यांच्या रिक्त



जागेवर त्यांच्या कुटुंबातील अनवर पटेल यांची अविरोध संचालक पदी निवड करण्यात आली. अविरोध निवड होताच नवनियुक्त संचालक यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी खरेदी विक्री संघाच्या अध्यक्षा सौ सपना देशमुख, उपाध्यक्ष महादेवराव ठाकरे, सुरेश गावंडे, बाजार समितीचे सभापती डॉ संजय रोठे, इफ्तेखार पटेल, यशवंतराव इंगळे राजु गुल्हाने, अमोल तरोडकर, धनंजय वानखडे, मनोहर पाटील, मधुसूदन राठोड, बंडू राठोड, लक्ष्मण मानकर आदीसह संचालकांची उपस्थिती होती.

# चोराच्या उलट्या बोंबा...

# अपमान प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यावर आता पत्रकारांवरच खोटी तक्रार; सरपंच व सरपंच पतीची दबावाची राजकारणशैली उघड’

▶ विनोद तायडे ▶

**वाशीम** - जांब ग्रामपंचायतीत नागरिकांना अपमानित करून धमक्या देणाऱ्या सरपंच सुनीता खिराडे व त्यांचे तहसील कर्मचारी पती अजय खिराडे यांच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर या प्रकरणाला नवे वळण लागले आहे. ‘गुन्हा केल्यानंतर माफी मागण्याऐवजी उलट जनतेला, मीडियाला धमकावायचं’ हेच आता सरपंच व त्यांच्या पतीचे धोरण दिसते आहे.

ग्रामपंचायत कार्यालयात नागरिकांना अपमानित करून जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या घटनेवर कारवाई झाली, इतक्यातच या दोघांनी उलट फिर्यादी दाखल करून ‘चोराच्या उलट्या बोंबा’ दिल्या आहेत. विशेष म्हणजे, त्यांनी स्वतःची बाजू वाचवण्यासाठी प्रसारमाध्यमांवरच खोटे आरोप लावण्याचे ‘शर्मनाक’ पाऊल उचलले आहे. विश्वसनीय सूत्रांनुसार, सरपंच सुनीता खिराडे व त्यांचे पती अजय खिराडे यांनी जीवे मारण्याची धमकी दिली’ अशा स्वरूपाची खोटी तक्रार पत्रकार गौरव इंगळे व पत्रकार प्रमोद भगत पत्रकार पद्मा मोहोड यांच्या विरोधात दाखल केली आहे. पद्मा मोहोड ह्या ग्रामस्थांच्या घरात पावसाचे पाणी शिरल्याने त्याबाबत



उपाययोजनाची मागणी करायला ग्रामस्थांसह ग्राम पंचायात कार्यालयात गेल्या होत्या. त्यावरून सरपंच व पतीने पोलीस ठाण्यात खोटी तक्रार दाखल केली. तर पत्रकार गौरव इंगळे यांनी ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचार, गैरव्यवहार, व नागरिकांशी होणाऱ्या अपमानास्पद वागणुकीविरोधात सातत्याने आवाज उठवला होता. पत्रकार प्रमोद भगत यांनी ग्रामपंचायतच्या गैव्यवहाराच्या बातम्या प्रकाशित केल्याने पीत खवळलेल्या सरपंच व पती ने घटनेशी काहीही संबंध नसणाऱ्या पत्रकारांच्या नावाने खोटे आरोप म्हणजे एक प्रकारची ‘राजकीय सूडबुद्धीची कारवाई’ असल्याची स्पष्ट चर्चा सर्वत्र सुरू आहे. जांब ग्रामपंचायत म्हणजे सध्या भ्रष्टाचार, दडपशाही आणि जनतेच्या अपमानाचं केंद्रबिंदू! सरपंच सुनीता खिराडे आणि त्यांचे तहसील कार्यालयात कार्यरत असलेले पती अजय खिराडे यांनी ग्रामस्थांवर ‘गुन्हे दाखल करतो, बघून घेतो’ अशा भाषेत धमक्या दिल्या, नागरिकांची अवहेलना केली आणि ‘जीवे मारण्याची’ थेट धमकी दिली. यावर नागरिकांनी धाडस दाखवून मंगरूळपीर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावर तक्रार दाखल केली... पण काय झालं पुढे?

दडपशाहीचा आणि सत्तेचा कहर पुढे आला! ज्यांच्यावर गुन्हा दाखल झालाय, तेच आता ‘मीच आरोपी, मीच फिर्यादी’ असा तमाशा करून जनतेला आणि माध्यमांना गप्प करण्याचा घाणेरडा डाव खेळत आहेत.

### खोटारडे आरोप, मोकाट भ्रष्टाचारी

या सत्तेच्या नशेत रंगलेल्या जोडगोळीने आता उलटपक्षी पत्रकारांवर खोटी तक्रार दाखल करण्याचा नालायक प्रकार केला आहे. पत्रकार गौरव इंगळे आणि प्रमोद भगत, ज्यांनी ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचार उघड केला, त्यांच्यावरच जीवे मारण्याची’ धमकी दिली म्हणून खोटी तक्रार दाखल करण्यात आली आहे!

हा प्रकार म्हणजे गुन्हेगाराच्या जबड्यातून सत्य बाहेर येऊ लागल्यावर तो मीडिया संपवण्याचा प्रयत्न करतो, याचे जिवंत उदाहरण!

### प्रश्नांचा भडिमार सुरूच

> **भ्रष्टाचार उघड करणाऱ्यांवरच तक्रार? ही लोकशाही आहे की ‘माफियाशाही’?**
> ☞ ही वेळ आहे सर्व पत्रकारांनी, कार्यकर्त्यांनी आणि सुजाण नागरिकांनी एकत्र येऊन आवाज
> ☞ उठवण्याची गरज !
> ☞ हा लढा फक्त पत्रकार गौरव इंगळे आणि प्रमोद भगत, पद्मा मोहोड यांचा नाही - हा प्रत्येक
> ☞ लोकशाहीप्रिय व्यक्तीचा संघर्ष आहे!
> ☞ आता जनता पेटली आहे -
> ☞ ‘ग्रामपंचायत लॉक’ आंदोलनाचा एल्गार!

शासकीय अधिकारी असलेला अजय खिराडे ग्रामपंचायतीच्या राजकारणात का गुंतलाय? शासकीय वेळेत ग्रामपंचायतीत काय काम करत होता? अधिकारात असूनही कायद्याचा भंग का? सरकारच्या पगारावर असलेले लोक जर जनतेला आणि पत्रकारांना धमक्या देतील, तर कायदा कुठे आहे?

या प्रकरणामुळे संतप्त ग्रामस्थांनी आणि युवकांनी ग्रामपंचायत लॉक आंदोलनाचा नारा दिला असून, ‘अपमान सहन करणार नाही, मीडियाचा आवाज दाबू देणार नाही!’ असं जोरदार घोषवाक्य दिलं जात आहे. सदर प्रकारावर पत्रकार संघटनांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, ‘हे पत्रकारांवरचा थेट हल्ला असून, अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी’ असल्याचे प्रतिपादन करण्यात येत आहे.

### प्रश्न उपस्थित होतो

एका शासकीय कर्मचाऱ्याने (अजय खिराडे) सार्वजनिक ठिकाणी जनतेला धमकावणे हे निंदनीय असतानाही, त्याच्यावर अद्याप विभागीय चौकशी का सुरू झालेली नाही? व्हायरल व्हिडिओ आणि ऑडिओ क्लिप असूनही प्रशासन एवढं गप्प का? आणि आता, सत्य समोर आणणाऱ्या पत्रकारांवरच खोटी तक्रार दाखल करणं म्हणजे कायद्याचा गैरवापर नव्हे काय? या घटनेमुळे आता गावकऱ्यांमध्ये संताप उसळला आहे.

### जनतेचा एकच सवाल -

गुन्हेगार सत्तेच्या छायेखाली मोकाट, आणि सत्य बोलणारे पत्रकार आरोपी? ही कुठली लोकशाही?’ या सर्व प्रकरणामुळे ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचार, सत्तेचा गैरवापर, आणि मीडियाला गप्प करण्याची मानसिकता पुन्हा एकदा समोर आली आहे. आता यावर फक्त कारवाईच नाही, तर दृढ आणि उग्र जन आंदोलनाची गरज निर्माण झाली आहे.

## राजगाव गंधकुटी बुद्ध विहारात सहविचार सभा उत्साहात

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशिम** - २३ जून रोजी, राजगाव-कनेरगाव नाका येथील पवित्र पेनगंगा नदीकाठावरील अशोक बुद्ध विहार, गंधकुटी या शांत आणि पावन धम्मभूमीत एक भावनिक व प्रेरणादायी सहविचार सभा अत्यंत उत्साही वातावरणात पार पडली. या कार्यक्रमाचे आयोजन समन्वयक दीपक ढोले यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते.

ग्रा. पं. सायखेडा-राजगाव गटाचे सरपंच आत्माराम ढोले यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा झाली. प्रमुख मार्गदर्शक म्हणून पुज्य भंते प्रज्ञापाल थेरो, भंते प्रज्ञाशील व भंते प्रियदर्शी यांची विशेष उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमाची सुरुवात आदर्श पूजन व उपासकांच्या याचनापत्राने झाली. त्यानंतर उपस्थित उपासक व धम्म अनुयायांनी त्रिशरण व पंचशील ग्रहण करत धम्म निष्ठा प्रकट केली. गंधकुटी येथे येणाऱ्या वर्षावासात ‘बुद्ध आणि त्यांचा धम्म’ या ग्रंथाचे पठण दररोज आणि दर पौर्णिमेस खीरदान, परित्राण पाठ व पौर्णिमेचे महत्त्व यावर आधारित



विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले. आषाढ पौर्णिमा दिनी हमराज डोंगरे परिवाराकडून खीरदान व भिक्खूंना भोजनदानाचे आयोजन करण्यात येणार आहे. या वेळी भंते प्रियदर्शी यांनी ‘गंधकुटी’ येथे नागपूर दीक्षाभूमी प्रमाणे भव्य गेट उभारण्याचा संकल्प उपस्थितांसमोर मांडला, जो सर्वांच्या दानातून पूर्ण करण्यात येईल असा निर्धार व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात सरपंच आत्माराम ढोले यांनी, ‘या पवित्र धम्मभूमीस ‘तीर्थक्षेत्र ब’ असा दर्जा मिळावा यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केला जाईल,’ असे आश्वासन दिले. कार्यक्रमात गावचे पोलिस पाटील विजय जाधव यांनी काशाय वस्त्र परिधान करून १० दिवसांचे श्रामणेर शिबिर पूर्ण केल्याबद्दल तसेच दयानंद इंगोले यांनी भिक्षु जीवनाची दीक्षा घेण्याचा संकल्प केल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रा. पं. सदस्य प्रविण ढोले, गंगाधर ढोले, धम्मपाल जाधव, विजय जाधव, हमराज डोंगरे आदी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सुत्रसंचालन दीपक ढोले यांनी अतिशय ओघवत्या शब्दांत केले. सदर सहविचार सभेला परिसरातील शेकडो धम्मप्रेमी, ग्रामस्थ, उपासक-उपासिका, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## सरपंच पतीचा राजबंदशाही थैमान; तहसील लिपिक अजय खिराडेंना बडतर्फ करण्याची मागणी; महिलांच्या संघटनांचा इशारा!

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मंगरूळपीर** - तालुक्यातील आंबेडकर नगर येथील ‘नवीन सोनखास आयटीआय कॉलेज’ परिसरात जोरदार पावसामुळे नागरिकांचे प्रचंड नुकसान झाले असून, घरात पाणी घुसल्याने जीवनावश्यक वस्तू वाहून गेल्या आहेत. या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांनी जांब गट ग्रामपंचायतीकडे मदतीसाठी धाव घेतली असता, सरपंच सुनीता खिराडे यांचे पती मंगरूळपीर तहसील कार्यालयातील लिपिक अजय खिराडे यांनी नागरिकांना मदतीऐवजी जीवे मारण्याची उघड धमकी दिली. ‘तुम्हाला जे करायचं असेल ते करा, मी तहसीलदार साहेबांचा राईट हॅण्ड आहे,’ अशी उद्धट भाषा वापरत त्यांनी शासकीय दायित्वांची चेष्टा केली. या प्रकाराने संतप्त झालेल्या नागरिकांनी वाशिमचे जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार तहसीलदार यांच्या मार्फत दाखल केली असून, अजय खिराडेंना तत्काळ सरकारी सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी जोर धरू



लागली आहे. अर्जकर्त्या पद्मा ब्रह्मानंद मोहोड आंबेडकरी व्हाईस मीडिया फोरमच्या राज्य संघटक आणि भारतीय बौद्ध महासभेच्या महिला जिल्हाध्यक्ष यांनी हा ठोस आक्षेप नोंदवत, ‘शासनाने तातडीने कार्यवाही न केल्यास महिलांच्या संघटनांच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल,’ असा थेट इशारा दिला आहे.

या प्रकरणात आणखी एक गंभीर बाब म्हणजे, सरपंच पदावर असलेल्या महिलेला तिच्या पतीकडून बाजूला सारले जात असून, ग्रामपंचायत कायद्याचे निर्लज्ज उल्लंघन होत आहे.

> आम्ही लोकशाही मानतो, पण अन्याय सहन करणे हा आमचा धर्म नाही!
> **- पद्मा मोहोड (पत्रकार)**

‘सरपंचांचे पती ग्रामपंचायतीच्या निर्णयप्रक्रियेत हस्तक्षेप करू शकत नाहीत, तरीही अजय खिराडे गावाचा सर्व कारभार हक्काने चालवत आहेत. हे सरळशा-सरळ लोकशाहीवर आणि महिलांच्या हक्कांवर आघात आहे,’ असे स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्ते सांगत आहेत. दरम्यान, या सर्व प्रकाराची गंभीर दखल घेऊन प्रशासनाने चौकशी करावी आणि दोषी लिपिक अजय खिराडेंवर त्वरित निलंबनाची व बडतर्फीची कार्यवाही करावी, अशी मागणी आता तीव्र झाली आहे. अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन हे अपरिहार्य ठरेल, असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

### गुंडगिरी करणारा शासकीय हुकूमशहा

शासनाची नोकरी करत असलेला एखादा कर्मचारी जर ‘मी तहसीलदारांचा राईट हॅन्ड आहे’ म्हणत लोकशाहीचा आणि जनतेच्या हक्कांचा पायाभूत अपमान करत असेल, तर तो कर्मचारी नव्हे तो गुंडगिरी करणारा शासकीय हुकूमशहा आहे!

### पत्नीच्या अधिकारात लुडबुड करणारा

जांब गट ग्रामपंचायतीतील पावसामुळे त्रस्त नागरिक मदतीसाठी आले असताना, सरपंच सुनीता खिराडे यांच्या पती अजय खिराडे (लिपिक, तहसील कार्यालय मंगरूळपीर) यांनी नागरिकांना जीवे मारण्याची धमकी देणे, उर्मट भाषा वापरणे व पत्नीच्या सरपंचपदाचा बेकायदेशीर वापर करणे हे गंभीर गुन्हे आहेत. शासकीय सेवक असलेल्या अजय खिराडेंनी त्यांच्या अधिकाराचा भयंकर गैरवापर करून महिलांच्या सक्षमीकरणाला आणि लोकशाही व्यवस्थेलाच ठेंगा दाखवला आहे. यावरून हे स्पष्ट होते की, त्यांना ना शासकीय शिस्तीची जाण आहे ना संविधानाचा आदर.

### प्रशासनाला ठाम इशारा

जर अजय खिराडे यांच्यावर तातडीने निलंबन व बडतर्फीची कारवाई झाली नाही, तर संपूर्ण जिल्ह्यातील महिला संघटना, बहुजन कार्यकर्ते, सामाजिक चळवळीतील संघटनांचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरतील. आणि त्या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी जिल्हा प्रशासनाची असेल.

### शासन झोपल्यास, रस्त्यावरून जागं केलं जाईल!’

ही मागणी केवळ पद्मा ब्रह्मानंद मोहोड यांची नाही ही मागणी संविधानावर विश्वास असलेल्या प्रत्येक जनतेची आहे. त्यामुळे प्रशासनाने ही मागणी टाळू नये, अन्यथा येणाऱ्या दिवसांत आवाज दाबण्यासाठी कोणतीही पोलीस कारवाईही पुरेशी ठरणार नाही.

## पत्रकारांविरोधातील अन्यायकारक तक्रारीचा एकता पत्रकार संघटनेचा निषेध!

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**मंगरूळपीर** - पत्रकारांनी सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून स्थानिक स्वराज्य संस्थांतील गैरप्रकारांविरोधात लेखणी चालवली, तर त्याचा सूडबुद्धीने वापर करत पत्रकारांवर खोट्या तक्रारी दाखल केल्या जात असल्याच्या निषेधार्थ मंगरूळपीर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना एकता पत्रकार संघटनेच्या वतीने दिनांक ३० जून रोजी जोरदार निषेध निवेदन सादर करण्यात आले.

तालुका अध्यक्ष अशोक राऊत यांच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले असून, यामध्ये दि. २८ जून २०२५ रोजी दाखल करण्यात आलेल्या एका



तालुका अध्यक्ष अशोक राऊत यांच्या नेतृत्वात पोलीस निरीक्षकांना निवेदन

तक्रारीत, दैनिक महासागरचे तालुका प्रतिनिधी गौरव इंगळे व दैनिक सुवर्ण महाराष्ट्रचे प्रतिनिधी प्रमोद भगत यांची नावे हेतुपुरस्सरपणे व अनावश्यकपणे आरोपी म्हणून नमूद करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे संबंधित दोन्ही पत्रकार घटनेच्या वेळी घटनास्थळी उपस्थित नव्हते, हे स्पष्ट असूनही त्यांची नावे टाकून पत्रकारितेचे गळचेपीचे षडयंत्र केल्याचा आरोप संघटनेने केला आहे. ग्रामपंचायत जांब विरोधात संबंधित पत्रकारांनी लोकशाही चौकटीत राहून वस्तुनिष्ठ वृत्तांकन केले होते. त्याचा राग मनात धरून सूडबुद्धीने सरपंच सुनीता खिराडे आणि त्यांचा पती अजय खिराडे यांनी हा प्रकार घडवीला आहे., असा ठपका निषेध निवेदनात ठेवण्यात आला आहे.

या निषेध निवेदनात संस्थापक अध्यक्ष विनोद डेरे, जिल्हाध्यक्ष संदीप कांबळे, उपाध्यक्ष महादेव हरणे, तालुका अध्यक्ष अशोक राऊत, पत्रकार गौरव इंगळे, प्रमोद भगत, राजेश वानखडे, मुद्दशीर सौदागर यांच्यासह एकता पत्रकार संघटनेचे अनेक पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. पत्रकारांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न करणाऱ्यां विरोधात तातडीने कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. अन्यथा अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

## बुधवारी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जिल्हास्तरीय जयंती उत्सव समितीची बैठक

▶ महासागर प्रतिनिधी ▶

**वाशिम** - सामाजिक क्रांतीचे शिल्पकार, वंचित आणि शोषित समाजाच्या दुःखांना शब्दरूप देणारे, कामगारांचे नेते, थोर साहित्यिक, संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे अग्रणी डॉ. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त जिल्हास्तरीय उत्सव भव्य स्वरूपात साजरा करण्यासाठी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जिल्हास्तरीय जयंती उत्सव समिती (नोंदणी क्र. एफ-११७१९) ची महत्त्वपूर्ण बैठक बुधवार, २ जुलै २०२५ रोजी दुपारी २ वाजता स्थानिक शासकीय विश्रामगृह, वाशिम येथे आयोजित करण्यात आली आहे.

डॉ. अण्णाभाऊ साठे यांनी साहित्याबरोबरच कामगार चळवळ,



संयुक्त महाराष्ट्र चळवळ, तसेच अस्पृश्यता विरोधी आंदोलनात मोठे योगदान दिले. त्यांचे कार्य आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या जयंती निमित्त सर्वधर्मीय विचारांच्या योगदानातून नव्या पिढीला डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या महान कार्याचे स्मरण होण्यासाठी जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. या बैठकीमध्ये समितीच्या अध्यक्ष व अन्य पदाधिकाऱ्यांची निवड केली जाणार असून, येत्या १ ऑगस्ट रोजी होणाऱ्या जयंती उत्सवाची रूपरेषा, नियोजन, कार्यक्रमांची आखणी तसेच विविध जबाबदाऱ्यांचे वाटप या संदर्भात सविस्तर चर्चा केली जाणार आहे.

या बैठकीला जिल्ह्यातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, आजी-माजी पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषदेचे सदस्य, सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी वर्ग तसेच मातंग समाजबांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन समितीचे अध्यक्ष राम बाजड, उपाध्यक्ष कैलास थोरात, सचिव रवि कांबळे, कोषाध्यक्ष गजानन वैरागडे, सहसचिव मोहनराज दुतोंडे, सदस्य शंकर खंडारे आदींनी केले आहे.

# घोषणांची झगमग, अंमलबजावणीची अंधारी वाट

**भारतातील राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० हे देशाच्या शैक्षणिक इतिहासातील एक महत्त्वाकांक्षी दस्तऐवज आहे. ह्यतीन वेळा हजेरी घ्या, तीन भाषा शिकवा, व्यावसायिक शिक्षण द्या, कौशल्यविकास कराह्न अशा घोषणांनी भरलेले हे धोरण प्रथमदर्शनी आकर्षक आणि प्रगतिशील वाटते. परंतु या घोषणांचा आभास आणि खऱ्या अंमलबजावणीतील दरी हीच चिंतेची बाब ठरते. या धोरणाच्या मुळाशी जर डोकावले, तर असे दिसते की, यातून भारतातील सामाजिक, आर्थिक, भौगोलिक आणि सांस्कृतिक वास्तव नजरेआड केले गेले आहे.**

भारत हा शहरी नवमध्यमवर्गाच्या आकांक्षा पूर्ण करणारा देश नाही, तर तो बहुसंख्य अल्पभूधारक, गरिब, ग्रामीण आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांचा देश आहे. अशा देशात ह्यपाश्चिमात्यह्न शिक्षणधोरणांचे अनुकरण हे धोरणात्मक दुर्भाग्य आहे.

सन २०११ च्या जनगणनेनुसार, भारतातील एकूण लोकसंख्येपैकी सुमारे ६८.८४% लोक ग्रामीण भागात राहतात, तर ३१.१६% लोक शहरी भागात राहतात. याचा अर्थ असा की, भारतातील बहुसंख्य जनता ग्रामीण भागात राहते लाखो विद्यार्थी अजूनही दोन वेळचे अन्न, पिण्याचे स्वच्छ पाणी, आणि चांगली शाळा यासाठी संघर्ष करत आहेत. अशा परिस्थितीत शासनाने ₹नव्या धोरणांतर्गत₹ किती नवे शिक्षक नेमले? किती सरकारी शाळा उभ्या केल्या? या प्रश्नांची उत्तरे शून्यावर येऊन थांबतात.

आज एकीकडे सरकारी व अनुदानित शाळा बंद करण्याचा, तर खासगी, इंग्रजी माध्यमाच्या, विनाअनुदानित शाळा चालू करण्याचा व्यवस्थात्मक अजेंडा शासन राबवत आहे. ही दिशा केवळ बाजारीकरणाचीच नाही, तर कल्याणकारी राज्याच्या आत्म्यालाच दुर्लक्षित करणारी आहे. गरिबांच्या शिक्षणाचे हक्काचे व्यासपीठ सरकारच नष्ट करत असेल, तर सामाजिक न्याय, समतेची संकल्पना आणि ह्यसबका साथ, सबका विकास हे फक्त राजकीय घोषवाक्य ठरतात.

**शिक्षणाचा अधिकार आणि शासनाचे उत्तरदायित्व**

भारतीय संविधानाच्या कलम २१-अ नुसार प्रत्येक बालकाला ६ ते १४ वयोगटात मोफत व सक्तीचे शिक्षण मिळणे हा त्याचा मूलभूत अधिकार आहे. पण या अधिकाराला पूरक म्हणून आवश्यक असलेली व्यवस्थात्मक कुवत आपण उभी केली आहे का?

शिक्षक भरती प्रक्रिया थांबलेली आहे. शिक्षकांच्या १०० टक्के जागा भरल्या जात नाहीत. असंख्य जिल्हा परिषद शाळांमध्ये एकच शिक्षक कार्यरत आहे. मूलभूत सुविधांचा अभाव आहे. अभ्यासक्रम, प्रशिक्षण, शिक्षक व साधनसामग्री या बाबतीत शासनाचा अंमल केवळ कागदावर दिसतो.

स्थानिक अस्मिता, भाषिक गौरव, मातृभाषेतील शिक्षण यासंबंधी शासनाचा दृष्टिकोन कुठे आहे? आज इंग्रजी माध्यमातील शाळांमध्येच यशाचे गमक मानले जाते.

मराठी भाषेतील गुणवत्तावान शिक्षण राबवण्याऐवजी शासन इंग्रजी शाळा सुरू करत आहे. शिक्षणाचा उद्देश हा मातृभाषेतील सर्जनशील विचारांची अभिव्यक्ती आणि समज असावा की, फक्त जागतिक बाजारात काम मिळवण्याचे साधन? हाच प्रश्न राज्य शासनाने स्वतःला विचारायला हवा.

शाळा म्हणजे केवळ इमारत नाही, ती एक संस्कृती असते, स्वातंत्र्यानंतर निर्माण झालेल्या जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका यांच्या शाळांनी देशाला उत्तम नेते, प्रशासक, विचारवंत, डॉक्टर, शास्त्रज्ञ दिले. गावोगावी उभ्या राहिलेल्या या शाळा हे सामाजिक समतेचे, प्रगतीचे आणि लोकशाही शिक्षणाचे प्रतीक होत्या.

त्या काळात आर्थिक परिस्थिती हलाखीची असली तरी, शाळा गावाच्या जवळ होत्या, परवडणाऱ्या होत्या आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण पुरवत होत्या.

आज मात्र शासनाला या शाळा परवडत नाहीत. शिक्षणाच्या नावाखाली खाजगीकरण, केंद्रीकरण, डिजिटल विभाजन आणि स्पर्धात्मक बाजारशक्ती वाढत आहे. गावात रस्ता, ब्रिज, कॉम्प्लेक्स होतोय, पण शिक्षणाच्या शाळा मात्र बंद होतात. ही स्थिती एका उदासीन आणि बाजारपेठा चालवणाऱ्या व्यवस्थेची जाणीव करून देते.

**शिक्षणाचा उद्देश काय?**

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण**



**डॉ. प्रशांत विघे**
**राज्यशास्त्र विषयाचे लेखक**
**९३२६८७७७४९**

शिक्षण हे केवळ नोकरी मिळवण्याचे साधन नसून व्यक्तिमत्त्व घडवण्याची, सामाजिक समतेचा पाया रचण्याची आणि राष्ट्रीय अस्मितेची उभारणी करणारी प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया बाजारातील उत्पादन प्रणालीप्रमाणे आउटपुट ओरिएंटेड' म्हणजे 'फलनिष्पत्ती-केंद्रित' किंवा 'परिणाम-आधारित'. असू शकत नाही.

शिक्षणात मूल्ये, समता, न्याय, सर्जनशीलता आणि भाषिक गौरव यांचा समावेश हवा. राज्य शासनाने आणि केंद्र शासनाने शिक्षणाची दिशा केवळ जागतिक स्पर्धेसाठी नव्हे तर स्थानिक गरजांसाठी ठरवली पाहिजे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० वास्तवाचे विश्लेषण :**

**शिक्षक भरती व कमतरता :** मार्च २०२४ मध्ये अधिवेशनात लोकसभेत उत्तर देताना शिक्षण मंत्री म्हणाले की, देशात २०२३ अखेर पर्यंत ११.१६ लाख शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने मान्य केले आहे. आता तर २०२५ मध्ये १४ लाखापेक्षा जास्त शिक्षकाचा जागा रिक्त आहेत.

महाराष्ट्रात २०२३ मध्ये १.२५ लाख शिक्षकांची पदे रिक्त होते सध्या १,५०,००० पेक्षा जागा रिक्त असू शकतात. ज्यामुळे जिल्हा परिषद शाळांमध्ये 'एक शिक्षक झ्र सर्व वर्ग' ही स्थिती विद्यमान आहे. रिक्त जागांमुळे सर्वसामान्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. परिणामी, ज्या पालकांना समाजव्यवस्थेचे जाण आणि भान आहे, असे पालक आपला उदरनिर्वाह तुटपुंज्या उत्पन्नात करत असतानाही आपल्या मुलाला खाजगी शाळेत घालतात. कारण त्यांना आपल्या मुलाला शिकवायचे आहे, त्याचे भवितव्य घडवायचे आहे, हीच त्यांची महत्त्वाकांक्षा आहे.

मात्र, ही अशी भयावह परिस्थिती महाराष्ट्रात निर्माण झालेली असताना, जनप्रतिनिधी या प्रश्नाकडे दुर्लक्ष करतात, हे अत्यंत दुर्दैवी आहे. शिक्षण हक्काचा कायदा अस्तित्वात असतानाही, पुरोगामी महाराष्ट्रात मुलांचे शिक्षणच धोक्यात येणे ही बाब खेदजनक आणि शासनाच्या संवेदनशून्यतेचे द्योतक आहे. मात्र, हे सारे होत असताना राजकीय नेते, लोकप्रतिनिधी, आणि शिक्षण खात्याचे अधिकारी गप्प आहेत.

कोणत्याही अधिवेशनात शिक्षक भरतीवर ठोस योजना मांडली जात नाही. दरवेळी आश्वासनांचे ढग जमतात, पण शिक्षक भरतीचा पाऊस मात्र पडत नाही. शिक्षण ही राज्याची जबाबदारी असताना राज्यच जर आपल्या जबाबदारीपासून पळ काढत असेल, तर हा लोकशाहीचा पराभव नाही का?

आज गरज आहे ती शिक्षण क्षेत्राला सर्वोच्च प्राधान्य देण्याची. शिक्षक भरती प्रक्रियेला त्वरित गती देणे, रिक्त जागा तातडीने भरून शाळांना पुन्हा सक्षम बनवणे आणि शिक्षणाचा दर्जा टिकवून ठेवणे हे सरकारचे आद्य कर्तव्य आहे. शिक्षक ही केवळ एक नोकरी नसून, ती समाज परिवर्तनाची बीजं पेरणारी संस्था आहे, याची जाणीव शासनाला ठेवावी लागेल.

**भारतातील ११.१६ लाख शिक्षक पदांची कमतरता (मार्च २०२४ पर्यंत)**
**प्रमुख राज्यांमधील रिक्त पदांची विभागणी**

**राज्याचे नाव अंदाजे रिक्त शिक्षक पदे (२०२३ अखेर)**

| | |
|---|---|
| उत्तर प्रदेश २.१५ लाख | राजस्थान ७५ ,000 |
| बिहार २.०७ लाख | ओडिशा ७२ ,000 |
| पश्चिम बंगाल १.१७ लाख | छत्तीसगड ६२ ,000 |
| महाराष्ट्र १.२५ लाख | आंध्रप्रदेश ५३ ,000 |
| मध्यप्रदेश ८९ ,000 | इतर राज्ये १.११ लाख |
| झारखंड ८२ ,000 | |

**शाळा बंद होण्याची स्थिती आणि वास्तवचित्र :**

भारतातील २०१० ते २०२० या दहा वर्षांच्या कालावधीत देशभरात तब्बल १.५ लाख शाळा बंद झाल्या आहेत. महाराष्ट्रात दरवर्षी सरासरी ३०० ते५०० शाळा बंद होत असल्याचा अहवाल राज्य शिक्षण आयुक्तालयाकडून प्रसिद्ध करण्यात आला आहे.

ही आकडेवारी चिंताजनक असून, ग्रामीण व वंचित भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचा थेट परिणाम होत आहे. नीती आयोगाच्या २०२२ च्या शैक्षणिक गुणवत्तेच्या निर्देशांकानुसार, देशातील शाळांची पायाभूत स्थिती अतिशय दुबळी आहे. ३१% शाळांमध्ये शौचालये कार्यरत नाहीत, ४१% शाळांमध्ये सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध नाही, ५५ % शाळांमध्ये संगणक वा डिजिटल साधनांचा अभाव आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार इयत्ता ६वी पासून व्यावसायिक शिक्षण सुरू करण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात केवळ १२ % शाळांमध्येच व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. त्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षकच उपलब्ध नाहीत, आणि व्यावसायिक शिक्षकांची पदे तर अस्तित्वातच नाहीत. यामुळे ही योजना केवळ कागदोपत्री मर्यादित राहिली आहे.

३ फेब्रुवारी २०२५ रोजी शासन निर्णय काढून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठी भाषेसंदर्भात मोठा निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र सरकारने राज्यातील सरकारी आणि निमसरकारी कार्यालयांमधील सर्व अधिकारी, कर्मचारी यांना फक्त मराठीत बोलणे बंधनकारक केले आहे. यासंदर्भात जारी केलेल्या शासन निर्णयात स्थानिक स्वराज्य संस्था, सरकारी महामंडळे आणि सरकारी अनुदानित आस्थापनांमध्ये देखील मराठी बोलणे सक्तीचे आहे.

२०२४ मध्ये मराठी भाषा धोरणात मराठी भाषेचे जतन, संवर्धन, प्रचार, प्रसार व विकास होण्याच्या अनुषंगाने केवळ शिक्षणाचेच नव्हे तर सर्व लोकव्यवहाराचे होता होईल तेवढे मराठीकरण होणे आवश्यक आहे. त्यासाठी संवाद, संपर्क आणि सर्व स्तरावरील व्यवहारासाठी मराठी भाषेचा वापर करणे आवश्यक आहे, असे एकीकडे म्हणतात, दुसरीकडे इंग्रजी माध्यम शाळांची संख्या २०१० मध्ये ७,००० वरून २०२३ मध्ये १३,५०० वर पोहोचली, तर मराठी माध्यम शाळांची संख्या १९,०००, वरून घटून १४,५०० वर आली आहे.

हे परिवर्तन केवळ भाषिक नसून, सामाजिक आणि सांस्कृतिक ओळखीवरही परिणाम करणारे आहे.याकडे सरकार कधी लक्ष देणार हा अत्यंत चिंतनाचा प्रश्न आहे.

१५ मार्च २०२४ ला संच मान्यतेच्या संदर्भात नवीन निर्देश जाहीर केले अनेक मराठी शाळा आणि मराठी शाळेतील शिक्षक अतिरिक्त व्हायला लागले. परंतु या मराठी शाळा जिवंत राहिला पाहिजे यासाठीच कोणते धोरण शासन अवलंबताना दिसत नाही, मराठी शाळा कशा बंद करता येईल याचा षडयंत्र सरकारच्या माध्यमातून सुरू असल्यास सातत्याने लोकांमध्ये चर्चा होत आहे.

Unified District Inormation System for Educatina Plus च्या अहवालानुसार २०१० ते २०२३ या कालावधीत शासकीय शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या ३५% नी घटली, तर खासगी शाळांतील विद्यार्थी संख्या ४२ % नी वाढली. यामुळे शालेय शिक्षणाचे खाजगीकरण वाढत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

याच काळात भारत शिक्षणावर GDP च्या केवळ २.९ % इतका खर्च करतो, जे ठएढ ने शिफारस केलेल्या ६ % च्या निकषाच्या निम्म्यापेक्षाही कमी आहे. या सर्व आकडेवारीवरून स्पष्ट होते की राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी अत्यंत मर्यादित स्वरूपात होत आहे.

शिक्षकांची कमतरता, शाळांची पायाभूत सुविधांची दुर्दशा, स्थानिक भाषांचे दुर्लक्षण, शाळा बंद होण्याची वाढती प्रवृत्ती आणि शिक्षणाचे आक्राळविक्राळ खाजगीकरण ही सर्व अत्यंत गंभीर समस्या आहेत.

शैक्षणिक धोरण हे केवळ घोषणापत्र न राहता सामाजिक न्यायाचे प्रभावी हत्यार असले पाहिजे, ही आज देशवासीयांची रास्त आणि टोकदार अपेक्षा आहे. भारताच्या शैक्षणिक धोरणाला नव्या दृष्टिकोनाने तपासण्याची गरज आहे.

शिक्षणाच्या प्रश्नांमध्ये सामान्य नागरिक, पालक, शिक्षक, समाजशास्त्रज्ञ आणि विधिज्ञ यांचा सहभाग हवा. शासनाच्या प्रत्येक निर्णयावर प्रश्न विचारणारे, अभ्यास करणारे आणि सजग राहणारे नागरिक निर्माण झाले, तरच ख?या अर्थाने शिक्षण लोकशाहीचे माध्यम बनू शकेल. अन्यथा ही धोरणं केवळ घोषणाच राहतील.

# चैतन्याची सळसळती मशाल अरूणभाऊ अडसड

आज आदरणीय भाऊंचा वाढदिवस भाऊ आपणांस वाढदिवसाच्या शुभेच्छा....

पाण्यालाही पेटवणारा वक्ता,चैतन्याची सळसळती मशाल, प्रगल्भ विचार दिलदार मन रोखठोक भूमिका, प्रशुब्ध मनाची निशब्द हूंकार म्हणजे आदरणीय भाऊ विदर्भाची मुलख मैदानी तोफ, विकासाचा महामेरू, विदर्भाचा बुलंद आवाज, कार्यकर्त्यांना कार्यकर्ता नव्हे तर स्वतःच्या लेकराखेरीज सदैव पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे व्यक्तीमत्व म्हणजे आदरणीय अरूणभाऊ अडसड..



अरूणभाऊ अडसड विदर्भाचा बुलंद आवाज म्हणून ख्याती प्राप्त. ही ख्याती नव्हे तर तमाम कार्यत्यांनी भाऊंना घातलेली प्रेमळ साद आहे. ज्या व्यक्तीमत्वाने कित्येकांना घडवल कित्येकांना तारल कित्येकांची भवितव्ये घडवली. कारण सदैव मनी एकच विचार कार्यकर्ता हा कार्यकर्ता नसून आपल्याच कुटूंबातील सदस्य आहे अशी ज्यांची वागणूक, सर्वांस पोटास लावणे आहे, या छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रल्गभ विचाराचा हाच वारसा अंगी तेवत समाजात प्रत्येक घटकांत वावरतांना भाऊंची हि भूमिका आपणांस बघावयास मिळते.

*फिटे अंधाराचे जाळे*
*झाले मोकळे आकाश..*

बस याच काळ्या किभ्भीन्न अंधारात प्रकाशाचा एक ओघ एक प्रकाशाचा किरण स्वतःच बुलंद अस व्यक्तीमत्व निर्माण करणारा माणूस म्हणजे भाऊ, साधं आणि सरळ म्हणायचं झाल्यास दिवाणखान्यात लोक निरोपयोगी मनी प्लॅन्टला पाणी घालतात पण त्याच घराच्या त्याच दिवाणखान्याच्या गॅलरीमध्ये संबंध ताकतिनीशी चारही खाने चित करीत त्या सिमेंटच्या भिंतीला जणू भूकंपाचा हादरा बसावा त्याप्रमाणे सिमेंट फोडून पिंपळाप्रमाणे स्वबळावर स्वतःच एक आगळ वेगळ अस्तित्व निर्माण करत वरती येतो. ज्याला खत पाणी कोणीही घातलेल नसत तरी तो प्रस्थापित भिंती फोडून जगाला दाखवतो आपल स्वतंत्र अस्तित्व.

आता चंदेरी दूनियेचा काळ आहे. ज्यांना देश सुद्धा त्यावेळी स्विकारायला तयार नव्हता. आता असे कितीतरी लोक सांगतील दूनियेला वेड लावणारे, आता चालतीचा काळ आहे तो पडतीचा काळ होता आणि त्याकाळात विदर्भात ज्याच अस्तित्व नव्हतं ज्याच नावलौकिक विदर्भात उदयास नव्हतं त्याकाळात धामणगाव तालुक्यातच नव्हे तर संबंध विदर्भ आपल्या वाणीने, तेजोमय वृत्तीने, अथक संघषार्तून भारतीय जनता पक्षाचे नेतृत्व स्विकारत एक अशी कार्यकर्त्यांची माळ त्यांनी गुंफली की ती तुटता तुटेना. अखेर खरा विदभार्चा बुलंद आवाज उदयास आला.

त्या काळी भाऊंनी धुरा सांभाळत पक्षाला ज्या उच्चांकावर नेऊन ठेवले की जिथून आता परतीची तमा नाही. माझ्या शब्दांत भाऊंच वर्णन म्हणजे भारदस्त व्यक्तीमत्व, अत्यंत महत्वकांशी, धुरंधर राजकारणी, प्रभावी नेतृत्व आणि वकृत्वाने जनसमुदायाला आपलस करणारे व्यक्तीमत्व आमचे प्रितृतुल्य अरूणभाऊ अडसड.

प्रत्येक विजयात संघर्ष अन संघर्षात विजय म्हणजे भाऊ... प्रवाहाच्या विरूद्ध दिशेने पोहण्याच धाडस करून प्रवाह बदल्याणी अफाट ताकत म्हणजे भाऊ... आपल्या कार्यकर्त्यांना भरल्या अंतकरणाने सांगतात की आता रडायचं नाही तर लढायचं हा प्रबळ विश्वास आत्मविश्वास म्हणजे भाऊ... कार्यकर्त्यांना पाठीवर शाबासकीची थाप मारली की त्याला देवरूपी आशीवार्दाचा भास म्हणजे भाऊ... दुर्भाग्याच रूपांतर भाग्यात करणारा परिवर्तनवादी विचार म्हणजे भाऊ... कधी अडवाणी कधी अटलजी तर कधी मोदीजींच्या खांद्यास खांदा लावून लढणारा माणूस म्हणजे भाऊ... बहिरमच्या यात्रेत शेतकऱ्यांसाठी गोळ्या झेलणारा माणूस म्हणजे भाऊ... शिमला कराराच्या वेळेस तुरूंगवास भोगणारा माणूस म्हणजे भाऊ... साधू संताच्या चरणी नतमस्तक होणारा माणूस म्हणजे भाऊ... सरतेशेवटी कधी काळ्या पैशाच्या अभावी तर कधी स्वतःच मोठ्या केलेल्या आपल्याच माणसांच्या फितुरीपणानी हरणारा माणूस म्हणजे भाऊ... ज्याची किर्ती आणि यशोगाथा आज मला लिहताना कुठे आनंद तर अश्रू अनावर होतात तर शब्द अपूरे पडतात असे हे अफाट व्यक्तीमत्व म्हणजे भाऊ आदरणीय अरूणभाऊ...

भाऊ आपणांस जुना धामणगाव देशमुख परिवाराकडून वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दीक हार्दीक शुभेच्छा....



**वैभव मीनाक्षी सुभाषराव देशमुख**
**जुना धामणगाव, जि.अमरावती.**
**एक कार्यकर्ता**
**९६६५७९६१२४**

# सामान्य माणूस आणि विश्व बँक

सामान्य माणसाला बँक हा शब्द फक्त बचतीचे पासबुक त्यातील सरकारी योजनेचे खात्यात जमा झालेले पैसे, मासिक पगार, पेन्शन, ठेवीवरील व्याज, आवर्त ठेव, गृह कजार्चा हप्ता एवढ्याच पुरता शक्यतो मर्यादित असतो. वर्ल्ड बँक म्हणजेच विश्व बँक याविषयी तर वर्तमानपत्रातून किंवा वृत्तवाहिन्यांवरून कानावर पडते तेवढेच. आपल्या दैनंदिन आयुष्याशी याचा काय संबंध? याचा आपल्याला काय उपयोग असे अनेक वेळा प्रश्न पडतात. १ जुलै विश्व बँकेच्या स्थापना दिनानिमित्त हा लेख सामान्य माणूस आणि विश्व बँक यांच्यातील नात्याचा वेध घेण्यासाठी लिहीत आहे. सदर लेख लोकांच्या अधिकारांविषयी जागरूक करतो. त्याचा उद्देश कोणावरही टीका नसून आपल्या लोकशाही प्रक्रियेचा भाग मजबूत करणे आहे .

---

विश्व बँकेची स्थापना १ जुलै १९४४ रोजी अमेरिकेतील ब्रेटन वुड्स या शहरात झालेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेवेळी झाली. या परिषदेत भारतासह ४४ देशांच्या प्रतिनिधींनी भाग घेतला होता.

बँकेचा मूळ हेतू दुसऱ्या महायुद्धानंतर नुकसान झालेल्या देशांच्या पुनर्बांधणीसाठी आर्थिक मदत करणे हा होता. ही संस्था आंतरराष्ट्रीय पुनर्बांधणी आणि विकास बँक (IBRD) म्हणून ओळखली जात होती. नंतर ती विश्व बँक गट म्हणून विकसित झाली ज्यामध्ये आज खालील पाच संस्था आहेत. आय बी आर डी, आय डी ए, आयएफसी, एम आय जी ए, आणि आयसीएसआयडी.

आज विश्व बँक विकसनशील देशांना कर्ज, ,तांत्रिकसहाय्य, ज्ञान व धोरणात्मक मार्गदर्शन पुरविते. बँकेचे मूळ उद्दिष्टे दारिद्र्य निर्मूलन, शाश्वत विकास, आरोग्य, शिक्षण, पाणी,ऊर्जा, पायाभूत सुविधा, पर्यावरण, संरक्षण यांना मदत करणे हा आहे. आज एकूण १८९ देश विश्व बँकेचे सभासद आहेत.

भारत २७ डिसेंबर १९४५ रोजी विश्व बँकेचा अधिकृत सदस्य बनला. सदस्यत्वानंतर भारताने १९४९ मध्ये पहिले कर्ज रेल्वे पुनर्बांधणीसाठी घेतले. सन २०२४ अखेरपर्यंत भारताने विश्व बँकेकडून एकूण सुमारे १०५ अब्ज डॉलर इतकी मदत कर्ज व अनुदानासह घेतली आहे. ग्रामीण रस्ते, जलसंपदा व्यवस्थापन, आरोग्य, शिक्षण, शहरी पायाभूत सुविधा, हरित ऊर्जा ,डिजिटल प्रकल्प इत्यादीसाठी हे कर्ज घेतले आहे.

विश्व बँक देशांना कर्ज देताना काही अटी व सामाजिक जबाबदा?या यांची बंधनेही घालते. ज्यात पर्यावरण संरक्षण, पुनर्वसित नागरिकांचा हक्क, पारदर्शक प्रशासन, स्थानिक जनतेचा सहभाग अशा प्रमुख बाबी असतात जे पाळणे कर्ज घेतलेल्या देशाला बंधनकारक असते. प्रकल्प मंजूर करताना प्रभावित नागरिकांवर काय परिणाम होईल, पर्यावरणावर कसा परिणाम होईल हे सर्व पैलू तपासले जातात. हे प्रकल्प अनेक वेळा स्थानिक जनतेच्या जीवनावर, पर्यावरणावर व उपजीविकेवर परिणाम करू शकतात. हे परिणाम नकारात्मक ठरत असतील तर जनतेला तक्रार नोंदविण्याचा अधिकार असतो.



**संदीप यशवंत मोने**
**8698779546**

कोणत्याही सार्वजनिक प्रकल्पामुळे नुकसान झाल्यास किंवा अन्याय होत असल्यास प्रकल्पग्रस्तास न्याय मागण्यासाठी शासन व न्यायपालिका या दोन घटनात्मक मार्गांचा अवलंब करता येतो. मात्र या तक्रारीच्या निवारणाला नेहमीच ठोस काल मर्यादा नसते. न्यायालयीन प्रक्रिया वर्षानुवर्षे चालू शकते. प्रशासकीय यंत्रणांमध्येही अनेक वेळा विलंब होऊ शकतो. अशावेळी विशिष्ट कालमर्यादेनुसार काम करणारी व पारदर्शकतेचा आग्रह धरणारी विश्व बँकेची जी आर एस प्रणाली (GRS) एक प्रभावी पर्याय ठरू शकते.

स्थानिक आणि राष्ट्रीय पातळीवरील अनेक प्रकल्पांमध्ये तक्रारीचे निवारण केवळ प्रशासकीय व कायदेशीर प्रक्रियेवर अवलंबून रहात नाही. अनेकदा त्यावर राजकीय समीकरणांचा ही प्रभाव जाणवतो. विश्व बँकेकडून घेतलेले कर्ज सरकारचे असले तरी त्याची परतफेड थेट सरकारी महसुलातून म्हणजेच नागरिकांनी भरलेल्या करातून केली जाते. मग तो थेट कर असो किंवा अप्रत्यक्ष कर असो.

या माध्यमातून जमा होणारा निधी हे कर्ज फेडण्यासाठी वापरला जातो . त्यामुळे या प्रकल्पाबाबत विशेषतः त्यांच्या अंमलबजावणीतील त्रुटींबाबत प्रश्न विचारण्याचा अधिकार सामान्य जनतेचा आहेच.

तक्रार, चौकशी किंवा पुनर्विचारासाठी उपलब्ध असलेला विश्व बँकेचा हा तिसरा दरवाजा अजूनही अनेकांसाठी अपरिचित आहे. या दरवाजाचे नाव आहे वर्ल्ड बँक ग्रीव्हियन्स रिड्रेस सिस्टीम. या प्रणालीचा जन्म १० वर्षांपूर्वी झाला.

सन २०२४ या वर्षात जागतिक पातळीवर ७२३ तक्रारी या संस्थेस प्राप्त झाल्या. सन २०२३ च्या तुलनेत यात सुमारे ३४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. याचाच अर्थ या तक्रार प्रणालीची विश्वासार्हताही वाढली आहे .

जागतिक बँक, कर्ज घेणारे देश आणि बाह्य भागधारकांच्या सक्रिय सहभागामुळे तक्रारींचे निराकरण करण्यात जीआरएसला यश प्राप्त झाले आहे. यामुळे प्रकल्पग्रस्त आणि जागतिक बँकेमध्ये विश्वास निर्माण झाला आहे . जीआरएस प्रणाली ही जागतिक बँकेकडे थेट तक्रारी करण्याचा एक मार्ग आहे .

तुम्ही grievances @worldbank.org या संकेतस्थळावर तुमची तक्रार नोंदवू शकता. तक्रार कोणत्याही भाषेत करता येते. एक व्यक्तीही तक्रार नोंदवू शकते. नोंदविलेल्या तक्रारीबाबत पूर्ण गोपनीयता बाळगली जाते. प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींचे मूल्यांकन करण्यात येते. जीआरएस कडे प्राप्त झालेल्या अनेक तक्रारींचा संबंध हा भूसंपादन प्रक्रियेशी असतो.

येथे केवळ जागतिक बँकेने कर्ज दिलेल्या प्रकल्पांची तक्रार स्वीकारण्यात येते. जे प्रकल्प होऊ घातले आहेत किंवा त्यांचे काम चालू आहे तसेच १५ महिन्यापेक्षा कमी काळाकरिता बंद असलेल्या प्रकल्पांचीच दखल घेण्यात येते. तक्रार स्वीकारल्यानंतर प्रकल्पाचा आढावा घेण्याकरिता पथक नेमण्यात येते.

सदरचे पथक तक्रारींची गंभीर दखल घेऊन काम करते. एकाच प्रकल्पाबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्यास जागतिक बँक संबंधित देशाच्या सरकारला जाब विचारून योग्यती कार्यवाही करावयास भाग पाडते . काही तक्रारींची दखल घेऊन जागतिक बँकेने प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याच्या दृष्टीने अतिरिक्त भरपाई मिळवून दिली आहे.

कोणतेही प्रकल्प जाहीर झाल्यावर जमीन अधिग्रहणाबाबत प्रकल्पग्रस्तांना सरकारकडून कळविले जाते. तसेच त्यांच्या काही हरकती असल्यास त्याची नोंद करण्यात येते. सरकार प्रकल्पग्रस्तांच्या या हरकतींवर सुनावणी घेते. हीच वेळ साधून प्रकल्पग्रस्तांनी सरकारने सदर प्रकल्पासाठी जागतिक बँकेकडून कर्ज घेतले आहे का? याची विचारणा करायला हवी. त्याबाबतची कागदपत्रांची मागणी करायला हवी. जागतिक बँकेला तक्रार करणे म्हणजे आपल्या देशाचे विषय बाहेर चव्हाट्यावर आण्यासारखे बिलकुल ठरणार नाही. तो आपला अधिकार आहे. शेवटी कर्ज देणारे तेच आहेत. त्यांच्यापर्यंत या गोष्टी पोहोचायलाच हव्यात. हे कळविल्यामुळे विश्व बँकेला काही आवश्यक ध्येयधोरणे बदलण्यास ही मदत मिळेल.

आपण पुढे जात असताना आपल्या देशात, राज्यात जिल्ह्यात आणि आपल्या तालुक्यात विश्व बँकेच्या निधीतून चालू असलेल्या प्रकल्पांची माहिती ठेवणे आणि सतर्क राहणे अत्यंत गरजेचे आहे .विकास आवश्यक आहे पण तो सर्वसमावेशक, पारदर्शक असला पाहिजे. खरा प्रश्न विकास व्हावा का? असा नसून तो कसा व्हावा असा आहे .

हे लक्षात ठेवा खरा विकास म्हणजे फक्त रस्ते किंवा पूल बांधणे नव्हे तर विश्वास, न्याय आणि सर्वांसाठी संधी निर्माण करणे हा आहे .तुमचा आवाज महत्त्वाचा आहे त्याचा योग्य वापर करा आणि बदल घडवा. तर बघा हा विश्व बँकेचा तिसरा दरवाजा ठोठावून.



# नाश्त्यात बनवा आरोग्यदायी आणि चविष्ट पदार्थ

नाश्ता हा दिवसातला सगळ्यात पहिला आहार असतो. दिवसाची सुरूवात करताना नाश्ता हा पोटभर करायचा असतो आणि त्याचवेळी पौष्टिक असणं फार महत्वाचं आहे. अशातच आपण रोज असा नाश्ता करावा जो आपल्या शरीराला आवश्यक सर्व पोषण त्यात मिळतील. त्यातच रोज नाश्ताला काय बनवायचं हे प्रत्येक महिला रोजचा प्रश्न पडत असतो. त्यात घरातील मंडळी हे दररोज नाश्त्यात काहीतरी नवीन असेल तर सगळ्यांनाच ते खायला खूप आवडतं. त्यात घरच्यांना काहीतरी पौष्टिक खाऊ घालावं असं महिलांना वाटत असतं.

१. जर काही हेल्दी खायचे असेल आणि ते पदार्थ चविष्टही हवे असेल, तर ओट्स विथ फ्रूट्स ॲंड सीड्स पासून तयार नाश्ता तुमच्यासाठी एक चांगला पर्याय आहे. ते बनवण्यासाठी ओट्स ५-७ मिनिटे दुधात उकळवा.

ते थंड झाल्यावर त्यावर बारीक तुकडे केलेली फळे, चिया/अळशीचे बिया आणि ड्रायफ्रुट्स मिक्स करा. चव वाढवण्यासाठी तुम्ही थोडे मध देखील त्यात टाकू शकता. हा पौष्टिकतेने समृद्ध नाश्ता पचनापासून ते ऊर्जा वाढवण्यापर्यंत सर्व गोष्टींसाठी खूप चांगला आहे.

२. ग्रीक दही पार्फे हा पदार्थ नाश्त्यात खाण्यासाठी एक अतिशय चविष्ट आणि आरोग्यदायी पर्याय आहे. उन्हाळ्यात ग्रीक दही पार्फे हा पदार्थ खाणे आणखी फायदेशीर आहे. यासाठी प्रथम एका ग्लासमध्ये दह्याचा थर टाका. नंतर ग्रॅनोला, नंतर फळे आणि वरून त्यावर मध आणि सीड्स टाका. त्यानंतर हे ५ मिनिटे फ्रीजमध्ये ठेवा आणि सर्व्ह करा. उच्च प्रथिने, हेल्दी फॅट आणि फायबरने भरलेला हा नाश्ता चवीलाही अद्भुत आहे.


३. होल ग्रेन टोस्टसह व्हेजिटेबल ऑम्लेट बनवण्यासाठी, अंडी फेटून त्यात चिरलेल्या भाज्या, मीठ आणि मिरपूड टाका. नॉन-स्टिक पॅनवर तेल लावा आणि ऑम्लेट बनवा. टोस्टसोबत सर्व्ह करा. अंडी प्रथिनांचा एक उत्तम स्त्रोत आहे तर ब्रेडमध्ये फायबर असते. पौष्टिकतेने समृद्ध हा नाश्ता चवीलाही खूप चांगला आहे.

४. पॅनकेक्स फक्त मुलांनाच आवडत नाहीत तर मोठ्यांनाही आवडतात. ते हेल्दी पद्धतीने बनवण्यासाठी तुम्ही त्यात बेसन वापरू शकता. ते बनवण्यासाठी तुम्हाला बेसनाच्या पिठात कांदा, टोमॅटो आणि हिरवी मिरची मिक्स करा आणि त्यात हळद, मीठ आणि जिरे टाकूल चांगले मिक्स करा. थोडे तेल लावून ते तव्यावर टाकून शिजवून दोन्ही बाजुंनी चांगले भाजा. वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठी हा कमी कार्ब आणि हेल्दी फॅटचा नाश्ता चांगला आहे.

५. मल्टीग्रेन टोस्टवर बनवलेला ॲव्होकॅडो देखील खूप चविष्ट असतो. हा नाश्ता तयार करण्यासही कमी वेळ लागतो. यासाठी, तुम्ही फक्त ॲव्होकॅडो मॅश करा आणि त्यात मीठ, लिंबू आणि मिरची टाका. आता हे मिश्रण टोस्टवर पसरवा. त्यात हेल्दी फॅट असतात जे हृदयाच्या आरोग्यासाठी आणि वजन कमी करण्यासाठी फायदेशीर असतात.

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



### आंधळं दळतय अन..!

आंधळ दळतय
कुत्रं पिठ खातय
शासकीय योजनेचं
हे असच असतय ... !
रेशनचं धान्य असो की
लाडकी बहीण योजना
पात्र लाभार्थाच्या पदरात
पडतेय का ते पहा ना?

योजनांचा हेतू खरचं
कितपत होतोय सफल
पुनर्मुल्यांकनाची शासन
कां घेत नाही दखल?

# आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफने युवा तरुणांसाठी एक मार्केट लिंक्ड उत्पादन लाँच

**नागपूर, ३० जून :** आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफ इन्शुरन्सने आयसीआयसीआय प्रु स्मार्ट इन्शुरन्स प्लॅन प्लस हे एक मार्केट-लिंक्ड उत्पादन लाँच केले आहे, जे ग्राहकांना दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्यासाठी सक्षम बनवते.

हे उत्पादन फक्त १००० रुपयांच्या मासिक प्रीमियममध्ये खरेदी करता येते, ज्यामुळे तरुण ग्राहकांचा मोठा वर्ग नियमितपणे गुंतवणूक करून आपले दीर्घकालीन आर्थिक उद्दिष्टे साध्य करू शकतो. या उत्पादनामध्ये जीवन विमा संरक्षणाचा एक घटक देखील समाविष्ट आहे, जो ग्राहकाच्या कुटुंबाला आर्थिक सुरक्षा प्रदान करतो.

अमित पालटा, चीफ प्रॉडक्ट आणि डिस्ट्रीब्युशन ऑफिसर, आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाईफ इन्शुरन्स यांनी सांगितले, भारत ही सर्वाधिक वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था आहे आणि मॉर्गन स्टॅन्लीच्या मते, २०२८ पर्यंत ती जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनेल. भारताची ही प्रगती मुख्यतः तरुण वर्गामुळे घडत आहे, जो सुमारे ६५% लोकसंख्येचा हिस्सा आहे. युएलआयपी उत्पादने त्यांच्या रचनेनुसार संपत्ती निर्मितीसाठी प्रभावी साधने आहेत आणि तरुणांनी लवकर गुंतवणूक सुरू करावी आणि दीर्घकालीन गुंतवणुकीसाठी प्रेरित व्हावे यासाठी आम्ही आयसीआयसीआय प्रु स्मार्ट इन्शुरन्स प्लॅन प्लस हे उत्पादन लाँच केले आहे. हे उत्पादन परवडणारे, कर-बचतक्षम असून तरुणांना केवळ १००० रुपये मासिक गुंतवणुकीसह सुरुवात करता येते.

या उत्पादनाचा प्रमुख ग्राहक वर्ग हा डिजिटल प्लॅटफॉर्मवर ब्रँड व उत्पादने वापरण्यास प्राधान्य देतो हे लक्षात घेऊन आम्ही पूर्णपणे डिजिटल खरेदी प्रक्रिया सुलभ केली आहे.

आयसीआयसीआय प्रु स्मार्ट इन्शुरन्स प्लॅन प्लस हे उत्पादन ग्राहकांना २५ फंड्स आणि ४ पोर्टफोलिओ स्ट्रॅटेजीजचा पर्याय देते. याशिवाय, ग्राहक कोणतेही अतिरिक्त शुल्क किंवा कराशिवाय एक फंड सोडून दुसऱ्या फंडमध्ये स्विच करू शकतात, ज्यामुळे ते आपल्या संपत्तीचे वाटप अधिक चांगल्या प्रकारे नियंत्रित करू शकतात. या उत्पादनामध्ये जीवन विमा कव्हर देखील समाविष्ट आहे. विशेष म्हणजे, ग्राहक वेव्हर ऑफ प्रीमियम हे ॲड-ऑन बेनिफिट पर्याय निवडू शकतात, जे पॉलिसीधारकाच्या अनुपस्थितीत देखील त्यांचे दीर्घकालीन बचतीचे उद्दिष्ट कायम राहण्यास मदत करते.

पालटा पुढे म्हणाले, या उत्पादनाच्या लाँचद्वारे आमचे लक्ष ग्राहकांच्या बदलत्या गरजा पूर्ण करणारी उत्पादने तयार करण्यावर आहे. हे किफायतशीर उत्पादन व्यक्तींना लवचिकता, स्पष्टता आणि मानसिक शांततेसह त्यांच्या भविष्याची योजना आखण्यास सक्षम बनवते.

# पाइन लॅब्स लिमिटेडने सेबीकडे दाखल केले डीआरएचपी

**मुंबई, ३० जून :** पाइन लॅब्स लिमिटेड (कंपनी) ही व्यापाऱ्यांसाठी, ग्राहक ब्रँड्ससाठी, उद्योगांसाठी आणि वित्तीय संस्थांसाठी डिजिटल पेमेंट्स व इश्यूइंग सोल्युशन्सद्वारे व्यवसायाचे डिजिटायझेशन करणारी एक टेक्नॉलॉजी कंपनी आहे. कंपनीने आपला ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस बाजार नियामक भारतीय सिक्युरिटीज आणि एक्स्चेंज बोर्ड कडे दाखल केला आहे.

या इश्यूमध्ये एकूण २६,००० दशलक्ष (२,६०० कोटी)चा नवीन समभाग विक्री प्रस्ताव (फ्रेश इश्यू) आणि विक्री करणाऱ्या भागधारकांकडून एकूण १४,७८,२२,२२५ इक्विटी शेअर्सच्या विक्रीचा प्रस्ताव (ऑफर फॉर सेल) समाविष्ट आहे.

पाइन लॅब्सने ३१ डिसेंबर २०२४ रोजी संपलेल्या ९ महिन्यांच्या कालावधीत एकूण ७,५३१.०५ अब्ज ग्रॉस ट्रान्झॅक्शन व्हॅल्यू आणि ३.९७ अब्ज व्यवहार आपल्या प्लॅटफॉर्म्सद्वारे प्रक्रिया केले. ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत कंपनीकडे ९,१५,७३१ व्यापारी, ६६६ ग्राहक ब्रँड्स व एंटरप्रायझेस आणि १६४ वित्तीय संस्था होत्या, ज्या तिचे प्लॅटफॉर्म वापरून व्यवहार जलद, सुरक्षितपणे आणि सुलभतेने करत होत्या व त्यांचे व्यवसाय व्यवस्थापित करत होत्या.

पाइन लॅब्स आपल्या डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर आणि ट्रान्झॅक्शन प्लॅटफॉर्म, तसेच इश्यूइंग आणि ॲक्वायरिंग प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून अनेक सेवा पुरवते. रेडसीयर रिपोर्टनुसार, भारतात, जो की कंपनीचा मुख्य बाजार आहे, आर्थिक वर्ष २०२४ मध्ये ट्रान्झॅक्शन व्हॅल्यूच्या दृष्टीने पाइन लॅब्स ही क्लोज्ड आणि सेमी-क्लोज्ड लूप गिफ्ट कार्ड इश्यू करणारी सर्वात मोठी कंपनी ठरली.

त्याचप्रमाणे, डिजिटल कंझ्युमर पॉइंट्स वर डिजिटल अफॉर्डेबिलिटी सोल्युशन्स पुरविणारी सर्वात मोठी कंपनी, भारतातील टॉप ५ इन-स्टोअर डिजिटल प्लॅटफॉर्म्सपैकी एक आणि भारत कनेक्ट ट्रान्झॅक्शन्स प्रोसेसिंग सेवा पुरविणाऱ्या अग्रगण्य कंपन्यांपैकी एक म्हणूनही कंपनीची ओळख निर्माण झाली आहे, असे रेडसीयरच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

रेड हेरिंग प्रॉस्पेक्टसद्वारे ऑफर करण्यात येणारे इक्विटी शेअर्स बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड या दोन्ही प्रमुख शेअर बाजारांवर सूचिबद्ध करण्याचा प्रस्ताव आहे. (सूचिबद्धतेचा तपशील)

या इश्यूसाठी बुकरनिंग लीड मॅनेजर्स म्हणून ॲक्सिस कॅपिटल लिमिटेड, मॉर्गन स्टॅन्ली इंडिया कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, सिटीग्रुप ग्लोबल मार्केट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, जे.पी. मॉर्गन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड आणि जेफरीज इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपन्या कार्यरत आहेत.

# जिल्ह्यात आज 'अटल पेन्शन योजना पंजीकरण दिवस'

**बुलडाणा, ३० जून :** केंद्र सरकारच्या आर्थिक सेवा विभागाच्या निर्देशानुसार १ जुलै ते ३० सप्टेंबर दरम्यान 'वित्तीय समावेशन मोहीम' जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत स्तरावर राबविण्यात येणार आहे. या मोहिमेंतर्गत १ जुलै रोजी 'अटल पेन्शन योजना पंजीकरण दिवस' म्हणून साजरा केला जाणार आहे.

समाजातील वंचित घटकांना औपचारिक वित्तीय सेवांमध्ये सामावून घेणे व त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार या दिवशी जिल्ह्यातील २५ नागरिकांचे अटल पेन्शन योजनेंअंतर्गत नोंदणीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. याकरिता जिल्ह्यातील सर्व बँक शाखांना प्रत्येकी १०० अटल पेन्शन योजना नोंदणीचे उद्दिष्ट, तर सर्व बँकिंग प्रतिनिधींना प्रत्येकी २५ नोंदणीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.

अटल पेन्शन योजना ही केंद्र शासनाची योजना असून, १८ ते ४० वयोगटातील सर्व नागरिकांसाठी खुली आहे. या योजनेअंतर्गत नियमित मासिक प्रीमियम भरल्यास वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर निश्चित मासिक पेन्शन दिली जाते.

जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी १ जुलै रोजी आपल्या जवळच्या बँक शाखा किंवा बीसी केंद्रावर जाऊन अटल पेन्शन योजना साठी नोंदणी करावी आणि वृद्धापकाळात आर्थिक सुरक्षिततेचा आधार मिळवावा. तसेच या उपक्रमाचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक यांनी केले आहे.

# सेलिब्रिटी कॅपिटल आणि ईव्ही क्रांती: सुनील शेट्टी, केएल राहुल, अहान शेट्टी आणि अक्षै वर्डे एकत्र येऊन सादर करतात एक्सेलमोटो



**मुंबई, ३० जून :** भारतात इलेक्ट्रिक मोबिलिटी आता अधिक वेगवान, स्वच्छ, स्टायलिश आणि महत्त्वाकांक्षी बनली आहे. एक्सेलमोटो ची स्थापना प्रसिद्ध Designer and Automative Entrepreneur अक्षै वर्डे यांनी केली असून, या उपक्रमाला अभिनेता-उद्योजक-मार्गदर्शक सुनील शेट्टी, क्रिकेट स्टार केएल राहुल आणि तरुणांचा आयकॉन अहान शेट्टी यांचा पाठिंबा आहे ज्यामुळे विश्वासार्हता, कूलनेस आणि पिढ्यानपिढ्यांचा प्रभाव एकत्र येतो.

एक्सेलमोटोने जून २८ पासून प्री-ऑर्डर विंडो सुरू करण्याची घोषणा केली आहे. प्रथम ९९९ ईबाईक साठी ४९९ मध्ये बुकिंग उपलब्ध आहे अधिकृत वेबसाइटवर: डब्लूडब्ल्यूडब्ल्यू.एक्सेलमोटो.कॉम

या पारंपरिक इलेक्ट्रिक स्कूटर्स नाहीत या ईबाईक आहेत, ज्या पेडल असिस्ट प्रणालीसह येतात, ज्यामुळे वापरकर्ते ॲक्टिव राहू शकतात आणि त्यांचा कार्बन फूटप्रिंट लक्षणीयरीत्या कमी होतो. या सेगमेंटमधील किमीप्रती खर्चातही हे ईबाईक सर्वात किफायतशीर आहेत. यांचे डिझाइन पेटंटेड असून मोटरसायकलसारख्या स्टायलिश डिझाइनसह सायकलसारखी चपळता आणि सोय मिळते. उच्च दर्जाच्या पार्ट्ससह तयार केलेली ही ईबाईक संपूर्ण भारतात तयार केली जाते आणि फक्त कार्यक्षमतेत नव्हे, तर डिझाईन व फिट-फिनिशमध्येही वर्ल्ड-क्लास आहे. हे परफॉर्मन्स, स्टाईल आणि टिकाऊपणा यांचे परिपूर्ण मिश्रण आहे.

संस्थापक आणि सीईओ अक्षै वर्डेम्हणाले, एक्सेलमोटो ही केवळ ईव्ही नाही ही एक चळवळ आहे. हाय-डिझाईन, स्मार्ट, मोबाईलइतकी अंतर्ज्ञानी आणि परवडणारी ईबाईक तयार करणे हेच आमचे ध्येय आहे. भारतासाठी तयार केलेली, भारतीय आयकॉन्सने समर्थित अशी ही ईबाईक फ्युचर मूव्हमेंटचे प्रतीक आहे.

# अदानी ग्रुपचे चेअरमन गौतम अदानी यांच्या ६३व्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

**गोंदिया, ३० जून :** २४ जून रोजी अदानी समूहाचे चेअरमन गौतम अदानी यांचा ६३वा वाढदिवस साजरा करण्याच्या निमित्ताने, अदानी ग्रुपची सामाजिक कल्याण आणि विकास शाखा असलेल्या अदानी फाउंडेशनने देशभरातील २१ राज्ये आणि २ केंद्रशासित प्रदेशांतील २०६ शहरांमध्ये भव्य रक्तदान मोहीम आयोजित केली. ही मोहीम मागील वर्षीच्या २५,२८२ युनिट्सच्या विक्रमावर मात करत विक्रमी ठरली आहे.

अदानी हेल्थकेअर टीमच्या नेतृत्वाखाली राबवलेल्या या मोहिमेत अदानी समूहाचे कर्मचारी आणि भागीदार यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवला. या मोहिमेत २७,६६१ युनिट्स (सुमारे ११,१०० लिटर) रक्त संकलित झाले असून, यामुळे ८३,००० हून अधिक रुग्णांना लाभ होणार आहे. या संकलित रक्तामधून पूर्ण रक्त, पीसीव्ही, प्लेटलेट कॉन्सेंट्रेट्स, प्लाझ्मा, एफएफपी, क्रायोप्रेसिपिटेट आणि अल्ब्युमिन असे विविध रक्तघटक उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, जे रुग्णांना जीवनदायी उपचारासाठी उपयुक्त ठरतील.

अदानी फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. प्रीती अदानी म्हणाल्या, या सेवाभावी उपक्रमात पुढे येऊन सहभाग नोंदविलेल्या आपल्या अदाणी परिवाराचे मी मनःपूर्वक आभार मानते. आपल्या उदारतेमुळे असंख्य जिवांचे आयुष्य उजळणार आहे.

ही मोहीम रेड क्रॉस ब्लड बँक आणि शासकीय रुग्णालयांच्या सहकार्याने राबवली गेली. या मोहिमेला अदानी समूहातील




३,००० हून अधिक डॉक्टर, पॅरामेडिक्स, डेटा ऑपरेटर्स आणि प्रशासनिक कर्मचारी यांनी पाठिंबा दिला.

पहिल्यांदाच हा उपक्रम आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचला, जिथे कोलंबो वेस्ट इंटरनॅशनल टर्मिनल पोर्ट, कोलंबो आणि दार-एस-सलाम पोर्ट, टांझानिया येथेही रक्तदान शिबिरे आयोजित करण्यात आली, ज्यामध्ये १०० हून अधिक रक्तदात्यांनी या पुण्यकार्यामध्ये सहभाग घेतला.

हा उपक्रम २०११ सालापासून दरवर्षी श्री गौतम अदाणी यांच्या वाढदिवसानिमित्त एक परंपरा म्हणून राबवला जात आहे. सेवा ही साधना आहे या श्री आदाणी यांच्या मार्गदर्शक तत्त्वज्ञानाला अदानी फाउंडेशनच्या समाजाभिमुख उपक्रमांद्वारे आदरांजली अर्पण करण्यात येते. अदानी समूहाची ही सामाजिक संस्था समुदायांच्या सर्वसमावेशक, न्याय्य आणि शाश्वत विकासासाठी कटिबद्ध आहे.

# ओप्पो लॉन्च करत आहे के१३एक्स ५जी अत्यंत मजबूत आणि टिकाऊ स्मार्टफोन



**अमरावती, ३० जून :** ओप्पो इंडिया ने ओप्पो के१३एक्स ५जी फोन दाखल केला आहे, हा या सेगमेन्टमधील सगळ्यात दणकट स्मार्टफोन आहे. टिकाऊपणा आणि तडजोड न करता सर्व फंक्शन्सची अपेक्षा ठेवणारे तरुण विद्यार्थी आणि नवे नवे व्यावसायिका यांच्यासाठी प्राधान्याने हा फोन बनवण्यात आला आहे. लवचिकता असलेल्या के१३एक्स ५जी मध्ये एसजीएस गोल्ड ड्रॉप सर्टिफिकेशन आणि एमआयएल-एसटीडी ८१०एच मिलिटरी-ग्रेड स्टँडर्ड आहेत. त्यामुळे या श्रेणीतील हा सगळ्यात दणकट फोन बनला आहे. एरोस्पेस-ग्रेडच्या एएम०४ ॲल्युमिनियम मिश्रधातूमधून याची ३६०ओ डॅमेज प्रूफ आर्मर बॉडी बनवण्यात अली आहे. क्रिस्टल शील्ड ग्लासने त्याला मजबुती दिली आहे आणि समुद्री स्पन्जने प्रेरित बायोमिमेटिक स्पॉन्ज शॉक अब्जॉर्प्शन सिस्टम मुळे हा फोन आणखी प्रगत बनला आहे. स्टाइल किंवा उपयोगिता यांच्याशी तडजोड न करता, ओप्पो के१३एक्स ५जी ने आयपी६५ वॉटर आणि डस्टरेझिस्टन्ससह टिकाऊपणा आणि बिजोड मजबुतीच्या बाबतीत एक नवीन मापदंड स्थापित केला आहे.

ओप्पो के१३एक्स ५जी च्या ४जीबी+१२८जीबी व्हेरियन्टची किंमत ११,९९९ रु., ६जीबी+१२८जीबी व्हेरियन्टची किंमत १२,९९९ रु. आणि ८जीबी+१२८जीबी व्हेरियन्टची किंमत १४,९९९ रु. असून २७ जून २०२५ रोजी दुपारी १२ वाजल्यापासून हा फोन ओप्पो ई-स्टोअर मध्ये आणि फ्लिपकार्ट विक्रीसाठी उपलब्ध होईल. यामध्ये मिडनाइट व्हायोलेट आणि सनसेट पीच हे दोन रंगांचे पर्याय आहेत. हा फोन खरेदी करणाऱ्या ग्राहकांना सेलच्या दिवशी काही निवडक बँक ऑफर्सवर ४जीबी आणि ६जीबी च्या व्हेरियन्टवर १००० रु. आणि ८जीबी च्या व्हेरियन्टवर २००० रु. इन्स्टंट डिस्काउंट मिळेल किंवा १००० रु. चा एक्स्चेंज बोनस आणि अतिरिक्त ३ महिन्यांपर्यंत नो कॉस्ट ईएमआय पर्याय मिळेल. ज्यामुळे या तिन्ही व्हेरियन्टची प्रभावी किंमत अनुक्रमे १०,९९९, ११,९९९ आणि १२,९९९ रु. होईल.

ओप्पो इंडिया चे हेड ऑफ प्रॉडक्ट कम्युनिकेशन सॅव्हीओ डिसूझा म्हणाले, ओप्पो के१३एक्स लॉन्च करून आम्ही असामान्य टिकाऊपणा, फ्लूईड परफॉर्मन्स आणि उत्कृष्ट पॉवर कार्यक्षमता या जेन झीच्या वास्तविक गरजा, चांगल्या किंमतीत पूर्ण करण्याच्या आमच्या वचनबद्धतेस पुष्टी देत आहोत. के१३एक्स मध्ये आधुनिक बायोमिमेटिक शॉक अब्जॉर्प्शन सिस्टम, या श्रेणीतील आघाडीचे बॅटरी ऑप्टिमायझेशन आणि ५जी तत्परता आहे. या स्मार्टफोनमधून तडजोड न करता, एंट्री-स्तराच्या स्मार्टफोनमध्ये काय काय शक्य असू शकते याची व्याख्या करण्याचे ओप्पो चे व्हिजन झळकते.

स्मृती रविचंद्रन, उपाध्यक्ष- मोबाइल्स, फ्लिपकार्ट म्हणाल्या, फ्लिपकार्टमध्ये आम्हाला फक्त दमदार परफॉर्मन्स देणाऱ्या नाही, तर दैनंदिन जीवनाच्या मागण्या पुरवणाऱ्या स्मार्टफोन्सची वाढती गरज स्पष्ट दिसत आहे. ओप्पो के१३एक्स ५जी च्या लॉन्चमुळे ग्राहकांची कोणतीही तडजोड न करता टिकाऊपणाची वाढती मागणी पूर्ण होणार आहे. मिलिटरी ग्रेडचा दणकटपणा, नावीन्यपूर्ण शॉक अब्जॉर्प्शन प्रणाली आणि विकसित फीचर्स असलेला के१३एक्स हा मूल्य, स्टाइल आणि लवचिकतेचा शोध घेणाऱ्या तरुणांसाठी एक उत्तम पर्याय आहे. हा दमदार आणि टिकाऊ फोन देशभरातील लक्षावधी ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ओप्पो सोबत पुन्हा एकदा भागीदारी करताना आम्हाला आनंद होत आहे.

# तो युग म्हणून खूप गंभीर किंवा चिंतेत असला तरी पडद्यावर छानच दिसतो : आशी सिंह



**मुंबई, ३० जून :** अनेक वर्षे ज्याची तुम्ही प्रशंसा केली, त्याच्या सोबत काम करण्याचे भाग्य सगळ्यांना मिळत नाही. आशी सिंहला ते भाग्य लाभले आहे. सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत कैरी शर्माची भूमिका करणारी आशी सिंह आपला सह-कलाकार शब्बीर अहलूवालियाची आधीपासून चाहती होती. त्यामुळे त्याच्याबरोबर काम करण्याची संधी तिला स्वप्नपूर्तीचा आनंद देत आहे.

प्रेम आणि नात्यांच्या विविध पैलूंचा शोध घेणाऱ्या या मालिकेत शब्बीर काहीशा बेपर्वा आणि अंतर्मुख युग सिन्हाच्या रूपात दिसत आहे, तर आशी सिंह कैरीची भूमिका करत आहे, जी आनंदी स्वभावाची तरुणी आहे, आणि यशस्वी वकील होण्याचे तिचे स्वप्न आहे. युग आणि कैरी यांचे स्वभाव एकमेकांपेक्षा अगदी विरुद्ध असल्यामुळे त्यांच्यात उडणारे गंमतीशीर खटके बघायला मजा येते. पडद्याच्या मागे मात्र आशी सिंह शब्बीर अहलूवालिया जेव्हा युगच्या गंभीर, चिंताक्रांत आणि तुटक भूमिकेत हरवलेला असतो, तेव्हा त्याचे फोटो टिपण्याचा प्रयत्न करत असते. इन्स्टाग्रामवर ती कबूल करते:

युग-मोड मध्ये असलेल्या शब्बीरचे सहज फोटो घेण्याचा प्रयत्न मी केला आहे. अर्थात, तो केव्हाही नुकताच शूटिंग करून आल्यासारखाच दिसतो. सहजपणे सुंदर! कसे काय जमते हे त्याला?

तो एखाद्या भावनिक दृश्याची तयारी करत असो, पटकथा वाचत असो किंवा दोन टेक्सच्या मध्ये क्रू सदस्यांशी बोलत असो, शब्बीरच्या सहज मोहकतेमुळे त्याचे गंभीर युगच्या रूपातले फोटो काढण्याचे आशीचे प्रयत्न नेहमीच फसतात.

सेटवरच्या आपल्या या छंदाबद्दल आशी सिंह सांगते, शब्बीरला युगच्या भूमिकेत वावरताना बघणे हा माझा सेटवरचा एक छंदच आहे. या व्यक्तिरेखेत त्याने इतकी सहज नैसर्गिक सखोलता आणली आहे! खूप सहज आणि तरीही अत्यंत प्रभावी! तो युग म्हणून खूप गंभीर किंवा चिंतेत असला तरी पडद्यावर छानच दिसतो. तो नेहमीच पिक्चर परफेक्ट दिसतो. त्याला काम करताना जवळून बघणे फारच प्रेरणादायक आहे. माझ्यासाठी तर तो रोजचा एक छोटासा मास्टरक्लासच असतो.

# कलाकारांनी त्यांच्या मालिकांमधील सीनबाबत सांगितले, जे व्हायरल जोक बनले!

**मुंबई, ३० जून :** यंदा इंटरनॅशनल जोक्स डे निमित्त हास्याचा आनंद घेण्यासोबत प्रख्यात संवादांना क्षणांमध्ये बदललेल्या सीन्सना प्रशंसित करा, जेथे हे सीन पडद्यावर सादर होण्यासोबत दैनंदिन संवाद आणि व्हायरल मीम संस्कृतीचा भाग बनले. एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय कलाकार आसिफ शेख (विभुती नारायण मिश्रा, 'भाबीजी घर पर है') आणि योगेश त्रिपाठी (दरोगा हप्पू सिंग, 'हप्पू की उलटन पलटन') त्यांच्या मालिकांमधील विनोदी संस्मरणीय सीनबाबत सांगत आहेत, जे अनपेक्षितपणे व्हायरल सेन्सेशन्स बनले. योगेश त्रिपाठी ऊर्फ दरोगा हप्पू सिंग म्हणाले, "काही विशिष्ट संवाद लोकप्रिय ठरण्यासोबत प्रेक्षकांच्या बोलीभाषेचा भाग बनतात, हे पाहून अविश्वसनीय वाटत आहे. सर्वात व्हायरल सीन म्हणजे हप्पू वैतागून म्हणतो, 'अरे दादा, थंड रख!'. मी ज्या पद्धतीने हा संवाद म्हणतो त्यामध्ये हास्य व व्यंगाचे परिपूर्ण मिश्रण आहे. मी अजूनही प्रेक्षकांना मला पाहिल्यानंतर 'अरे दादा' म्हणून हाक मारताना ऐकतो. चाहत्यांचा आणखी आवडता संवाद म्हणजे हप्पू अभिमानाने म्हणतो, 'नाम है दरोगा हप्पू सिंग!' आणि त्यासोबत केस उडवतो. तो सीन त्वरित मीम टेम्पलेट बनला आणि प्रेक्षकांनी त्यामध्ये ट्विस्टची भर करत नवीन रूपात सादर करण्यास सुरूवात केली. अर्थातच, मी आयकॉनिक संवाद विसरू शकत नाही 'मैं ९ बच्चों का बाप है!' हा संवाद कोणीही कधीच विसरणार नाही. हा चालता-फिरता बोलला जाणारा विनोद बनला आहे, जो प्रेक्षकांना खूप आवडतो. यामधून उत्तम कॉमेडी पडद्यामागे देखील खूप प्रसिद्ध होते आणि वास्तविक जीवनात विनोदाचा भाग बनते, हे दिसून येते."

आसिफ शेख ऊर्फ विभुती नारायण मिश्रा आठवणींना उजाळा देत म्हणाले, "एक सीन खूप व्हायरल झाला, तो म्हणजे विभुती अंगूरी भाबीला नखरे करत म्हणतो 'आय लाइक इट व्हेन यू कॉल मी नल्ले!'. हा संवाद इतका लोकप्रिय झाला की प्रेक्षक मला अजूनही त्यावर बनवलेले मीम व रील्स पाठवतात. आणखी एक प्रसिद्ध संवाद म्हणजे 'हॅलो भाबीजी?', जो मोहकता व खोडकरपणाच्या परिपूर्ण एकत्रिकरणासह सादर करण्यात आला आहे. चाहत्यांमध्ये हा संवाद लगेच लोकप्रिय ठरला आणि आता सर्व मीम पेजेस व सोशल मीडियावर धूमाकूळ निर्माण करत आहे. आणखी एक उत्तम संवाद आहे 'आय ॲम सारी', विभुतीची इंग्रजी भाषेमधील मनोरंजन माफी मागण्याची पद्धत. याबाबत मीम करण्यापर्यंत हा संवाद पंचलाइन बनला आहे. सहजपणे संवाद बोलण्याची पद्धत आणि विनोदी शैलीने या संवादाला संस्मरणीय केले.

## आज का अंदाज

मंगळवार १ जुलै २०२५

### पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ६ | ९ | ३ | ४ | ५ | ८ |
| ४९९ | १५९ | १५० | २७० | २३८ | ११२ | १७७ | २६० |
| ३९० | २४९ | २६८ | ४६९ | ५८० | २२० | ४४७ | ४५९ |
| २०० | ३५७ | ३३० | ३७९ | ३३७ | ३३८ | ३६६ | ३५० |
| २० | ५० | ६४ | ९४ | ३२ | ४२ | ५१ | ८१ |
| २१ | ५१ | ६३ | ९३ | ३६ | ४६ | ५७ | ८७ |
| २७ | ५७ | ६८ | ९८ | ३० | ४० | ५९ | ८९ |

१ जुलै : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | १२ | ४६ | ७६ |
| ०५ | १५ | ४९ | ७९ |
| ०८ | १८ | ४३ | ७३ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

# आम्हा तिघांना फन मस्केटियर्स म्हणतात

**मुंबई, ३० जून :** सोनी सबवरील तेनाली रामा ही मालिका त्यातील सुरस कथांमुळे प्रेक्षकांना आवडते आहे. सुजाणता आणि बुद्धीचातुर्य हा मालिकेचा मूलभूत गाभा असला, तरी ही मालिका तेनाली रामा (कृष्ण भारद्वाज), लक्ष्मणाप्पा (कुणाल करण कपूर) आणि कोतवाल (निखिल आर्या) या त्रिकुटासह प्रेक्षकांना एका रोमांचक शोध प्रवासावर घेऊन जाते. पारंपरिक पठडीचे बुद्धीचातुर्य आणि तर्कनिष्ठा वापरुन हे तिघे खूप गुंतागुंतीची प्रकरणे सोडवताना दिसतात.

पण, जर कॅमेऱ्याच्या मागे पाहिलेत तर एक अगदी वेगळेच दृश्य तुम्हाला दिसेल. इथे न संपणारा हशा असतो, सतत विनोद आणि कोट्या होत असतात. हे त्रिकूट म्हणजे सेटवरील मस्तीचे केंद्र बनले आहे. ते या शो चे फन मस्केटियर्स आहेत, जे पडद्यावरील हेरगिरीचे गांभीर्य पडद्याच्या मागील मस्तीने संतुलित करतात. एकमेकांच्या खोड्या काढणे, मीम्स शेअर करणे किंवा स्वतःच्याच चुकांवर हसणे या त्यांच्या मस्तीमुळे शूटिंगचे वातावरण मात्र हलके-फुलके आणि प्रसन्न राहते.

पडद्यामागच्या फन मस्केटियर्सच्या नात्याविषयी बोलताना कृष्ण भारद्वाज म्हणाला, कुणाल आणि मी सेटवर खूप धमाल करतो. दोन खोडकर मुलांचा जसा उच्छाद असतो, तसाच आमचा या सेटवर उच्छाद असतो. निखिल आर्या आमचे आवडते टार्गेट आहे. आमच्या हसण्या-खिदळण्यामुळे तो नेहमी गोंधळात पडलेला असतो, पण आमची मस्ती तो मनावर घेत नाही. जेव्हा आम्ही तिघे एकत्र येतो, तेव्हा आमची पडद्यामागची केमिस्ट्री इतकी धमाल आणि संसर्गजन्य असते की आम्हाला मिळालेले या शो चे फन मस्केटियर्स हे नाव आम्हाला अगदी साजेसेच आहे.

## राशीभविष्य

**मेष :** आज तुम्हाला अडकलेले पैसे मिळतील. काही महत्त्वाच्या कामात यश मिळाल्याने आर्थिक लाभ होतील. तुमच्या वडिलांकडून अपेक्षित आर्थिक मदत मिळेल. उत्पन्न वाढवण्याचे प्रयत्न यशस्वी होतील.

**वृषभ :** तुमच्या मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष द्या. तणाव कमी करण्यासाठी आणि स्वत:ला फ्रेश ठेवण्यासाठी काळजी घ्या. कठीण परिस्थितीला सामोरे जाऊन त्यावर मात कराल.

**मिथुन :** आज कुटुंबात अनावश्यक तणाव निर्माण होऊ शकतो. तुम्ही तुमचा राग आणि कठोर शब्दांवर नियंत्रण ठेवावे. अन्यथा भांडणे गंभीर वळण घेऊ शकतात. तुम्हाला नोकरीच्या संधी मिळतील.

**कर्क :** तुमच्या बॉसशी बोलताना किंवा महत्त्वाच्या चर्चा करताना शहाणपणाने आणि विचारपूर्वक बोला. तुमच्या शब्दांनी परिस्थिती बिघडणार नाही याची काळजी घ्या.

**सिंह :** कुटुंबासोबत विशेषत: आई-वडिलांसोबत वेळ घालवाल. यामुळे नातेसंबंध अधिक मजबूत होतील. आर्थिक बाबतीत चढ-उतार दिसू शकतात. त्यामुळे खर्चावर नियंत्रण ठेवणे महत्त्वाचे आहे.

**कन्या :** आपल्या प्रियजनांसोबत वेळ घालवण्यासाठी आणि संवाद साधण्यासाठी हा एक उत्तम दिवस आहे. आज तुम्हाला आरोग्याच्या किरकोळ समस्या सतावतील. खाण्यापिण्याच्या सवयींवर नियंत्रण ठेवा.

**तुळ :** स्वत:च्या आरोग्याकडे आणि मानसिक स्थितीकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. आज तुम्हाला कामात भरपूर उत्साह जाणवेल. तुम्ही तुमच्या जबाबदाजया अत्यंत चांगल्या प्रकारे पार पाडाल.

**वृश्चिक :** आज तुमचा नोकरीचा शोध पूर्ण होईल. चांगलं काम मिळेल. महत्त्वाच्या कामात येणारे अडथळे दूर होतील. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाजया लोकांना बाहेरच्या देशात जावे लागू शकते.


**धनु :** आज व्यवसायात चांगले उत्पन्न असल्याने आर्थिक स्थिती मजबूत असेल. पैशाच्या मदतीने काही महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर होतील. यामुळे भविष्यात आर्थिक लाभ होतील.

**मकर :** कामाच्या ठिकाणी जास्त मेहनत करावी लागेल. सहकाजयांशी समन्वय साधण्याची गरज भासेल. कामाच्या ठिकाणी येणारे अडथळे कमी होतील. यामुळे नात्यात गोडवा येईल. उत्पन्नाचे स्रोत वाढतील.

**कुंभ :** आज तुमची आर्थिक परिस्थिती थोडी गडबडू शकते. त्यामुळे कोणत्याही मोठ्या निर्णयांमध्ये सावधगिरी बाळगा. सतत काम करण्याऐवजी छोटे ब्रेक घ्या. यामुळे तुमची कार्यक्षमता टिकून राहील.

**मीन :** आपल्या कामाचे संतुलन योग्य प्रकारे राखण्याचा प्रयत्न करा. करिअरमध्ये पुढे जाण्यासाठी विचारपूर्वक आणि रणनीती आखा. कोणताही निर्णय घाईघाईने घेऊ नका. आर्थिक स्थिती चांगली आणि मजबूत राहील.

# शब्दकोडे क्रमांक २१५१



**आडवे शब्द :-**
१) ओळखीचा
३) राजाचे निवासस्थान
७) रक्षण करणारा
१०) काढलेली सुट्टी
११) नष्ट झालेले मेलेले
१३) प्रतिदिनी
१६) बस्तान
१७) शरीरावरील माराची खूण
१८) उपवन
१९) काटकसर
२२) टरफल
२३) मनातील विचार मन
२४) फांदी तुटतानाचा आवाज
२६) मासिक भत्ता
२८) स्थिती, अवस्था
२९) कौसल्यापुत्र
३०) गोमाता
३१) शर्करा
३३) जय
३४) प्रजा, कुळावरील सरकारी कर
३७) फिकीर, गुणांची पारख
३९) मनाचा झालेला ग्रह
४०) एक शिकारी पक्षी
४२) सिंहासन
४३) ✽✽✽ राम--गोसावी, भटक्या मनुष्य
४४) अर्जुनाचा रथ चालविणारा श्रीकृष्ण
४६) आजच्या आधीचा दिवस
४७) जेवणातील रसरशीत तोंडी लावणे
४९) पती, यजमान
५०) मला
५१) वेळेचा कमीतकमी भाग
५२) नगरवासी, एक आडनाव
५५) मल्ल
५७) अनाथ
५८) दोन डोंगरामधील अरुंद रस्ता
५९) कविता, गीत
६०) बारा महिन्याचा काळ
६१) लटलटणे, धैर्य सुटणे
६२) तृण, चारा
६४) उत्तराधिकारी
६६) मत देण्याची क्रिया
६८) मुक्तता
६९) बारीकसारीक
७०) जाडसर पीठ

**उभे शब्द :-**
१) कमळ
२) पुष्कळ
३) भूपती
४) नंतर
५) वर्ष
६) वाईट सवय, खोड
७) मनावर ठेवला आवर
८) निमग्न
९) आपल्या कठीण प्रसंगास कोण मदत करतो ? रामदासस्वामीची एक विचारणा
१०) चांदी
१२) टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
१३) पत्थर
१४) रोख रक्कम
१५) एक औषधी हळद प्रकार
१७) सिंह
१८) वाकलेला
२०) लक्ष्मी
२१) पोळ्या भाजण्याचे पात्र
२५) च्या साठी
२७) पृथ्वी
३२) वाळा
३३) वाटप
३५) योग्य, उचित
३६) दिवस
३७) मणका
३८) अर्धा शेर
४१) जोडीदार
४४) बाजीप्रभूंच्या रक्ताने पवित्र झालेली जागा
४५) दर्या, अर्णव
४६) वेळेचा अपव्यय
४७) रात्री चमकणारा किडा
४८) रंग
५०) अधिक महिना
५१) नष्ट होणारे
५३) ढगांचा आवाज
५४) भांडण, तंटा
५६) लोणी
६३) डोळ्यातील बुब्बुळावर येणारा कवडा
६४) चणचण, उणीव
६५) लोखंड
६६) अंत:करण
६७) दरवाजा

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर





# विधीमंडळ अधिवेशन

# विरोधक - सत्ताधाऱ्यांची निर्दशने





■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :
राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला आजपासून सुरूवात झाली. आज पहिल्या दिवशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेने विधानभवनाच्या पायऱ्यांवर विरोधकांविरोधात विशेषतः शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाविरोधात आंदोलन केले. मुख्यमंत्र्यांनी हिंदीच्या सक्तीचा निर्णय राज्याच्या हितासाठी घेतला, असे त्यांचे म्हणणे होते. त्यानंतर काही वेळाने विरोधकांनी टाळ कुटीत सरकारविरोधात घोषणाबाजी केली.

दरम्यान, हिंदीची सक्ती करणारे दोन्ही निर्णय शासनाने मागे घेतले असले तरी त्याचे तीव्र पडसाद विधिमंडळात उमटण्याची चिन्हे आहेत. याशिवाय शक्तिपीठ महामार्गाला विरोध, शेतकऱ्यांचा कर्जमाफीचा मुद्दा, समृद्धी महामार्गाची झालेली दुरवस्था, महागाई आदी विविध मुद्यांवरून सभागृहात टोकाचे राजकारण होण्याची शक्यता आहे.

उद्धव ठाकरे आज विधानभवनात आले होते. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना ते म्हणाले, संपूर्ण महाराष्ट्राच्या गावागावात व कानाकोपऱ्यात जय महाराष्ट्राचा नारा पुन्हा एकदा बुलंद झाला आहे. हा नारा बुलंद करण्यात शिवसेना व शिवसैनिक आघाडीवर होते . सरकारला शहाणपण सुचले की नाही हे येत्या काही दिवसांत कळेल. पण तूर्त त्यांनी हिंदी सक्तीचा जीआर रद्द केला. त्यांनी हा जीआर रद्द केला नसता तर ५ तारखेच्या मोर्चात सत्ताधारी भाजप, एसंशिं गट व अजित पवार गटाचे अनेक नेते सहभागी झाले असते. कारण आता मराठी माणसांची एकजूट आता झालेली आहे. त्यांनाही मी धन्यवाद देतो.

उद्धव ठाकरे म्हणाले, मातृभाषेचे प्रेम हे पक्षाच्या पलिकडे असले पाहिजे. सरकारने केवीलवाणा प्रयत्न केला. पण तरीही आम्ही त्यांना धन्यवाद देतो. आता त्यांनी एक नवीन समिती नेमली आहे. समिती कोणतीही असू द्या, त्यांनी काहीही सांगू द्या, पण सक्ती विषय हा संपलेला आहे.

आपण विखुरले आहोत असे वाटल्यानंतर मराठीद्रोही पुन्हा डोके वर काढतात. त्यांचे डोके काल आपण चेपलेले आहे. चिरडून टाकले आहे. त्यांचा फना पुन्हा वर येऊ नये असे वाटत असेल तर परत संकट येण्याची वाट पाहत बसण्यापेक्षा ही एकजूट आपण कायम ठेवली पाहिजे, असे ते म्हणाले.

उद्धव ठाकरे यांनी यावेळी भाजपचा उल्लेख कमळी असा केला. ते म्हणाले, या सरकारच्या मंत्र्यांचे रोज कोणते न कोणते पापं बाहेर येत आहेत. शेतकऱ्यांचे विषय तसेच प्रलंबित आहेत. मला उत्सुकता आहे की, ही कमळी कोणत्या भाषेच्या शाळेत शिकली. कारण मार्क्स मिळाले शंभर पैकी शंभर ही कमळी आमची एक नंबर. आता ही कमळी कोणत्या भाषेच्या शाळेत शिकली? त्या कमळीवर कोणत्या भाषेची सक्ती होती का? तिने 100 मार्क कसे मिळवले? या 100 मार्गात तिने ईव्हीएम वापरले होते का? हे पाहण्याची मला उत्सुकता आहे. त्यामुळे कमळी एक नंबर आहे असे म्हणणारे कोण आहेत? हे मला पाहायचे आहे, असेही उद्धव ठाकरे शरसंधान साधताना म्हणाले.

## समृद्धी महामार्गाच्या दुरावस्थेवरून आदित्यची टीका

समृद्धी महामार्गाची पहिल्याच पावसात दुरवस्था झाल्याचे पाहायला मिळत आहे. यावरून देखील विरोधक सरकारवर हल्लाबोल करू शकतात. यावर आदित्य ठाकरे यांनी आजच्या पत्रकार परिषदेत बोलतानाच टीका केली आहे.

ते म्हणाले, ज्या महामार्गाला माझ्या आजोबांचे नाव दिले त्या महामार्गावर आज खड्डे पडले आहेत. त्याच महामार्गावर आज नदी वाहते आहे. मुंबई-पुणे महामार्गावर चुकीच्या पद्धतीने जवळ जवळ साडे साडेबारा कोटी रुपये चुकीचा फाइन लावण्यात आला आहे. कारण हा घोटाळा एमएसआरडीसी ने केलेला आहे, असा आरोप आदित्य ठाकरेंनी केला आहे. त्यामुळे हा देखील विषय अधिवेशनात गाजू शकतो.

## गरीब, दुर्लक्षित समाजावर
# राज्यात अन्याय

जयंत पाटील यांचा आरोप



■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३० :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारचे आर्थिक संतुलन ढासळले आहे. परिणामी, राज्यात गरीब व दुर्लक्षित घटकांवरील अन्याय वाढला आहे, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केला.

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सोमवारी सुरूवात झाली. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी ५७ हजार ५०९ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या. त्यावरून माजी अर्थमंत्री तथा शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी त्यांच्यावर निशाणा साधला.

ते सरकारला धारेवर धरत म्हणाले, सरकारला आता अर्थसंकल्पाचे संतुलन राखणे अवघड झाले आहे. त्यामुळे राज्यावरील आर्थिक बोजा वाढला आहे. सद्यस्थितीत राज्याचे आर्थिक संतुलन पूर्णतः ढासळले आहे. यामुळे राज्यातील गरिबांवर, दुर्लक्षित समाजावर अन्याय होत आहे. एसटी, एससी, ओबीसी यांच्यावर होणारा खर्च कागदावर दाखवला जातो हे ३१ मार्चला कळते. पण प्रत्यक्षात त्यावर काहीच पैसा खर्च झाला नाही. तीच पुनरावृत्ती यंदा हे सरकार करत आहे.

**सरकारने अजून एक विक्रम रचला**

जयंत पाटील पुढे म्हणाले, चालू आर्थिक वर्षात मांडलेल्या अर्थसंकल्पात सरकारने एक विक्रम केल्याचा उल्लेख मी केला होता. त्यावेळी महसुली तूट ही ४५ हजार ८९१ कोटी रुपयांची होती. राज्याच्या अर्थमंत्र्यांनी आज पुन्हा पुरवणी मागण्या माडल्या. त्या ५७ हजार ५०९ कोटींच्या आहेत. सरकारचे बहुमत असल्यामुळे या मागण्या मंजूर होतील. त्यावेळी सरकारला १ लाख ३४०० कोटी कमी पडणार आहेत. पूर्वीच्या व आताच्या पुरवणी मागण्या मिळून सरकारने अजून एक विक्रम रचला आहे. पुरवणी मागण्या मांडायच्या आणि ते पैसे खर्च करायचे नाही असा प्रकार या सरकारने सुरू केला आहे.

यापुढे हिवाळी अधिवेशन येणार आहे. त्यानंतर पुढचा अर्थसंकल्प मांडण्यापूर्वी आणखी एक पुरवणी मागणी येणार. याचा अर्थ हे सरकार राज्याची महसुली तूट दीड किंवा २ लाख कोटींपर्यंत पोहोचवेल. याचा अर्थ असा की, सरकारला सर्व आकडे कागदावर दाखवणे आवश्यक आहे. अन्यथा ज्यांच्याकडून पैसे घेतले आहेत किंवा ज्यांचे देणे बाकी आहे, असे लोक एकतर आत्महत्या करतील अन्यथा यांच्या मागे लागतील. त्यामुळे सरकारने राज्याच्या अर्थकारणामध्ये एवढ्या मोठ्या तुटीपर्यंत पोहोचण्याचे धाडस केले आहे, असे जयंत पाटील म्हणाले.

## विधानभवनातील पासेसवरून
# अशोक स्तंभ गायब



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :
राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी एका गोष्टीकडे लक्ष वेधले. विधानभवनातील पासेसवरून अशोकस्तंभ हटवल्याचा दावा त्यांनी केला.

रोहित पवार म्हणाले, विधिमंडळाचा पास आहे म्हणजे जिथे कायदे केले जातात महाराष्ट्राचे त्या पासवर मध्ये अशोकस्तंभ होता. आता हळूहळू हा अशोकस्तंभ सगळीकडून काढला जाईल. संविधानाची गळचेपी भाजपकडून केली जात आहे, अशी टीका त्यांनी केली.

**जितेंद्र आव्हाडांचीही टीका**

आमदार जितेंद्र आव्हाड यांनी देखील याच मुद्द्यावरून सरकारवर टीका केली आहे. ते म्हणाले, आपल्या सगळ्या पासेस म्हणजे जे सरकार विधिमंडळ इश्यू करतो त्यावर नेहमी अशोकस्तंभ असायचा. यापूर्वीचे सगळे पासेस तपासून बघा सगळ्यावर अशोकस्तंभ आहे. पीएच्या पासवर अशोकस्तंभ आहे, प्रेक्षकांचे पासवर सुद्धा अशोकस्तंभ आहे. आता हा अशोकस्तंभच गायब झाला आहे.

## नेतृत्वाने कच खाल्ली

प्रकाश आंबेडकरांची टीका



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :
ट्रम्पधार्जीण्या सरकारमुळे भारताने युद्ध जिंकण्याची संधी घालवली, अशी टीका ऑपरेशन सिंदूर'वरून प्रकाश आंबेडकरांची टीका वंचित बहुजन आघाडीचे नेते आणि माजी खासदार प्रकाश आंबेडकर यांनी येथे मोदी सरकारवर केली. फुले -आंबेडकर इंटलेक्च्युअल फोरमच्यावतीने आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. ऑपरेशन सिंदूर आणि नंतरच्या घडामोडी' हा विषय होता.

भारताने ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानला जोरदार प्रत्युत्तर दिलं. आपण जिंकायला लागलो होतो. परंतु ट्रम्प धार्जीण्या सरकारमुळे जिंकायला आलेलो युद्ध आपण हरलो असे आंबेडकर म्हणाले. भारताला गेले २० ते २५ वर्षांपासून दहशतवाद्यांचा त्रास होत होता, ती घालवण्याची संधी भारताने का घालवली? असा सवाल प्रकाश आंबेडकरांनी केला.

ऑपरेशन सिंदूर'च्या काळात झालेल्या युद्धाच्या वेळी पाकिस्तानकडे दहा दिवसच पुरेल एवढाच दारूगोळा होता. देशाला यानिमित्ताने चांगली संधी आलेली होती. त्यामुळे, पाकिस्तान आणि त्यांच्या पाठबळावर चालणाऱ्या दहशतवादाला कायमची समाप्ती देण्याची संधी आपल्या हातात होती. पण आपण ती संधी गमावली, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

# शिंदे गटात गुंडाचा प्रवेश?

पक्षप्रवेशाचा दावा फेटाळला



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :
राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शनिवारी नागपूर येथे पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी नागपूरमधील कुख्यात गुंड युवराज माथनकरनेही शिवसेनेत प्रवेश केला असल्याची माहिती समोर आली आहे.

युवराज माथनकर हा एकनाथ शिंदे यांच्या जवळ उभा असल्याचे दिसून आले तसेच त्याच्या गळ्यात शिवसेनेचा दुपट्टाही दिसून आला. परंतु, जिल्हाप्रमुख सुरज गोजे यांनी युवारजचा पक्षप्रवेश झाला नसल्याचा दावा केला आहे.

नागपूरचे शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख सुरज गोजे यांनी म्हटल्यानुसार, युवराज माथनकरने शिवसेनेत प्रवेश केला, हे आम्हाला माध्यमांमध्ये बातम्या पाहून कळले. आमच्या पक्षात प्रवेश घेणा?यांच्या यादीत युवराज माथनकरचे नाव नव्हते. तसेच युवराज माथनकर नामक गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तीने पक्षात प्रवेश घेतल्याची माहिती नव्हती, असे गोजे म्हणाले.

पुढे बोलताना सूरज गोजे म्हणाले, शनिवारी पक्ष प्रवेश होताना मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती. याच गर्दीत युवराज माथनकर तिथे आला असावा आणि त्याच्या गळ्यात दुपट्टा टाकण्यात आला असावा, माथनकर याचा शिवसेनेशी काहीही संबंध नाही. एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री असून नगर विकास मंत्री असल्याने अनेक लोक काम घेऊन येतात, त्याच कारणाने युवराज माथनकर ही आला असावा, अशी शंका गोजे यांनी व्यक्त केली.

तसेच युवराज माथनकर कार्यक्रम स्थळी दिसत आहे. हे आम्ही नाकारत नाही, पण पक्ष प्रवेशाशी त्याचा काहीही संबंध नाही, असे म्हणत युवराज माथनकरचा पक्षप्रवेश झाला नसल्याचा दावा करण्यात आला आहे.

दरम्यान, युवारज माथनकरच्या विरोधात अनेक गुन्हे दाखल आहेत. लूट, खंडणी आणि हत्या असे अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. त्यामुळे काही वर्षे तो तुरुंगातही होता. नंतर अनेक प्रकरणातून त्याची निर्दोष सुटका झाल्याची माहिती आहे. निर्दोष सुटका जरी झाली असली तरी नागपूरमधील लोक त्याला अजूनही सराईक गुंड म्हणूनच ओळखतात.

पक्षप्रवेश सोहळा पार पडल्यानंतर पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी एकनाथ शिंदे यांना पत्रकारांनी युवराज माथनकरच्या पक्षप्रवेशाविषयी विचारले. यावर उत्तर देताना शिंदे म्हणाले, स्थानिक कार्यकर्त्यांचा प्रवेश देण्याचा निर्णय स्थानिक पातळीवरील पदाधिकारी करतात. त्यामुळे कोणी वादग्रस्त व्यक्ती पक्षात येणार नाही, याची काळजी स्थानिक नेतृत्वाने घ्यायची असते, असे शिंदेंनी मत व्यक्त केले.

## 'पादरी'चे सैराट करणाऱ्याला ११ लाखांचे बक्षीस

पडळकर यांचे वादग्रस्त विधान

■ वृत्तसंस्था
जालना, दि. ३० :
बैलगाडीच्या शर्यतीत जसे बक्षीस ठेवले जाते, तसेच बक्षीस धर्मांतरासाठी येणाऱ्या पादरी लोकांना ठोकण्यासाठी ठेवले पाहिजे, असे वादग्रस्त विधान भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी ख्रिश्चन धर्मगुरूंविरोधात केले आहे. त्यांच्या या विधानामुळे ख्रिश्चन धर्मियांत मोठा रोष निर्माण झाला आहे. या प्रकरणी ख्रिश्चन धर्मियानी सोमवारी जालन्यात आक्रोश मोर्चा काढला.

सांगली येथील यशवंत नगर येथे गत आठवड्यात सासरच्या छळाला कंटाळून ऋतुजा राजगे नामक ७ महिन्यांच्या गरोदर महिलेने आत्महत्या केली होती. नंतर ही घटना धर्मांतराच्या प्रकरणाशी संबंधित असल्याचे समोर आले होते. या प्रकरणी टीका करताना गोपीचंद पडळकर यांनी ख्रिश्चन धर्मगुरूंविरोधात वादग्रस्त विधान केले होते. त्यांच्या या विधानाचे सोमवारी जालन्यात तीव्र पडसाद उमटले.

येथील ख्रिश्चन बांधवांनी सोमवारी शहरातील गांधी चौकातून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत मोर्चा काढला. त्यात पडळकर यांच्याविरोधात घोषणाबाजी करत त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. या मोर्चाला दलित संघटनांनीही पाठिंबा दिला.

सरकारने गोपीनाथ पडळकर यांची आमदारकी रद्द करून त्यांच्यावर कारवाई केली नाही तर या प्रकरणी विभागीय पातळी ते दिल्लीपर्यंत मोर्चे काढले जातील, असा इशारा मोर्चेकऱ्यांनी दिला. पडळकरांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांची आमदारकी रद्द करण्यासाठी अहिल्यानगर येथेही मोर्चा काढण्यात आला होता.

## पंढरीच्या वारीला निघालेल्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ३० :
विठ्ठलाच्या वारीला निघालेल्या एका अल्पवयीन मुलीवर काही नराधमांनी लैंगिक अत्याचार केल्याची संतापजनक घटना पुण्याच्या दौंड येथे घडली आहे.

दौंड तालुक्यातील स्वामी चिंचोली येथे ही संतापजनक घटना घडली आहे. मजल दरमजल करत पंढरपूरच्या दिशेने जाणारे वारकरी चहापाण्यासाठी येथे थांबले होते. त्यानंतर गाडीत बसताना २ जण गाडीवरून तिथे आले. त्यांनी वारकऱ्यांच्या गळ्याला कोयता लावला.

त्यानंतर त्यांनी वारकऱ्यांची लूट करून एका अल्पवयीन मुलीला आपल्यासोबत काही अंतरावर नेले. तिथे तिच्यावर अत्याचार केला. या घटनेमुळे दौंड तालुक्यासह संपूर्ण पुणे जिल्ह्यात खळबळ माजली आहे. या प्रकरणी दौंड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे. पोलिस अज्ञात आरोपींचा शोध घेत आहे. त्यांच्यापुढे आरोपींच्या मुसक्या आवळण्याचे मोठे आव्हान आहे.

## शिंदे गटाचे विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेने आज विधानभवनाच्या पाय?यांवर विरोधकांविरोधात विशेषतः उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेविरोधात आंदोलन केले. नवीन शैक्षणिक धोरण तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे सरकारने स्वीकारल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या हितासाठी हिंदीच्या कथित सक्तीचे दोन्ही शासन निर्णय रद्दबातल केल्याचा दावाही त्यांनी यावेळी केला.

# पुणे रेल्वे स्टेशनला महात्मा फुले यांचे नाव द्या

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ३० :
दलित, आदिवासी, अल्पसंख्यांक ओबीसीसह सकल बहुजन समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी सनदशीर मार्गाने लढा देणाऱ्या अराजकीय संघटना, उपेक्षित समाज महासंघाचे वतीने महात्मा फुले यांना अभिवादन करुन पुणे रेल्वे स्टेशनला महात्मा जोतीराव फुले यांचे नाव देण्याची मागणी करण्यात आली.



**उपेक्षित समाज महासंघाची मागणी**

उपेक्षित समाज महासंघ व फुले शाहू आंबेडकर अनुयायांच्या वतीने केलेल्या मागणीत म्हटले की, महाराष्ट्राला फुले शाह आंबेडकर यांच्या क्रांतिकार्याचा वारसा आहे. त्यांच्या क्रांती कार्यामुळेच पुणे नगरीला सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या महत्व प्राप्त झाले आहे. तसेच महाराष्ट्राला पुरोगामी राज्य म्हणून संबोधले जाते. त्यांच्या कार्यापासून सदैव प्रेरणा मिळावी म्हणून पुणे रेल्वे स्टेशनला महात्मा फुले यांचे नाव देण्याची मागणी बैठकीत महासंघाचे अध्यक्ष प्रा. श्रीकृष्ण बनसोड, श्रीकृष्णदास माहोरे, सुभाष गोहत्रे व उत्तमराव भैसने, सुभाष प्रकाश खंडारे, इंजि. ज्ञानेश्वर कुर्वे, सुभाष शिंदे, वसंतराव भडके, धर्मपाल रामटेके, पारधी समाज नेते डॉ. शिवलाल पवार, रामकुमार खैरे, रविंद्र इंगळे पाटील सह फुले-शाहू-आंबेडकरांच्या अनुयायांनी केली.

## : हॅलो डॉक्टर :
## अशक्तपणा कारणं, लक्षणं आणि उपचार



मानवी शरीर हे अत्यंत गुंतागुंतीचे आहे, त्यामुळेच अनेकदा कोणतेही बाह्य लक्षण नसताना किंवा आजार सदृश परिस्थिती नसताना देखील आपल्याला अचानक प्रचंड थकवा जाणवतो.

शरीरात अशक्तपणाची जाणीव होते. अशक्तपणाची हि जाणीव विशेषतः स्त्रियांमध्ये मोठ्या प्रमाणात असते. हा अशक्तपणा रक्तातील पांढऱ्या किंवा लाल पेशींच्या कमतरतेमुळे देखील असू शकतो. यालाच ॲनिमिया असे संबोधतात. शरीरातील हा अशक्तपणा नेमका कोणत्या करणामुळे येतो? या अशक्तपणाची लक्षण काय आहेत? आणि यावर उपचार काय करायचे? याच प्रश्नाची उकल करण्यासाठी डॉ. निनाद जोगळेकर यांच्याशी बातचीत.

**अशक्तपणा म्हणजे नेमके काय?**

■ शरीरातील अशक्तपणा हा एक विकार आहे जो शरीरातील रक्तातील लाल पेशींचे प्रमाण अत्यंत कमी होते तेंव्हा जाणवतो. या लाल रक्तपेशींचे कार्य सुरळीत नसेल तेंव्हा अशक्तपणा जाणवतो. काही लोकांमध्ये हा अशक्तपणा अनुवांशिक पद्धतीने आलेला असतो. परंतु अनेकदा काही प्रकारच्या आजारामुळे अशक्तपणा येऊ शकतो. याचे वेगवेगळे प्रकार असले तरी काही प्रकारच्या अशक्तपणामध्ये कर्करोग सारख्या गंभीर आजराची चाहूल असते. त्यामुळे अशा शारीरिक अशक्तपणाचे वेळीच निदान करणे गरजेचे असते.

**अशक्तपणाची लक्षण नेमकी काय असतात?**

■ अशक्तपणामध्ये प्रचंड शारीरिक थकवा जाणवणे हे अत्यंत सामायिक लक्षण असते. त्याशिवाय छातीत दुखणे, चक्कर येणे, वारंवार कोणत्याही गोष्टीचा आजाराचा संसर्ग होणे,हदयाचे ठोके वाढणे, डोकेदुखी, त्वचेचा रंग फिकट होणे, श्वास लागणे इत्यादी लक्षण असू शकतात.

**अशक्तपणाची कारण काय आहेत?**

अशक्तपणा हा अनेक गोष्टीमुळे होऊ शकतो. आपल्या शरीरातील लोहाच्या कमतरतेमुळे जाणवणारा अशक्तपणा हा सामान्य प्रकारचा अशक्तपणा आहे.

एखादा दीर्घकालीन आजार असेल तरी अशक्तपणा जाणवू शकतो. शरीराची रोगप्रतिकारक शक्ती लाल पेशींवर हल्ला करते तेंव्हा अशक्तपणा जाणवतो. याला ऑटो इम्यूईन ॲनिमिया म्हणतात. लाल पेशींची कमतरता, व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता, यकृताचे विकार, थायरॉईड, कर्करोग, दाहक आतड्यांचा आजार, मूत्रपिंडाचे आजर,अशा अनेक कारणामुळे अशक्तपणा उद्भवू शकतो.

**अशक्तपणा या विकारावर कोणते उपचार आहेत?**

■ अनेकदा शारीरिक अशक्तपणा हा शरीरातील विशिष्ट घटकांच्या कमतरतेमुळे येऊ शकतो. शरीरात लोहाची कमतरता असेल तर पूरक कॅप्सुल किंवा गोळ्या देऊन हि कमतरता भरून काढता येते. आपल्या शरीरातील लाल रक्तपेशींची कमतरता भरून काढण्यासाठी व्हिटॅमिन बी ९ हे जीवनस्तव आवश्यक आहे. व्हिटॅमिन बी १२ देखील तितकेच पूरक आहे.

शारीरिक अशक्तपणासाठी एरिथ्रोप्रोएटिन, इमिनोसप्रेसनंट्स,हि औषध डॉक्टर लिहून देतात. मात्र या सर्व औषधोपचारा बरोबरच आपला आहार जर पूरक आणि परिपूर्ण असेल म्हणजे त्यामध्ये कडधान्य,पालेभाजा,फळभाजा, दुग्धजन्य पदार्थ यांचा पूरक समावेश असेल तर आपल्याला अशक्तपणा हा विकार होणार नाही.

■ ■ ■



## ॲडोलेसंट इडिओपॅथिक स्कोलियोसिस आजाराने त्रस्त मुलीवर यशस्वी उपचार


नोएडातील १५ वर्षीय आद्या ही तिची १० वीची बोर्ड परीक्षा संपली तेव्हा तिला ॲडोलेसंट इडिओपॅथिक स्कोलियोसिस असल्याचे निदान झाले, ज्यामध्ये पाठीचा कणा असामान्यपणे वळतो.

हे निदान धक्कादायक होते, कारण उपचार न केल्यास या आजारामुळे दीर्घकालीन शारीरिक समस्या उद्भवू शकतात.आद्या हिने फरीदाबाद येथील रुग्णालयात पाठीच्या कण्यातील सुधारणा शस्त्रक्रिया केली. या प्रक्रियेत सुरक्षितता आणि अचूकता सुनिश्चित करण्यासाठी प्रगत साधने आणि तंत्रांचा समावेश होता. तिला पाच दिवसांतच डिस्चार्ज देण्यात आला आणि शस्त्रक्रियेनंतर फक्त तीन आठवड्यांनी ती शाळेत परतली. त्यानंतर तिने तिचे नियमित वर्ग पुन्हा सुरू केले आहेत.

जेव्हा आद्या आमच्याकडे आली तेव्हा तिच्या पाठीच्या कण्यातील वक्रता जवळजवळ ५० अंशांपर्यंत पोहोचली होती, शस्त्रक्रियेच्या मर्यादेपलीकडे. ही विकृती केवळ सौंदर्य प्रसाधनात्मक नव्हती; उपचार न केल्यास ती फुफ्फुस आणि हृदयाच्या कार्यावर परिणाम करू शकते, असे अमृता हॉस्पिटल फरीदाबाद येथील स्पाइन सर्जरीचे प्रमुख डॉ. तरुण सुरी म्हणाले.

बोर्ड परीक्षा आणि सामाजिक दबावांना तोंड देणाऱ्या एका तरुण मुलीसाठी, आम्हाला माहित होते की भावनिक दावे वैद्यकीय परीक्षांइतकेच उच्च आहेत. आमच्या टीमचे ध्येय केवळ क्लिनिकल उत्कृष्टताच नाही तर संपूर्ण पुनर्प्राप्ती प्रदान करणे होते.

स्कोलियोसिस १० पैकी १ मुलाला प्रभावित करते, तरीही ते अनेकदा दुर्लक्षित केले जाते. १० ते १५ वयोगटातील हे सर्वात सामान्य आहे. ■ ■



## आरोग्यवर्धक खजूर

खजूर आपल्या शरीरासाठी उष्ण ठरतो असा अनेकांना समज आहे. पण खजूर हा केवळ तुमच्या हृदयासाठीच नाही तर मानसिक फिटनेससाठीही तितकाच महत्त्वाचा ठरतो.

आयुर्वेदापासून खजूराचे महत्त्व सांगण्यात आले आहे. भिजलेले खजूर खाण्याचे आरोग्यदायी फायदे आहेत.

खजुरामध्ये गॅस्ट्रोइंटेस्टाईन संक्रमण संतुलित करणारे गुण असतात. तसंच यामध्ये फायबरचे प्रमाण अधिक असल्यामुळे बद्धकोष्ठता सुधारण्यासाठी खजुराचा फायदा करून घेता येतो. रोज ३५ ग्रॅम फायबर खाल्ल्याने शौचाला स्वच्छ होते, पोटासंबंधित कॅन्सर रोखण्यासाठीही याचा उपयोग होतो. हृदयाच्या आरोग्यात सुधारणा आणण्यासाठी तुम्ही दिवसभरात मुठ्ठीभर खजुराचे सेवन करू शकता. खजुरातील असणारे ॲंटीऑक्सिडंट गुण हे आर्टरी सेल्समधून कोलेस्ट्रॉल घालविण्यास मदत करतात. खजूर रक्तदाबाचा स्तर निर्यंत्रित करण्यासाठी फायदेशीर ठरतात. कारण यामध्ये पोटॅशियम आणि मिनरल्स अधिक प्रमाणात आढलतात. साधारणतः २४ ग्रॅम मेडजूल खजुरामध्ये १६७ मिलिग्रॅम पोटॅशियम असतात. अन्य फळांच्या तुलनेत हे अधिक असून शरीरातील पोटॅशियमचे प्रमाण यातून अधिक संतुलित राहते.

■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com




# टॉमेटो गार्लिक पास्ता



**झटपट रेसिपी**

दोस्तांनो, पावसाळ्यात गरमागरम पण वेगळं काही खावंसं वाटतं. अशावेळी मस्तपैकी टॉमेटो गार्लिक पास्ता बनवता येईल.

**सामग्री:** ४०० ग्रॅम स्पॅगेटी पास्ता, दोन चमचे पार्मिसन चीझ, एक टी स्पून काळीमिरी, अर्धा किलो चेरी टोमॅटो, अर्धा टेबलस्पून लसूण, ६ ते ७ तुळशीची पानं किंवा बासिल हर्ब, एक टी स्पून सोया सॉस, एक टेबलस्पून टॉमेटो सॉस, एक टीस्पून ग्रीन चिली सॉस, मीठ, तेल आणि सजावटीसाठी कोथिंबिर

**कृती:** एका भांड्यात पाणी उकळायला ठेवा. त्यात थोडं मीठ घाला. पाणी उकळल्यानंतर त्यात स्पॅगेटी पास्ता घालून शिजवून घ्या. पाणी गाळून पास्ता गार करायला ठेवा. एका कढईत दोन टेबलस्पून तेल गरम करा. त्यात लसूण आणि टॉमेटो घालून शिजवून घ्या. टॉमेटो मऊ शिजल्यानंतर त्यात मिरपूड,मीठ, ग्रीन चिली सॉस, सोया सॉस घालून परतून घ्या. मसाला तयार झाल्यानंतर त्यात पास्ता घाला. यात टोमॅटो सॉस, बासिल किंवा तुळशीची पानं, चीझ आणि कोथिंबिर घालून पाच ते आठ मिनिटं शिजवून घ्या. तुमचा पास्ता तयार आहे. गरमागरम खा.

# लॉकर ठरले यशाची गुरुकिल्ली

**अचिव्हर**

सनत जैन आणि विशाल जैन हे दोघे मेहुणे आहेत. दोघेही पूर्वी दिल्लीतील चांदणी चौकात सीसीटीव्हीचे दुकान चालवत होते. परंतु या क्षेत्रातील वाढत्या स्पर्धेमुळे त्यांना हे दुकान बंद करावे लागले. त्यानंतर दोघांनी 'लवना स्मार्ट डोअर लॉक्स' नावाचा एक नवीन ब्रँड सुरू केला. ते डिजिटल लॉकर बनवतात. आज हा ब्रँड कोट्यवधी रुपयांचा बनला आहे.

सनत जैन आणि विशाल जैन यांनी बाजारपेठेतील वाढत्या स्पर्धेमुळे चांदणी चौकातील सीसीटीव्हीचे दुकान २०२० मध्ये बंद केले. या काळात ते चीनला गेले आणि दोघांनाही डिजिटल स्मार्ट लॉकर व्यवसाय सुरू करण्याची कल्पना सुचली. डिजिटल स्मार्ट लॉकरने प्रभावित होऊन त्यांनी प्रथम ते त्यांच्या घरात बसवले आणि त्याचा अनुभव घेतला. अशा प्रकारे त्यांनी 'डिजिटल स्मार्ट लॉकर'चा व्यवसाय सुरु केला. दोघांनीही हे क्षेत्र समजून घेण्यासाठी बाजारात जाऊन खूप



अभ्यास केला. विविध ब्रँडसाठी स्मार्ट लॉक बनवणारे ओईएम (मूळ उपकरण उत्पादक) म्हणून काम करण्यास सुरुवात केली.


दोघांनीही २०२१ मध्ये लवना स्मार्ट डोअर लॉक्स नावाचा स्वतःचा ब्रँड सुरू केला आणि या व्यवसायात प्रत्येकी ५० लाख रुपये गुंतवले. त्यांच्या मूळ कंपनीचे नाव भगवान श्री लॉक्स प्रायव्हेट लिमिटेड असे आहे. विशाल जैन यांनी खरेदी आणि सर्व्हिसिंग पाहिले तर सनत जैन यांनी विक्री आणि मार्केटिंगकडे लक्ष देण्यास सुरुवात केली. सुरुवातीला त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. परंतु हळूहळू लोकांचा त्यांच्या उत्पादनांवर विश्वास बसला आणि त्यांचा व्यवसाय वाढला.

**डिजिटल लॉकर्समध्ये प्रगत तंत्रज्ञान**

त्यांच्या डिजिटल स्मार्ट लॉकर्समध्ये प्रगत तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे. त्यात वाय-फाय आणि ब्लूटूथ, ०.४ सेकंदात फिंगरप्रिंट डिटेक्शन, ओटीपी सारखी वैशिष्ट्ये आहेत. आज भारतातील १२० स्टोअरमध्ये लवना स्मार्ट डोअर लॉक्सची विविध उत्पादने उपलब्ध आहेत. लवना स्मार्ट डोअर लॉक्सची उत्पादने ऑनलाइनदेखील विकली जातात. फक्त तीन वर्षात या कंपनीची उलाढाल सात कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे.


**टेक टॉक**

## एआय चॅटबॉट्सही धोकादायक




नवीन एआय चॅटबॉट्स आणि लेखन साधनांचा व्यापक वापर कंपन्यांना डेटा लीकचे बळी बनवू शकतो. हॅकर्स संवेदनशील कॉर्पोरेट तपशीलांमध्ये प्रवेश करण्यासाठी किंवा कंपनीविरुद्ध कारवाई करण्यासाठी चॅटबॉट्सना लक्ष्य करू शकतात, अशी भीती आहे. चॅटबॉट्समध्ये असलेली गोपनीय माहिती आता भविष्यात एआय कंपन्या चॅटबॉट्सना प्रशिक्षण देण्यासाठी वापरतील, अशीही चिंता आहे. अशा परिस्थितीत डेटा सुरक्षिततेची कोणतीही हमी नाही. 'मायक्रोसॉफ्ट कॉर्प आणि अल्फाबेट इंकसह प्रमुख टेक कंपन्या चॅटबॉट्स आणि सर्च इंजिन अधिक अद्ययावत करण्यासाठी 'जनरेटिव्ह एआय'चा वापर करत आहेत. यासाठी, ते इंटरनेटवर विचारल्या जाणाऱ्या प्रश्नां चा वापर करत आहेत. अशा परिस्थितीत चॅटबॉट्सना विचारलेले प्रश्नदेखील संग्रहित केले जात आहेत आणि त्यातून 'एआय'ला प्रशिक्षण दिले जात आहे, असे गृहीत धरले जाऊ शकते. या साधनांमध्ये गोपनीय किंवा वैयक्तिक डेटा भरला जात असेल तर डेटा हटवणे खूप कठीण असू शकते, असे अहवालात म्हटले आहे.

# केसाचा लूक बदलण्याची योग्य वेळ



**ग्रुमिंग**

पुरुषांच्या लूकमध्ये केसांची मोठी भूमिका असते. पण बऱ्याच पुरुषांना हेअरस्टाईलबद्दल योग्य माहिती नसते. त्यामुळे त्यांचा लूकही खराब होतो. लग्न-समारंभाच्या किती दिवस आधी केस कापणे योग्य आहे, याचाही कोणी फारसा विचार करत नाही. सहसा मुले सलूनमध्ये जातात आणि लग्नाच्या एक-दोन दिवस आधी केस कापतात. तुम्हीही अशी चूक करणार असाल तर थांबा.

सर्वप्रथम एखाद्या समारंभाला जाण्यापूर्वी किती दिवस आधी केस कापले पाहिजेत हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. जेणेकरून समारंभाच्या मुख्य दिवशी तुमची हेअरस्टाईल योग्य दिसेल आणि तुमचा लूकही अपेक्षेप्रमाणे दिसेल. लग्न किंवा साखरपुड्यासारख्या खास समारंभाच्या आधी पुरुषांनी निश्चित केस कापले पाहिजेत. पुरुषांचे केस लवकर वाढतात आणि त्यांना योग्य आकारात ठेवणे महत्त्वाचे आहे. परंतु समारंभाच्या फक्त एक-दोन दिवस आधी केस कापल्याने संपूर्ण चेहऱ्याचा लूक खराब होऊ शकतो. ५-६ दिवस आधी केस कापा

पुरुषांना एखाद्या विशेष समारंभाला किंवा स्वतःच्या लग्नाला उपस्थित राहायचे असते तेव्हा त्यांनी केसांचा उत्तम लूक येण्यासाठी सुमारे ५ ते ६ दिवस आधी केस कापून घ्यावेत. केस कापल्यानंतर, योग्य आकारात येण्यासाठी थोडा वेळ लागतो. त्यामुळे समारंभाच्या दिवशी हेअर स्टाईल परिपूर्ण दिसते. तसेच, इतके दिवस आधी केस कापण्यामुळे केस कापताना झालेल्या चुकादेखील दुरुस्त करता येतात.

**अॅप वर्ल्ड**

## आता 'एआय' करेल व्हिडीओ एडिटिंग

व्हिडिओ बनवणाऱ्यांसाठी 'मेटा एआय'ने एक उपयुक्त फिचर आणले आहे. व्हिडिओ बनवून एडिटिंगची गुंतागुंत नको असणाऱ्यांचे काम आता सोपे झाले आहे. आता फक्त व्हिडिओ अपलोड केला तरी नंतर 'मेटा एआय'च्या मदतीने ५० पेक्षा जास्त प्रॉम्प्टस वापरून त्यात हवे ते बदल करता येतात. या फीचरचा वापर करून आपण व्हिडिओतल्या व्यक्तींचे कपडे, पार्श्वभूमी, शैली आणि अगदी वातावरणदेखील बदलू शकतो. हे फिचर 'मेटा एआय अॅप' आणि वेबसाइटवर अगदी सहजपणे कार्य करते. युजरला फक्त त्याचा व्हिडिओ अपलोड करायचा आणि त्यात काय बदलायचे आहे, ते ठरवायचे आहे. म्हणजे तुम्हाला टी-शर्ट इतर रंगाचा हवा असेल किंवा पार्श्वभूमीत समुद्राऐवजी पर्वत दिसावेत, असे वाटत असेल तर फक्त संबंधित प्रॉम्प्ट निवडा आणि एआय काही सेकंदात तो बदल करेल.



# अक्षम्य चूक झाली!

**मॅच मेकिंग**

प्रेयसीसोबतचं तीन वर्षांचं नातं संपवून मी दुसऱ्याच मुलीकडे आकर्षित झालो. नातं संपवताना माझी प्रेयसी खूप रडली. पण काही काळानंतर तिने हा निर्णय स्वीकारला. मी शिक्षणानिमित्त दुसऱ्या शहरात गेल्यानंतर नवं नातं जोडलं. पण फक्त दहा महिन्यातच हे नातं संपलं. कॉलेज संपल्यानंतर ती मुलगीही मला सोडून गेली. आधीच्या प्रेयसीसोबतचं नातं संपवून मी खूप मोठी चूक केली आहे. आता आयुष्यात पुढे निघून गेली आहे. माझ्याशी बोलण्यात तिला रस नाही. मी काय करू?

**उत्तर :** सर्वात आधी तू समुपदेशकांना भेट. तुला नात्यामधून नेमकं काय हवं आहे, हे जाणून घे. याबाबतची स्पष्टता तुझ्याकडे असायला हवी. सद्यपरिस्थितीत तू स्वतःला वेळ दे. काही काळ कोणत्याही नात्यात अडकू नकोस. स्वयंविकासावर भर दे. तुझी प्रेयसी आयुष्यात पुढे निघून गेली आहे. त्याचप्रमाणे तूही भविष्याचा विचार कर. आता भूतकाळ बदलता येणार नाही. पण भविष्य आपल्या हातात आहे. उज्वल भवितव्यासाठी आपण नक्कीच प्रयत्न करू शकतो.



# इथे चुकू नका

**फॅशन पॅशन**

आपण फॅशनच्या बाबतीत काही चुका करत असतो. चुका करायला हरकत नाही पण त्या चुकांची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. अर्थात अजाणतेपणीही काही चुका होतात. त्या टाळल्या तर आपण नक्कीच स्मार्ट दिसू शकतो.

* दोस्तांनो, पँटचे खिसे वस्तू ठेवण्यासाठी असले तरी ते फुगता कामा नयेत. पँटच्या शिखातून बाहेर येणाऱ्या चाव्या, वॉलेट फार वाईट दिसतात. वॉलेट उगाचच खिशात कोंबू नका. बॅकपॅकच्या कप्प्यात टाका. कार्ड ठेवण्यासाठी लेदरच्या कार्ड होल्डरचा वापर करा.

* फार लांब ट्राउझर्स घालू नका. यामुळे तुमच्या लूकचा पार विचका होईल. पँट पायात येणार नाही याची काळजी घ्या.

* 'स्क्वेअर टो ड्रेस' हा बुटांचा प्रकार आता बराच मागे पडला आहे. हे बूट आउट ऑफ फॅशन आहेत. त्यामुळे ते कॅरी करू नका. त्याऐवजी पुढच्या बाजूने गोलाकार असणारे शूज घ्या.

* एकाच वेळी जास्त अॅक्सेसरीज घालून नका. त्याऐवजी छानसं घड्याळ, पॉकेट स्वेअर, ट्रेंडी टाय, कफलिंक्स यापैकी काहीतरी ट्राय करा.

* मोज्यांची निवड योग्य असायला हवी. ट्राउझरला साजेसे न्यूट्रल रंगाचे मोजे घ्या. बुटांना शोभणारे भडक रंगाचे मोजे अजिबात घेऊ नका. कॉन्ट्रास्ट सॉक्सही चालून जातील. पण असे सॉक्स कॅज्युअल ऑकेजनसाठी ठेवा.

* खोल व्ही नेक असणारा टी शर्ट अजिबात घालू नका. असे टी शर्ट चांगले दिसत नाहीत. त्याऐवजी हेन्ले स्टाईल टी शर्टस ट्राय करा.



**नवे काही**

## कुलरमधून घ्या एसीची हवा!

कुलरमध्ये बर्फासोबत दोन ते तीन चमचे मीठ टाकल्यावर कुलर एसीपेक्षाही थंड हवा देते. तसेच याचा वीजबिलावर कोणताही परिणाम होत नाही. बर्फ आणि मिठाचे मिश्रण कूलरमध्ये टाकल्यानंतर थोड्याच वेळात पूर्वीपेक्षा अधिक थंड हवा येत असल्याची जाणीव होईल. जवळपास एसीमधून येते तेवढीच थंड हवा कुलरमधून येईल. अनेक जण या ट्रीकवर संशय व्यक्त करतात. मात्र ही ट्रीक काम करते. यामागे महत्त्वाचे कारण म्हणजे, तुम्ही बर्फामध्ये मीठ टाकता तेव्हा तो बर्फ अधिक वेगाने वितळू लागतो. बर्फ वितळल्यामुळे कुलरमधून एसी इतकी थंडी हवा मिळते. मात्र हा प्रयोग करताना केवळ दोन ते तीन चमचे एवढेच मीठ टाकावे. त्यापेक्षा अधिक टाकल्यास मीठाच्या पाण्यामुळे कुलरमधील काही इलेक्ट्रिकल पार्ट्स खराब होण्याची शक्यता असते. काही लोखंडांच्या पार्ट्सवर यामुळे गंज चढतो.



# जिने चढा, फिट रहा



**फिटनेस फंडा**

फिटनेस राखण्यासाठी, वजन कमी करण्यासाठी आपण बरंच काही करतो. ट्रेडमीलसारखी महागडी उपकरणं विकत घेतो. जीमच्या मेंबरशीपसाठी बरेच पैसे खर्च करतो. पण तुम्ही स्वस्तात फिट राहू शकता. यासाठी हवी समर्पित वृत्ती, जिद्द आणि जिने. तुमच्या इमारतीला भरपूर जिने असतील तर वॅलरी जाळण्यासाठी तुम्हाला दुसरीकडे कुठेही जावं लागणार नाही. जिन्यावरून धावणं हा एक उत्तम व्यायाम ठरु शकतो. फक्त अर्धा तास जिन्यावरून धावल्याने ५०० कॅलरी खर्च होतात, असं काही संशोधनांमधून समोर आलं आहे. त्यामुळे तुम्ही जिन्यांवरून धावण्याचा व्यायाम सुरू करू शकता. याबाबतच्या काही टिप्स...

* इतर कोणत्याही व्यायाम प्रकाराप्रमाणे जिन्यावरून धावण्याचा व्यायाम सुरू करण्याआधी 'वॉर्म अप' म्हणजे पूर्वतयारी करणं गरजेचं आहे. धावणं सुरू करण्याआधी ३ ते ४ मिनिटं जिन्यांवरून चढउतार करा. हळूहळू वेग वाढवा.

* जिन्यांवर तुम्ही पुश-अपही करू शकता. नेहमीच्या पुश-अप्सप्रमाणेच हा व्यायाम करायचा आहे. खालच्या पायरीवर उभे रहा. हात तिसऱ्या किंवा चौथ्या पायरीवर ठेवा आणि पुशअप्स करा.

* व्यायाम करायला फार वेळ नसला तरी काळजी करू नका. पाच मिनिटं जिन्यांवरून चढउतार करा. मग वेग वाढवा. त्यानंतर पुढची पाच मिनिटं जिन्यांवरून जोरात धावा. फक्त दहा मिनिटांत तुमचा व्यायाम होईल.

* तुमच्याकडे २० मिनिटं असतील तर एक पायरी सोडून जिने चढण्याचा व्यायाम करा. सुरुवातीला वेग कमी ठेवा. मग दोन पायऱ्यार सोडून जिने चढण्याचा प्रयत्न करा.

# 'न्यूक्लिअर इंजिनीअरींग'चा आकर्षक पर्याय

**करियर वाटा**

आजच्या युगात ऊर्जा ही सर्वात मोठी गरज बनली आहे. वाढत्या मागणीमुळे पर्यावरणपूरक, सुरक्षित आणि टिकाऊ ऊर्जा स्रोतांची आवश्यकता अधिक तीव्र झाली आहे. अशा परिस्थितीत 'न्यूक्लियर इंजिनीअरिंग' ही शाखा करिअरसाठी एक महत्त्वपूर्ण आणि आकर्षक पर्याय ठरते. ही शाखा केवळ वीज निर्मितीपुरती मर्यादित नसून वैद्यकीय क्षेत्र, संशोधन, संरक्षण आणि औद्योगिक विकासातही मोठ्या प्रमाणात योगदान देते.

**न्यूक्लियर इंजिनिअरिंग म्हणजे काय?**

'न्यूक्लियर इंजिनीअरिंग' या विज्ञानशाखेत अणुऊर्जेचा वापर करून वीज निर्मिती, रेडिएशन नियंत्रण, अणुउर्जा रिएक्टरचे डिझाइन, आणि कचरा व्यवस्थापन (वेस्ट मॅनेजमेन्ट) यासारखी कामे केली जातात. यात भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित यांचा समावेश असतो.

**न्यूक्लियर इंजिनिअरिंगमध्ये हे कोर्सेस उपलब्ध आहेत.**

*बी. टेक-चार वर्षांचा

*एम. टेक/एम. एस.-एक ते दोन वर्षांचा

* पीएच. डी- संशोधनासाठी तीन ते पाच वर्षांचा कोर्स

भारतामध्ये प्रवेशासाठी जेईई, गेट, किंवा सीयूईटी परीक्षांमधून पात्रता मिळवावी लागते. बारावीत पीसीएम (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित) असणे आवश्यक आहे.

**अभ्यासक'मासाठी प्रमुख शैक्षणिक संस्था**



**भारतात :**

*आयआयटी - रिएक्टर फिजिक्समध्ये विशेष अभ्यासक'म

* जादवपूर विद्यापीठ -एम. टेक. साठी उत्कृष्ट पर्याय

* भाभा अॅटॉमिक रिसर्च सेंटर - संशोधन व प्रशिक्षणासाठी प्रसिद्ध

*पंडित दीनदयाळ ऊर्जा विद्यापीठ - खासगी क्षेत्रात आघाडीवर

**परदेशात:**

*एमआयटी(अमेरिका) - रिएक्टर डिझाइनसाठी जागतिक मान्यता

*यूसी बर्कली (अमेरिका)- न्यूक्लियर फ्युजन संशोधन

*इम्पिरिअल कॉलेज, लंडन (ब्रि'टन) - डीकमिशनिंग आणि सेफ्टी कोर्सेस

*मॅकमास्टर विद्यापीठ (कॅनडा) - मेडिकल अॅप्लिकेशन्सवर भर

*केआयटी (जर्मनी) - वेस्ट मॅनेजमेंटसाठी प्रसिद्ध

भारतात केवळ मोजक्याच संस्था न्यूक्लियर इंजिनिअरिंग कोर्सेस देतात. त्यामुळे प्रवेशासाठी मोठी स्पर्धा असते. परदेशात प्रवेशासाठी जीआरई, टोफेल, किंवा इलेट्स स्कोअर लागतो. परदेशातील वार्षिक फी सुमारे २०-५० लाखादरम्यान असते, तर भारतात ती दोन ते आठ लाखांदरम्यान असते.

**पगार आणि करिअर संधी**

'न्यूक्लियर इंजिनीअरींगच्या क्षेत्रात नोकरी मिळाल्यावर भारतात चार ते सहा लाख रुपये इतका वार्षिक पगार मिळतो. अनुभव वाढल्यावर तो १०-१५ लाखांपर्यंत जातो. अमेरिकेत सरासरी पगार १.०५ ते १.६० लाख डॉलर (८५ लाख ते १.३ कोटी) पर्यंत असतो. ब्रिटनमध्ये मिड-लेव्हल इंजिनीअर्सना ३५ ते पन्नास हजार पौंड (३७ ते ५३ लाख) पगार मिळतो.

**मुख्य करिअर पर्याय :**

*न्यूक्लियर इंजिनीअर- पॉवर प्लँट्समध्ये रिएक्टर डिझाइन आणि ऑपरेशन

*सेफ्टी इंजिनीअर- रेडिएशन नियंत्रण आणि पर्यावरण सुरक्षा

*रिसर्च सायंटिस्ट - न्यूक्लियर फ्युजन/वेस्ट मॅनेजमेंट

*मेडिकल फिजीस्ट - रेडिएशन थेरपी उपकरणांचे डेव्हलपमेंट

*प्रोजेक्ट इंजिनीअर - न्यूक्लियर प्रकल्पांचे नियोजन आणि अंमलबजावणी.

# लोणावळ्यात काय पाहाल?



**भटकंती**

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीतून थोडा वेळ स्वतःसाठी काढणे खूप महत्त्वाचे असते. त्यामुळे निश्चितच आपल्या डोक्यावरील ताण कमी करण्यास मदत होते. तसेच बाहेर फिरायला गेल्याने आपण ताजे तवाने होऊन पुन्हा जोमाने कामाला लागू शकतो. त्यामुळे लोक अनेकदा शनिवार-रविवारी फिरायला जाण्यासाठी बाहेर पडतात. असेच एक ठिकाण म्हणजे लोणावळा.

लोणावळा मुंबईपासून १२० किलोमीटर तर पुण्यापासून साठ किलोमीटर अंतरावर आहे. पार्टी करण्यापासून निसर्गाचा आनंद घेण्यापर्यंत सर्व गोष्टींसाठी हे ठिकाण परिपूर्ण आहे. लोणावळ्याला फिरायला जाण्यासाठी सकाळी लवकर निघा. इथे पोहोचून नाश्ता केल्यानंतर तुम्ही काही वेळ विश्रांती घेऊ शकता. यानंतर, साइटसीइंगला सुरुवात करा. इथे तुम्हाला भुशी धरण पाहायला मिळेल. ते पावसाळ्यात खूप सुंदर दिसते. याशिवाय, तुम्ही सनसेट पॉइंट/ टायगर पॉइंट, लायन पॉइंटवरून अद्भुत दृश्याचा आनंद घेऊ शकता.

लोणावळ्यात दुपारपर्यंत फिरल्यानंतर तुम्ही कोणत्याही प्रसिद्ध रेस्टॉरंट किंवा कॅफेमध्ये दुपारचे जेवण करू शकता. तुम्हाला हवे असल्यास कोणत्याही फार्महाऊस किंवा रिसॉर्टमध्ये बुफे लंचदेखील बुक करू शकता. किंवा तुम्ही स्ट्रीट फूडचा आनंद घेऊ शकता. दुपारी पुन्हा फिरायला जा. या वेळी तुम्ही लोणावळा तलाव, विसापूर किल्ला नक्की पाहा. लोणावळ्याला वॅक्स संग्रहालय आहे. ते मुलांना नक्कीच आवडेल. खरेदी करायची असेल तर तुम्ही स्थानिक चिक्की मार्केटमध्ये तेथील स्पेशल चिक्की व इतर खरेदी करू शकता.

**संध्याकाळी हिल व्ह्यू पॉइंटचा आनंद घ्या**

संध्याकाळी कोणत्याही हिल व्ह्यू पॉईंटवर चहा आणि भज्यांचा आस्वाद घ्या. हवामान चांगले असेल तर तुम्ही रस्त्याच्या कडेला असलेल्या स्टॉलवर थांबून खाऊ-पिऊ शकता. गर्दी आणि रहदारी टाळण्यासाठी सकाळी लवकर निघणे महत्त्वाचे आहे.

# पाणलोट विकास अंतर्गत अभ्यास दौरा उत्साहात

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**मालेगाव** - पाणलोट विकास अभियान अंतर्गत मालेगाव तालुक्यातील तिवळी, वसारी, ढोरखेडा, किन्ही घोडमोड या गावां मधील शेतकऱ्यांचा अभ्यास दौरा हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथील हळद संशोधन केंद्रावर उत्साहात पार पडला.



या अभ्यास दौऱ्यादरम्यान सहभागी शेतकऱ्यांना हळद उत्पादनातील आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित वाण, सेंद्रिय शेती, प्रक्रिया व मूल्यवर्धन याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. तज्ञांनी विविध पद्धतींचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह सादरीकरण केले. कार्यक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये हळद पिकाचे उत्पादनक्षमता व गुणवत्ता सुधारण्याविषयी जागरूकता निर्माण झाली असून त्याचा उपयोग भविष्यातील शेती पद्धतीमध्ये नक्कीच होईल, असा विश्वास सहभागी शेतकऱ्यांनी व्यक्त केला.

# भोकरखेड येथे शुद्ध जल प्रकल्पाचे थाटात लोकार्पण!

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**रिसोड** - तालुक्यातील वाडी रायताळ भोकरखेड गट ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आणि १५व्या वित्त आयोगाच्या निधीतून शुद्ध पिण्याच्या पाण्याच्या योजनेचे उद्घाटन सोहळा गावातील हनुमान मंदिर सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक व स्वस्त धान्य दुकानदार निवृत्ती रंजवे होते. प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समितीचे विस्तार अधिकारी विजय साबळे, विस्तार अधिकारी संजय पडोळे, तलाठी सौ. गौरी काष्टे, सरपंच राधा हागे, तसेच ग्रामपंचायत सदस्य व स्थानिक मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात विद्येच्या अधिष्ठात्री देवी माता सरस्वती व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या



प्रतिमेला पुष्पहार अर्पण व दीप प्रज्वलन करून करण्यात आली. या नंतर फटाक्यांची आतषबाजी करत जल प्रकल्पाचे फीत कापून थाटात उद्घाटन करण्यात आले.यावेळी प्रमुख पाहुणे संजय पडोळे बोलताना म्हणाले, 'शुद्ध जल ही काळाची गरज आहे. आरोग्यदायी जीवनासाठी हे पाणी लाभदायक ठरेल. गावकऱ्यांनी याचा काटकसरीने आणि जबाबदारीने वापर करावा. 'कार्यक्रमात उपस्थित नागरिकांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती.

या उपक्रमासाठी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, तलाठी, तंटामुक्ती अध्यक्ष, पाणी पुरवठा शिपाई व ग्रामपंचायत कारकून यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन व आभार प्रदर्शन पुरुषोत्तम रंजवे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वार्ताहर डॉ. रामेश्वर रंजवे यांचेही योगदान लाभले.

# रिसोड आगारातून पंढरपूर यात्रेसाठी ४० बसेस

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**रिसोड** - जगभरातील लाखो भाविकाचे श्रद्धास्थान आसलेल्या विठू माउली नामाचा गजर करत असंख्य पालख्या पंढरपूरकडे मार्गस्थ होणार आहेत. शेकडो लालपरीसुध्दा आता सज्ज झाल्या आहेत. पंढरपूर यात्रेकरिता रिसोड आगरातून ४० बसेसचे नियोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे नवीनच एसटीच्या ताफ्यात दाखल झालेल्या लालपरीला ही जबाबदारी देण्यात आली आहे.

१ जुलैला सकाळी १० वाजता पहिली गाडी पंढरपूरसाठी रिसोड आगारातून सुटणार आहे. याबाबतचे नियोजन एसटी महामंळाकडून पूर्ण



नियोजन झाल्याची माहिती मिळाली आहे

२३ गाड्या इतर आगारातून मिळवल्या. १७ गाड्या रिसोड आगराच्या आहेत. एकूण आषाढी यात्रेच्या बसगाड्या सुटण्यासाठी रिसोड आगारातून १जुलै ला प्रारंभ



या कालावधीत यात्रा स्पेशल बसेस सोडण्यात येणार आहेत. रिसोड विभाग प्रमुख अधिकारी निलेश बोदाडे यांच्याकडे जबाबदारी सोपविण्यात आली आहे. विशेष मागच्या वर्षीच्या तुलनेने यंदा अधिक बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. मागील वषपिक्षा ५ जादा बसेस पंढरपूरकरिता निघणार आहेत - **निलेश बोदाडे, आगर प्रमुख, रिसोड**

होणार आहे. ४० गाड्या आहेत. पहिली बस १ जुलैला पंढरपूरसाठी सोडण्यात येणार सकाळी १० वाजता पंढरपूरला जाणार आहे. महामंडळाकडून पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांसाठी यात्रा स्पेशल बसेससाठी वारकऱ्यांचे स्वागत करण्यात येणार आहे. भाविकांना त्यापूर्व त्यापूर्वी नियोजित वेळेत तीर्थस्थळी पोहोचता यावे, यासाठी भाविक भक्तांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.पंढरपूरच्या वारीसाठी जाणाऱ्या भाविकांचा प्रवास सुखकर व अपघात विरहित व्हावा, यासाठी चालक व वाहकांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. प्रवाशांची गैरसोय होऊ नये, यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. मागणा ‍नुसार, आगारनिहाय एसटी बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहे.

# वानराने केले सौर ऊर्जा पॅनेलचे नुकसान



▸ महासागर प्रतिनिधी ▸

**मानोरा** - तालुक्यातील धामणी येथील शेतकरी भूषण अशोक धोटे यांच्या शेतात बसविण्यात आलेले सिआयआर कंपनीचे सौर ऊर्जा पॅनलचे नुकसान वानराने धुकाकुळ घालून नुकसान केल्याने मोठी हानी झाली आहे.

शेती सिंचन करण्यासाठी धामणी शिवारातील शेत सर्वे नंबर ७१ मध्ये सी आर आय कंपनीचे सौर ऊर्जा प्रकल्प बसविण्यात आले होते. शेतात उभे असलेले सौर उर्जावर वानराने धुकाकुळ घातल्याने सौर ऊर्जाचे नुकसान होऊन ते बंद पडले आहे. आगामी काळात पिकांना पाणी देण्यासाठी सौर ऊर्जा उपकरण बंद पडल्याने पंचाईत होणार आहे. त्यामुळे सी आर आय कंपनीने याबाबतची दखल घेऊन सौर उर्जा उपकरण दुरुस्त करून देण्यात यावे, अशी मागणी पिडीत शेतकऱ्याकडून होत आहे.

# राष्ट्रीय महामार्गावरील दुभाजक दुरुस्तीचे आदेश, आ.सईताई डहाके यांचा जनतेच्या सुरक्षेसाठी तातडीचा निर्णय

▸ महासागर प्रतिनिधी ▸



**कारंजा** - शहराला लागून असलेल्या राष्ट्रीय महामार्ग वरील दुभाजकांची दुरवस्था ही मागील काही काळापासून वाहनचालक व पादचाऱ्यांसाठी गंभीर धोका ठरत होती. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या तक्रारींची गंभीर दखल घेत आमदार सईताई डाहाके यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाशी तात्काळ बैठक घेऊन दुभाजक दुरुस्तीचे स्पष्ट आदेश दिले.

दुरुस्तीसाठी आदेशित करण्यात आलेल्या ठिकाणी पुढील भागांचा समावेश आहेः संभाजीनगर ते नागपूर महामार्गावरील कोळी व तपोवन रोडवरील दुभाजक रिलायन्स पेट्रोलपंप (समोर) अनई फाटा ते बिरसा मुंडा चौक स्व. विनायक सावरकर चौक तसेच कारंजा-दारव्हा मार्गावरील खान पेट्रोलपंपसमोरील दुभाजक या ठिकाणी अनेक ठिकाणी दुभाजकांचे कॉंक्रीट ब्लॉक्स तुटलेले, संरचना अपूर्ण तर काही ठिकाणी ते रस्त्यावर आडवे पडल्याने अपघाताची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढली होती.

या अनुषंगाने सर्वधर्म मित्र मंडळ संस्थेने नागरिकांच्या वतीने सातत्याने आवाज उठवला होता. संस्थेच्या अध्यक्ष श्याम सवाई यांनी सांगितले की, 'हे काम खूप आधीच व्हायला हवे होते. मात्र आमदार सईताई डाहाके यांनी तातडीने पुढाकार घेऊन निर्णय घेतल्याने रस्त्यांवरील सुरक्षेला नवे बळ मिळणार आहे. यामुळे अपघात टळतील आणि रस्त्यांचं सौंदर्यही खुलून येईल.' या निर्णयामुळे स्थानिक व्यापारी, वाहनचालक व नागरिकांनी आमदार डाहाके यांचे खुले दिलाने आभार मानले आहेत. 'सार्वजनिक सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत दर्जेदार काम पूर्ण करण्याची हमी दिली असून, कारंजा शहराचे अपघातमुक्त शहर म्हणून रूपांतर करण्यासाठी हा निर्णायक टप्पा ठरेल,' असे वक्तव्य आमदार सईताई डाहाके यांनी केले.

हा केवळ दुभाजक दुरुस्तीचा आदेश नसून, नागरिकांच्या सुरक्षेसाठी घेतलेला काळजीचा व दूरदृष्टीचा निर्णय आहे. या सामाजिक जाणीवेने प्रेरित झालेल्या कार्यामुळे जनतेमध्ये आमदारांविषयी नव्याने विश्वास निर्माण झाला आहे.

# 'मन की बात' चा १२३ वा भाग वाशिममध्ये १८ ठिकाणी यशस्वी

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**वाशिम** - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाचा १२३ वा भाग आज भारतीय जनता पार्टी वाशिम शहर च्या वतीने वाशिम शहरातील विविध १८ ठिकाणी अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. जनतेच्या मनाशी थेट संवाद साधणारा हा कार्यक्रम प्रत्येक ठिकाणी उत्साहात आणि जनसामान्यांच्या मोठ्या सह भागासह संपन्न झाला.

कार्यक्रमाचे आयोजन आमदार श्याम खोडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. विशेषतः त्यांच्या जनसंपर्क कार्यालयात झालेल्या मुख्य कार्यक्रमाला अधिवक्ता अभय घुडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे संवाद अधिक प्रभावी आणि परिणामकारक ठरला.मन की बात हा कार्यक्रम केवळ रेडिओवरील संवाद नसून तो भारताच्या जनतेशी जोडलेली एक लोकशाही चळवळ आहे. त्यातून नागरिकांमध्ये देशप्रेम, सामाजिक सहभाग आणि सकारात्मक विचारसरणी यांची प्रेरणा मिळते.या



उपक्रमाच्या यशस्वितेसाठी वाशिम शहरातील माजी नगरसेविका आम्रपाली अनिल ताजने, बोध क्रमांक २२७, माजी नगरसेविका करुणाताई कल्ले, बूथ क्रमांक २२०, डॉक्टर कविता खरात, बुथ क्रमांक २२८, माजी नगर सेवक बाळू मुरकुटे, बुथ क्रमांक २७२, गिरीश शर्मा बुथ क्रमांक २७३, शेखर बंठे बुथ क्रमांक २३४, कपिल सरडा बुथ क्रमांक २५६, छाया मडके बुथ क्रमांक २३०, देवेन बागरीच्या बूथ क्रमांक २२९, गणेश खंडाळकर बुथ क्रमांक २५९, भिमकुमार जीवनानी बुथ क्रमांक २२९, स्वप्निल जाधव बुथ क्रमांक २४७, रत्नमाला नप्ते बूथ क्रमांक २३५, प्रदीप देशमुख बुथ क्रमांक २५४, संगीता इंगोले बूथ क्रमांक २८० व इतर असे ऐकून १८ प्रत्येक बूथ प्रमुख, स्थानिक पदाधिकारी आणि समर्पित कार्यकर्त्यांचे योगदान महत्त्वाचे राहिले. भाजपा वाशिम शहराध्यक्ष मनीष मंत्री यांनी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले आणि पुढे असे कार्यक्रम अधिक व्यापक पातळीवर राबवण्याचा संकल्प व्यक्त केला. 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' या पंतप्रधान मोदींच्या विचारधारेला बळ देणारा हा उपक्रम भविष्यातही समाजमनाशी नातं अधिक दृढ करेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# मुख्यमंत्री युवाकार्य प्रशिक्षणार्थी संघटनेचे आ.अमित झनक यांना निवेदन

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**मालेगाव** - मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेअंतर्गत रिसोड मालेगाव मतदार संघातील प्रशिक्षणार्थी यांनी दिनांक २८ जून रोजी आमदार अमित झनक यांच्या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी शासनाकडून राबविण्यात आलेल्या प्रशिक्षण योजनेचा कालावधी वाढविण्याबाबत न्याय देण्याची मागणी निवेदनाद्वारे केली.

आमदार अमित झनक यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले की, विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून युवक - युवतींना रुजु केले. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करित आहोत. तथापी आमच्या भविष्याबाबत अनिश्चितता व संभ्रम निर्माण झालेला आहे. त्यामुळे याबाबत शासनाकडून योग्य ती ठोस पावले उचलण्याची गरज असतांना त्याकडे दुर्लक्ष होत आहे. गेल्या काही



दिवसांपूर्वी विविध मागण्या संदर्भात सतत एक ते दोन महिने आझाद मैदान मुंबई येथे शांतता पुर्ण मार्गाने उपोषण केले होते. या उपोषणाची दखल घेऊन शासनाने प्रशिक्षण कालावधी फक्त पाच महिन्याची मुदतवाढ दिलेली होती परंतु प्रशिक्षणाचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर युवकांच्या भविष्याचे काय होईल याबाबत कोणतेही स्पष्टता नाही. निवडणूक प्रचारादरम्यान आत्ताचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणी कौशल्य विभागाचे मंत्री मंगल प्रभा लोढा यांनी या योजनेंतर्गत सर्व

महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी योजना सुरू केली असून बेरोजगार युवकांना रोजगार मिळुन दिला आहे. मात्र या युवा प्रशिक्षणार्थी शिक्षक यांना शासनाने कार्यकाळ व मानधन वाढवून दिले पाहिजे तसेच बेरोजगार युवकांना रोजगाराची संधी दिली पाहिजेत . - **मोहसिन खान ताहेर खान प्रशिक्षणार्थी**

प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या कार्यरत असलेल्या आस्थापना मध्ये कायमस्वरूपी रोजगार देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र अद्याप ही आश्वासने पुर्ण झालेली नाहीत याकडे लक्ष द्यावे अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.निवेदन देताना मोहसीन खान ताहेर खान, धनंजय दत्तराव देशमुख, रेश्मा अलीम शहा, सय्यद आसिफ सय्यद इसा, यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# पावसाच्या नुकसानीचे तत्काळ पंचनामे करा - अमोल गायकवाड

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**मालेगाव**- मुसळधार पावसाने वाशिम जिल्ह्यातील शेतकरी बांधवाने खरीप पिकाची केलेली पेरणी खरडून निघालेली आहे. तसेच अनेक गावात संततधार पावसामुळे घरांची पडझड झाली सदर नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई दयावी.

अशी मागणी राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे मालेगाव - रिसोड विधानसभा अध्यक्ष अमोल पाटील गायकवाड यांनी केली आहे. या संदर्भात अमोल गायकवाड म्हणाले की, २५ व २६ जून रोजी वाशिम जिल्ह्यात सर्वदूर बरसलेल्या पावसामुळे सर्वाधिक नुकसान हे मालेगाव व रिसोड तालुक्यात झाले. अनेक ठिकाणी नद्याना आलेल्या पुरामुळे तसेच गावालगतची अनेक नाले ओसांडून वाहत आहेत. त्यामुळे पूर परिस्थितीमुळे शेतकरी बांधवांनी



खरीप हंगामात काही दिवसांपूर्वीच केलेली पेरणी ही पूर्णपणे खरडून गेली आहे. शिवाय अनेक गावात घरांची पडझड झालेली असून नागरिकांना नुकसानीस सामोरे जावे लागले आहे. त्यामुळे सदर नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून लवकरात लवकर शेतकरी बांधवांना नुकसानीची भरपाई मिळणे गरजेचे आहे. करिता तात्काळ पंचनामे करावे व शेतकरी बांधवांना नुकसान भरपाई लवकरात लवकर मिळावी. अशी मागणी गायकवाड यांनी केली आहे.

# संत गाडगेबाबा दिंडीने ढवळेश्वर संस्थान परिसरात विविध झाडांच्या बियांचे बीजारोपण

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**मालेगाव** - वैराग्यमूर्ती राष्ट्रसंत श्री गाडगेबाबा यांच्या काळापासून अमरावती ते पंढरपूर पर्यंत जाणारी दिंडी गेल्या ६८ वर्षापासून मालेगाव येथे येते, या दिंडीत स्वतः गाडगेबाबा, नंतर त्यांचे नातू वासुदेव सोनवणे, पणतू आणि आज गाडगेबाबा यांचे वंशज सतिष सोनवणे यांचा प्रत्यक्ष समावेश असतो. या दिंडीचे यथोचित स्वागत, सत्कार जेवणाची व्यवस्था जगदीश बळी यांच्या परिवाराकडून केली जाते.

'गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला' या भजनाच्या माध्यमातून समाजात सेवा, स्वच्छता,



निसर्ग संवर्धन, शिक्षणाचा प्रसार आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश या दिंडीच्या वतीने दिला जातो. संत गाडगेबाबा यांच्या दिंडीच्या वतीने अमरावती ते पंढरपूर पर्यंत जातांनी गुरुकुंज मोझरी येथील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या फळे, फुले व विविध झाडांच्या बियांचे बीजारोपण रस्त्यांच्या बाजूने केले जाते... आज ना. ना. मुंदडा विद्यालयाचे व शिक्षण प्रसारक मंडळाचे सन्माननीय सचिव आशिष मुंदडा, संचालक जगदीश रावजी बळी, संजय बळी, विशाल बळी, डॉ निलेश मानधने, प्रा अरविंद गाभने, दत्ता बळी सुमित जमधाडे, राजेश बळी, प्रा अनिल काळे, प्रा अरविंद पिंपळकर ,प्रा अंकुश सोमाणी आणि दिंडीचे प्रमुख गाडगेबाबा यांचे वंशज सतीष सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री ढवळेश्वर मंदिराच्या परिसरात विविध झाडांच्या बिजांचे बिजारोपण करण्यात आले.

# जातिगत जनगणना एक होण्यासाठी बंजारा समाजाकडे चालत आलेली सुवर्णसंधी पिठाधीश्वर - आ.बाबूसिंग महाराज

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**मानोरा** - तालुक्यातील तीर्थक्षेत्र पोहरादेवी येथे बंजारा पिठाधीश्वर विधान परिषद सदस्य आ. बाबसिंग महाराज (राठोड) यांच्या नेतृत्वाखाली आज देशभरातील बंजारा समाज बांधवांची विशेष चिंतन बैठक गंभीर मंथन करून संपन्न झाली यावेळी महाराज परिवारातील अनेक सदस्य, राजकीय, अध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर तथा देश भरातून मोठ्या प्रमाणात आलेले समाज बांधव जमले होते.

सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या महाराष्ट्र व देशभरात माघारलेला बंजारा समाज कोट्यावधीच्या संख्येत अधिवास करीत असून विविध राज्यामध्ये एकात्मता असलेल्या या समाजाला विविध




श्रेणीत सूचीबद्ध करण्यात आलेले असल्याने शासनाच्या मुख्य प्रवाहापासून विलग झालेला हा आदिम समुदाय केंद्र शासनाने घोषित केलेल्या जातिगत जनगणनेच्या माध्यमातून एका सुचित बांधला जावा यासाठी समाजातील प्रज्ञावंत व कायद्यातील जाणकारांनी अभ्यास करून समाजाच्या विकासासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन बैठकीचे आयोजक व अध्यक्ष आ. बाबुसिंग महाराज यांनी मार्गदर्शन करताना मत व्यक्त केले.

अखिल भारतीय बंजारा लमाण शक्तीपीठ संस्था पोहरादेवी द्वारा आयोजित या बैठकीची प्रस्तावना सदाशिव चव्हाण यांनी करताना स्वातंत्र्योत्तर या समाजाला शासनाकडून एका सूचित आणण्यासाठी प्रयत्न न केल्या गेल्यामुळे एक भाषा एक, संस्कृती व चालीरीती संपूर्ण देशभरात एकच असलेला बंजारा समाज आपल्या न्याय हक्कापासून वंचित राहिलेला असून संघ सरकारने घोषित केलेल्या जातिगत जनगणनेच्या माध्यमातून या समाजाची देशपातळीवर एकी अधोरेखित होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले.

राज्य व परराज्यातून मोठ्या संख्येत बंजारा, लमाण, लंबाडी आधी नामाभिमान धारण केलेले गोरबंजारा समाज बांधव तथा मोठ्या प्रमाणात समाजातील भगिनींनी सुद्धा या बैठकीत सहभाग नोंदविला.माजी विधान परिषद सदस्य निलय नाईक, मोहिनीताई नाईक, सुनील महाराज, शेखर महाराज यांचे समायोचीत भाषण यावेळी झाले. व्यासपीठावर संजय महाराज, प्रा.पिटी चव्हाण, प्रा. वसंत राठोड , सुभाष राठोड आदी मान्यवरांची यांची उपस्थिती होती.

# चला पंढरपूर... पण यंदा थेट आपल्या गावातून!

## विठ्ठल भक्तांसाठी एस.टी. विभागाची खास सोय,, एस टीच्या सर्व सवलती लागु

▸ महासागर प्रतिनिधी ▸

**कारंजा**- तालुक्यातील विठ्ठल भक्तांसाठी एक आनंददायी बातमी! यंदा चंद्रभागेच्या तीरावर पंढरीनाथाचे दर्शन घेण्यासाठी थेट आपल्या गावातूनच एसटी बसची सोय करण्यात आली आहे. दिनांक २९ जून २०२५ रोजी एसटी आगारप्रमुख रवी मोरे साहेब, सर्वधर्म मित्र मंडळ अध्यक्ष श्याम सवाई आणि सास शोध-बचाव पथकाचे प्रमुख मोहम्मद मुन्नी वाले यांच्या संयुक्त चर्चेतून हा अभिनव उपक्रम साकार झाला. तुमच्या गावात ४५ विठ्ठल भक्त एकत्र जमले, की तुमच्या गावातून थेट पंढरपूरसाठी बस पाठवली जाईल!गावकऱ्यांनी आपली यादी कारंजा बसस्थानकात आगार प्रमुखांकडे सादर करावी, त्यानंतर त्यांच्या मार्गदर्शनाखाली गावातूनच



पंढरपूरसाठी थेट बस उपलब्ध होणार आहे. या सेवेमध्ये जाण्याची व येण्याची दोन्ही व्यवस्था एसटीमार्फत केली जाणार आहे. 'ही सुविधा ग्रामीण भक्तांसाठी एक मोठं पाऊल आहे. विठ्ठलाच्या दर्शनासाठी जाणं हे ग्रामीण जनतेचं श्रद्धास्थान आहे आणि त्यामुळे ही योजना अत्यंत उपयुक्त ठरेल,' असे प्रतिपादन श्याम सवाई यांनी केले. पांडुरंग भक्तांसाठी आता गावातूनच पंढरपूर! या सेवे करिता रवि मोरे आगार प्रमुख ०७२५६२२२०१४, ८२०८९५२६१४,श्याम सवाई - एसटी प्रवासी मित्र ९३७१८७१५८४ या क्रमांकावर संपर्क साधून सेवेचा लाभ घेण्याचे आव्हान आगार प्रमुख यांनी केले.

RNI No-46973/1986 महासागर वाशिम

मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी, अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर -१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, महात्मा फुले मार्केट, पाटणी चौक येथे प्रकाशित केले.

संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -९९२२९७००२३ स्थानिक संपादक विनोद तायडे मो नं -९५६३६४५५५५ (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील )